रविवार, ०८ जानेवारी २०२३
⊙ किंमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१४१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 08 JANUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-141 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

# विद्येच्या माहेराने अनुभवली धन्यता! 12 लाखांत शाळेला बोगस मान्यता!!

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : पुणे तेथे काहीच उणे नसते. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात शाळांना सीबीएसई बोर्डाचे बोगस प्रमाणपत्र देणारी टोळी काम करत असल्याचे उघड झाले असून 12 लाख रुपयांत कोणत्याही शाळेला हे प्रमाणपत्र मिळते. या प्रमाणपत्रासाठी मंत्रालयातील शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बनावट सह्यांचा वापर करण्यात आला आहे. त्यानंतर या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देण्यात आले असून पुण्यातील तीन शाळांची चौकशी सुरू झाली आहे. मात्र या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असण्याची शक्यता शिक्षण विभागातील अधिकारी व्यक्त करत आहेत.**

पालकांचा आपल्या विद्यार्थ्यांना CBSE च्या शाळांमध्ये घालण्याचा कल पाहून राज्य शिक्षण मंडळाच्या अनके शाळांनी CBSE ची मान्यता असल्याचे बनावट प्रमाणपत्र तयार केल्याचं समोर आलंय. पुण्यातील एम. पी. इंटरन्याशनल स्कुल एन्ड ज्युनियर कॉलेज, शिवाजीनगर , क्रिएटिव्ह एज्युकेशन पब्लिक स्कुल एन्ड ज्युनियर कॉलेज आणि नमो आर आय एम एस इंटरन्याशनल स्कुल एन्ड ज्युनियर कॉलेज या शाळांची सध्या चौकशी सुरु आहे. या तीन शिक्षण संस्थानी अशी बोगस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रयत्न केल्याचं समोर आलायं.

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या शाळा वगळून इतर शाळांना ज्यामध्ये सी बी एस इ च्या शाळांचाही समावेश होतो, महाराष्ट्रात काम करायचं असेल तर राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते . त्याची प्रक्रिया या शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या मार्फत होते. असे बनावट प्रमाणपत्र तयार करून देणारी टोळी कार्यरत आहे. या टोळीने काय केलंय तर ज्या शाळांकडे असे प्रमाणपत्र आधीपासूनच आहे अशा शाळांचा इनवर्ड नंबर घेऊन त्याआधारे बनावट प्रमाणपत्र तयार केलं आहे. त्यासाठी मंत्रालयातील संबंधित अधिकाऱ्यांच्या बनावट साह्य करण्यात आल्यात. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश या शिक्षण उपसंचालक कार्यालयाला देण्यात आले आहेत. शिक्षण उपसंचलक विभागाने चौकशी सुरु केल्यानंर पुण्यातील तीन शाळांबरोबरच पुणे जिल्ह्यातील आणखी बारा शाळांची नावे समोर आली आहेत. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे.

ज्या शिक्षण संस्थांच्या नावे सीबीएसइची बोगस प्रमाणपत्रे तयार केल्याचा आरोप आहे, त्या शिक्षण संस्थांनी मात्र हात वर केलेत. आपल्या संस्थेच्या नावे सी बी एस इ चे बोगस प्रमाणपत्र कसे तयार झाले, हे आपल्याला ठाऊक नाही असं एम . पी . इंटरनॅशन स्कुल एन्ड ज्युनियर कॉलेजच्या मुख्याध्यापकांच म्हणणं आहे. अशी बनावट प्रमाणपत्रं तयार करून देण्यासाठी तब्ब्ल बारा लाख रुपये घेण्यात आल्याची माहितीय. अर्थात अशी बनावट प्रमाणपत्र तयार करून देणाऱ्या टोळीमध्ये काही संस्थचालक आणि शिक्षण विभागातील काही अधिकारी देखील सहभागी असण्याची शक्यताय आहे. आणि म्हणूनच या प्रकरणाच्या चौकशीचे मंत्रायलयातून आदेश सुटलेत.

सध्या या प्रकरणाची चौकशी शिक्षण अधिकारी करतायत. पण या गुन्ह्यांचं स्वरूप गंभीर आहे आणि व्यप्ती मोठी आहे. त्यामुळे या प्रकरणाचा तडा लावायचा असेल तर या प्रकरणाची पोलीस यंत्रणेमार्फत निष्पक्ष चौकशी होण्याची गरज आहे.

## महाराष्ट्रात येलो, उत्तरेत रेड अलर्ट जारी

### देशभरात थंडीने 27 जणांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** मागच्या काही दिवसांपासून उत्तर भारतात थंडी वाढत आहे. दरम्यान उत्तर भारतात थंडीची लाट आल्याने उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान, बिहारसह संपूर्ण उत्तर भारतात नागरिकांचे प्रचंड हाल होत आहे. उत्तर प्रदेशातील कानपूरमध्ये सर्वाधिक कमी तापमानाची नोंद झाली आहे. रात्रीचे तापमान येथे 3.2 सेल्सिअसपर्यंत घसरले होते. मागच्या दोन दिवसांत कानपुरातील दोन सरकारी रुग्णालयांत हृदयविकाराचा झटका आणि ब्रेन स्ट्रोकमुळे 25 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे यावरून थंडीच्या कडाक्याची तीव्रता वाढल्याचे जाणवते. दरम्यान उत्तर प्रदेशातील सर्वच जिल्ह्यात अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशात डार्क यलो अलर्ट जारी आहे. तर युपीची राजधानी लखनौमध्ये अती थंडीच्या परिणामामुळे शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. उत्तर प्रदेशातील फरिदाबाद येथे एका मेडिकल स्टोअरमध्ये ओआरएस घेण्यासाठी आलेल्या तरुणाला (संजय, वय 23, रा. एटा) काऊंटरवरच हृदयविकाराचा झटका आला आणि तो छातीला हात लावून खाली कोसळला. थंडीमुळे ही घटना घडल्याचे मानले जात आहे.



## हे सरकार फेब्रुवारी महिनासुद्धा पाहणार नाही : संजय राऊत

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** 'महाराष्ट्रात राजकीय वातावरण बदलत चालले आहे. 2024 ची तयारी सुरू आहे. त्याआधी सुद्धा तयारी होईल. हे सरकार फेब्रुवारी महिना पाहणार नाही. जर आमच्या न्याय व्यवस्थेवर दबाव आला नाहीतर हे बेकायदेशीर सरकार फेब्रुबारीपर्यंत राहणार नाही. हे सरकार व्हेंटिलेटरवर आहे, कोर्टाने मास्क काढला तर हे राम.., राम बोलो राम, म्हणावे लागेल, असं म्हणत शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी नवीन भाकित वर्तवलं आहे. संजय राऊत आज नाशिकच्या दौऱ्यावर आहे. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत राऊत यांनी नारायण राणे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटावर जोरदार हल्लाबोल चढवला. 'नारायण राणे हे उद्धव ठाकरेंना भेटणार ही चांगली गोष्ट आहे. माझ्या आयुष्यात पक्ष सोडल्यानंतर मी नारायण राणेंला भेटलो नाही. मी बेईमान, गद्दारांना भेटत नाही. त्यांची उद्धव ठाकरेंना भेटण्याची इच्छा झाली आहे. आताच उद्धव ठाकरे आणि माझे बोलणे झाले. ते राणेंच्या विधानावर हसत होते. सुरुवात कुणी केली, रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यावर घाणरेडे शब्दात सुरुवात केली. तुमच्या कर्माने जगा आणि कर्माने मरा, आदित्य ठाकरेंवर किती घाणरेडे आरोप झाले, काय पुरावे आहे. तुम्ही तुमचे मुले कोणत्या भाषेत बोलताय. शरद पवारांना ज्ञान देत होता, कधीकाळी मोदींवरही टीका करत होता. कोण आहात तुम्ही. आमच्या नादाला लागू नका, तर तुम्हाला कळेल, आम्ही काय आहे. उगाच धमक्या, दादागिरी करू नका, आमचं आयुष्य रस्त्यावर गेले आहे. तु कधी कानफटात खाल्ली का, मोठी भाईगिरी दाखवतो, या दाखवतो, अशा इशाराही राऊतांनी राणेंना दिला.

## धुक्याचा फटका..गहू, कांदा, तूर पीक धोक्यात

### वातावरण बदलामुळे वैजापूर तालुक्यातील शेतकरी चिंतेत

आधुनिक केसरी न्यूज

शांताराम मगर

लोणी खुर्द : वातावरण बदलामुळे वैजापुर तालुक्यातील लोणी खुर्द परिसरात शुक्रवारी रोजी पहाटे मोठ्या प्रमाणातधुके पडले होते. धुके इतके दाट होते की, अगदी जवळचेही काही दिसत नव्हते.त्यामुळे सर्वच पिकावर जाळे पडले आहे. धुके गहू, कांदा, तूर पिकास बाधक असून त्यामुळे शेतकरी चिंतेत सापडले आहेत. वैजापुर तालुक्यातील लोणी खुर्द परिसरात शनिवारी पहाटे विक्रमी धुके पडलेले पहावयास मिळाले. धुक्याची तीव्रता इतकी होती की, अगदी एकदम जवळचेही काही दिसत नव्हते. या अचानक पडलेल्या धुक्यामुळे शेतकरी पुर्णपणे धास्तावलेले दिसत आहेत. कारण पडलेले धुके हे गहू, कांदा, हरभरा पिकास बाधक आहे. तुरीला शेंगा लगडण्याच्या अवस्थेत हे पीक आहे त्यातच धुके पडल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. काही जानकारांच्या अनुभवानुसार पीक करपतात व रोग पडण्याच्या आधीच्या अवस्थेत रोगाच्या चिपट्या देखील करपतात. हरभऱ्याचे पिक काही प्रमाणात फुले येण्याच्या अवस्थेत आहे. याच्यावरही सदर धुक्याचा दुष्परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भाजीपाला वर्गीय पिकांनाही धुक्याचा फटका हमखास बसतोच. काही शेतकऱ्यांनी नुकसानीची तीव्रता कमी होण्यासाठी लिबाच्या पाल्याने कांद्याच्या रोपावरील पाणी झटण्याचा प्रयत्न शेतकरी करीत आसल्याचे आपल्या शेतात पहावयास मिळत आहे. आच्यानक धुक्याने हजेरी लावल्याने बागायतदार हवालदिल झाला आहे. यावर्षी आधीच पीक कमी आलेले असताना आणि कांद्याला दरही चांगला मिळत असताना या नवीन संकटामुळे शेतकऱ्यांच्या उरल्यासुरल्या आशाही धुळीस मिळाल्या आहेत. कांदा, गहू, हरभरा, तूर आदी पिकांना वाढीच्या अवस्थेत हवामान बदलाचा फटका बसल्याचे चित्र यंदाच्या हंगामात पाहायला मिळाले. हवामान बदल व पिकनियोजन विषयात शासन धोरणाची पुनर्रचना करण्याची योग्य वेळ आली आहे.




**उत्पादन घटण्याची भीती :** वैजापूर तालुक्यात कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ आणि आता हवामान बदलायचा फटका बसत आहे मोठ्या अपेक्षेने माळरानावर व खडकात, मध्यम प्रतीच्या जमिनीमध्ये कांदा लागवड घेतली आहे . सध्याचे वातावरण रोगांच्या प्रादुर्भावामुळे मोठा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे . यामुळे मोठ्या अपेक्षा ठेवून तूर कांदा वळलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे . परिणामी पिकाचे अंदाजे 25 ते 30 टक्के उत्पादन घटण्याची शक्यता आहे .

सध्या पूर्ण औरंगाबाद जिल्ह्यात ढगाळ , दाट धुक्यामुळे कांदा पीक बुरशीजन्य व जिवाणू जन्य रोगाने कांद्याची पात पिवळी तसेच करपा रोगआहे, ह्या परिस्थितीमध्ये धुके जाण्यापूर्वी सकाळी सकाळी एक बुरशी नाशक व एक जीवाणू नाशक तसेच पाती मधील पेशी सशक्त करण्यासाठी सिलिकॉन याची फवारणी करणे गरजेचे आहे . त्यासाठी कोणतेही स्पर्शजण्य बुरशीनाशक जसे Antracol किंवा captaf किवा dithane 45 स्पर्शजन्य बुरशीनाशक कोणतेही एक 2 .5 ग्राम प्रती 1 लीटर पाणी ,तसेच bactricell जीवाणू नाशक 0 .25 ग्राम 1लीटर पाणी तसेच सिलिकॉन 1मिली 1 लिटर पाणी , व नॉन ionic स्टिकर 10 ml प्रती पंप घेणे फवारणी सकाळी धुके जाण्यापूर्वी घ्यावी .

**डि .व्ही पुंड .कुषी परवेक्षक**



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## खाणाऱ्याने खात जावे


आधुनिक केसरी

पाककला जी गृहिणीपुरती मर्यादित होती, अशा पाककलेचे टीव्ही शोज कमालीचे लोकप्रिय झालेले आढळतात. मग ते प्रशांत दामले, शेफ विष्णू मनोहर, संजीव कपूर आदींचे टीव्ही शोज केवळ स्त्रीवर्गच नव्हे तर पुरुषही आवडीने बघायला लागले. स्वयंपाक करणं म्हणजे पुरुषांची गुलामगिरी करणं या कल्पनेतून बाहेर पडून काही स्त्रिया देखील या कलेकडे वेगळ्या दृष्टीने पाहत आहेत. आज यु ट्यूबवर हव्या त्या पदार्थ्यांच्या रेसिपी उपलब्ध असलेले हजारो लोकप्रिय व्हिडीओ आहेत. एखाद्याच्या हृदयात किंवा मनात प्रवेश करण्याचा मार्ग जिभेपासून पोटापर्यंत जातो. दोन्ही अर्थाने. तुमचं बोलणं चांगलं असेल तरच तुम्ही इतरांच्या मनात घर करू शकता. त्याच्यापुढची गोष्ट म्हणजे आपल्या आवडत्या व्यक्तींना चांगले पदार्थ करून खायला घालणे. म्हणजेच जिभेपासून पोटापर्यंत ज्याला पोहोचता येतं त्याला दुसऱ्याच्या मनातही घर करता येतं. सिंगापूर, कोरिया इ देशात पाकशास्त्र शिकवणाऱ्या जगातील काही उत्कृष्ट



शाळा आहेत. अशा शाळेतून पाककला शिकून बाहेर पडणाऱ्या मंडळींना जगभर मागणी आहे. शिवाय पैसा आणि प्रतिष्ठा आहेच. आपल्याकडील पाककलेची आवड असणाऱ्यांनी या पर्यायाचा जरूर विचार करावा. मग त्यांच्यापुढे अनेक संधी उपलब्ध होतील.

लता मंगेशकर आपल्या सगळ्यांना श्रेष्ठ गायिका म्हणून परिचित आहेत. पण त्या उत्तम स्वयंपाक करून आपल्या जवळच्या किंवा आवडत्या व्यक्तींना खाऊ घालत होत्या ही गोष्ट फार थोड्या लोकांना माहित असते. त्यांच्यासारख्या अनेक मोठमोठया व्यक्ती ज्या इतर क्षेत्रात नावाजल्या आहेत, त्या अशा पद्धतीने उत्तम पदार्थ करून लोकांना खाऊ घालण्यात पण प्रवीण असतात याची अनेक उदाहरणे आपल्याला बघायला मिळतात. जेवताना आपण जो श्लोक म्हणतो त्यातील, ' उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म...' ही ओळ किती अर्थपूर्ण आहे ! स्वयंपाक बनवणे म्हणजे केवळ समोरच्या व्यक्तीचे पोट भरणे नाही. त्यात खूप गोष्टी येतात. त्यातून तुम्ही समोरच्या व्यक्तीचे आरोग्य जोपासता. स्वच्छता आणि चवीचे धडे नकळत देता. वेगवेगळे पदार्थ खायची आवड निर्माण करतात.



## आनंदी पहाट

### व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीचे अंतर्बाह्य स्वरूप

आधुनिक केसरी

व्यक्तित्व म्हणजे वेगळं, निराळं अस्तित्व असलेली व्यक्ती. प्रत्येकास जन्मतः स्वतःचं असं व्यक्तित्व असतंच. या व्यक्तित्वावर सामाजिक परिस्थितीचा प्रभाव पडल्यावर व्यक्तित्वाचं व्यक्तिमत्वात रुपांतर होत असतं. एखाद्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्ती जशी आहे तशी, म्हणजे व्यक्तीची शारीरिक ठेवण, बुद्धी, चारित्र्य, कर्तृत्व, गुण आदींचा समावेश त्यात होतो. व्यक्तीचा शारीरिक, भावनिक आणि सामाजिक विकास होत असतो. ह्या विकासातून तिचा पिंड घडत असतो. व्यक्तीचा हा घडलेला पिंड म्हणजे त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व असतं. इंग्रजीत पर्सनेलिटी ही संज्ञा व्यक्तिमत्वास वापरतात. पर्सोना या शब्दापासून पर्सनेलिटी हा शब्द तयार झाला. पर्सोना म्हणजे मुखवटा; रोमन काळात नट तोंडावर मुखवटा घालून बोलत असत; अर्थातच जसं पात्र तसा मुखवटा. जसा मुखवटा तसा आवाज आणि भाषण. त्यामुळेच व्यक्तिमत्व म्हणजे बाह्य दर्शन असा अर्थ घेतला जात असतो. व्यक्तिमत्वाचा हा अर्थ एकांगी असल्याचं म्हंटलं तर निश्चितच वावगं ठरणार नाही. ह्यामध्ये व्यक्तीच्या स्वभाव वैशिष्ट्यांचा, बुद्धीचा, भावनांचा, गुणांचा आणि वृत्तीचा अंतर्भाव होत नसल्याचं स्पष्ट होतं. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात. ज्यामुळे आपली मानसिकता बदलत राहते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने जरा हटके विचार करण्याची जरुरी असते. नंतरच कार्यकृती करणे योग्य ठरत असते. त्यामुळे ही व्याख्या परिपूर्ण होऊ शकत नाही. व्यक्तिमत्वात व्यक्तीची शरीरयष्टी, चेहरेपट्टी, ठेवण, बांधा, त्याची बुध्दिकौशाल्ये, क्षमता, अभिरुची, आवडनिवड, संपादित गुण इत्यादी बाबींचा प्राधान्यक्रमानुसार साकल्यानं विचार केला पाहिजे. ह्या सर्वांची व्यक्तीच्या जैविक देणगीपासून व्यक्तिजीवन जगण्यापर्यन्त झालेली वाटचाल म्हणजे व्यक्तिमत्व, असं म्हणल्यास ते व्यक्तिमत्वाच्या व्याख्येच्या दृष्टीकोनातून योग्य ठरू शकतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

## सुजाण पालकत्व

आधुनिक केसरी

पालक होण्याआधी आपण ठरवलं पाहिजे की आपण पालक होण्याच्या पात्रतेचे आहोत का?

लहान मूल, ते हळूहळू मोठे होताना येणाऱ्या अडचणी, आई-बाबा म्हणून आपली जबाबदारी किती महत्त्वाची आहे हे कळलं पाहिजे. मूल वाढवायचं म्हणजे खूप लाडाकोडत त्याला वाढवू नका ? किंवा खूपही ओढातान करत त्याचं पालन पोषण करू नका!.. त्याचे मालक न होता पालक बना. व त्याच्याशी संवाद तर कराच पण सुसंवादही असू द्या .सहनशीलता आपल्यात असावी. आई मध्ये असतेच. पण कधी सुटतो संयम! ?

मुल वाढवणे आणि घडवणं सोपं नाही. तर मातीचा गोळा आहे असं आपण म्हणतो. पण तो मुळात गोळा नसतोच. निसर्गाकडून तो जन्मतःच खूप काही गोष्टी शिकून येत असतो. खूप सारे कौशल्य निसर्गाने त्याला बहाल केलेले आहेत . फक्त त्या कौशल्याचा आपण योग्य तो विकास केला पाहिजे. प्रत्येक गोष्टीचा अनुभव त्यांना घेऊ द्या. आपल्या मार्गदर्शनाखाली. आपण आपल्या बाळाला जन्माला घालतो म्हणून त्याचं पालन पोषण करणं, त्याला योग्य ते शिक्षण सुसंस्कार देऊन सुजाण नागरिक घडवायचं असतं. फक्त शिक्षणच द्यायचं नाही तर इतर कलागुणांना पण त्याच्या वाव दिला पाहिजे. जेणेकरून मुलांच्या दोन्ही मेंदूचा वापर होईल, झालाच पाहिजे. एक दोन विषयात विद्यार्थी कच्चा आहे म्हणजे तो" ढ "आहे असा नाही? गणित इंग्रजी येत नाही म्हणजे त्याला 'ढ' म्हणता येणार नाही. त्यांना कंटाळवाण्या वाटणाऱ्या विषयात त्याला आग्रह नको. दुसऱ्यांच्या मुलाने गणित विषयात पीएचडी केली म्हणून आपल्या मुलाने त्याच विषयात प्रगती करावी असे नाही.

प्रत्येकानेच नोकरी करावी असेही नाही. उद्योग व्यवसाय ही करता आला पाहिजे .ती सुद्धा एक समाजसेवा आहे. समाजसेवेचे सुद्धा मुलांमध्ये बीज रुजवावे. पाणी, माती, ओलावा असेल तिथे बी रुजते .पण पिंपळासारखं खडकावर पण रुजता आलं पाहिजे. तेवढी ताकद आपण मुलांमध्ये निर्माण करू या.....

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-56

## मेहनतीचे फळ

आधुनिक केसरी

एक गाव होते त्या गावांमध्ये एक शेतकरी माणूस राहत होता त्या माणसाला चार मुले होती परंतु त्याचे चारही मुले अगदी अळशी होती. एक जणी ही काम धंदा करत नव्हते शेतकऱ्यांच्या जीवावर त्यांचे आयुष्य सुखात चालले होते.

पण एक दिवस काय झाले शेतकऱ्याची तब्येत अचानक खराब झाली व त्याला कळाले आता आपण मरण पावणार परंतु आपण मरण पावल्याने आपल्या मुलांचे काय होणार? असा विचार तो करीत होता. एके दिवशी शेतकऱ्याची तब्येत अधिकच खराब झाली तेव्हा त्यांनी आपल्या चारही मुलाला जवळ बोलावले आणि सांगितले," मुलांनो तुमच्यातील एकही जण काही काम करत नाही मी निघालो होतो तुमच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये म्हणून मी आपल्या शेतामध्ये एकदा गेलेली भरलेला हंडा पुरला आहे जो कोणी हा फंडा खोडून काढत त्याला ते सर्व धन मिळेल.असे सांगून शेतकऱ्याने आपला शेवटचा श्वास घेतला. त्यानंतर शेतकऱ्याचे चारही मुले आपल्या शेतामध्ये जाऊन संपूर्ण शेत खोदून काढले परंतु त्यांना दागिन्यांनी भरलेला हंडा कुठेही मिळाला नाही. तेव्हा शेतकऱ्याचे चारही मुले खूप उदास झाली. ते दिवस होते पावसाळ्याचे.

आता खोदलेल्या शेताचे काय करायचे म्हणूनच शेतकऱ्यांच्या एका मुलाने शेतीमध्ये दाणे टाकले. पाऊस पडल्याने काही दिवसातच ते जाणे बघून आले व बघता बघता शेतामध्ये मौल्यवान असे धान्य डुलु लागले. देवा शेतकराच्या मुलांच्या लक्षात आले की, बाबांनी सांगितलेलला तो मौल्यवान दागिन्यांनी भरलेला हंडा म्हणजेच आपली शेती आहे. अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या मुलांना त्यांची चूक लक्षात आले व सर्व मुले मिळून शेती करू लागले व आनंदाने जगु लागली.

## निरूपण

आधुनिक केसरी

**दारिद्र्यासारखा दुसरा शाप नाही. ते जेथे दिसेल तेथे तेथे त्याच्या निर्मूलनासाठी प्रयत्न करणे हे एक प्रकारचे राष्ट्रकार्य आहे.**

**आर्थिक दारिद्र्य हा दारिद्र्याचा एक प्रकार आहे. माणसाने माणसाला न बोलणे हा दारिद्र्याचा सर्वात भयंकर प्रकार आहे.**




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

**चित चेतन सत्ता रहे, ज्ञान असीम अनन्त ।**
**ज्ञान योनि मय पूर्ण है, चित् स्वरुप भगवन्त ।।०२।। (स्वर्वेद प्रथम मण्डल प्रथम अध्याय) ०१/०१/०२**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
परब्रह्म नित्य चेतन अस्तित्वाने सदैव प्रकाशमान आहे. ती कुटस्थ सत्ता सदैव एक रूपात विद्यमान असते ; त्यामध्ये ह्रास, विकास होत नाही. त्याचा स्वभाव-गुण-क्रिया अनन्त अनादि आहे. ती सर्वव्यापी अनन्त सत्ता समस्त ज्ञानांचं कारण आहे तसेच सर्व शास्त्रांचा योनिमूलाधार आहे. ज्ञानस्वरूप प्रभू चेतन एक रस सर्वव्यापक आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## हरिपाठ

आधुनिक केसरी

**देवाचिये द्वारीउभाक्षणभरी। तेणें मुक्तीचारीसाधियेल्या ।।१।।**

माऊली म्हणतात की देवाच्या दारी क्षणभर उभा राहा म्हणजे तुला चारी अर्थात सलोकता, समीपता, सरूपता आणि सायुज्यता यांची प्राप्ती होईल. आपल्याला प्रश्न पडतो की आपणक्षणभर कायतासंतास देवळाच्या समोर उभे असतो, कारण आमचे घर देवळाच्या समोर आहे, पणमुक्तीचे सोडा, कणभर शांतीदेखीलप्राप्त होतनाही, याला काय करावे ? संतांची वचनांचे अर्थ कळण्यासाठी मनुष्याची त्या विषयातील थोडी तयारी असावी लागते. मूल सकाळी शाळेत गेले आणि संध्याकाळी शिक्षण पूर्ण करून घरी आले असे होत नाही. तद्वतच संत साहित्याचे आहे.

माऊलींनी सांगितलेल्या चार मुक्ती कशा आहेत हे आपण दासबोधाचे आधारे थोडक्यात समजून घेऊ. (संदर्भः दासबोध दशक ४ समास १०) येथें ज्या देवाचें भजन करावें |तेथें ते देवलोकीं राहावें ।स्वलोकता मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २३॥" {या मृत्युलोकात असताना ज्या देवतेची उपासना माणूस करतो, त्या देवतेच्या लोकांत तो मृत्यूनंतर जाऊन सहतो. स्वलोकता मुक्तीचे लक्षण हे असे आहे.}

*लोकीं राहावें ते स्वलोकता ।समीप असावें ते समीपता ।स्वरूपचि व्हावें ते स्वरूपता- । तिसरी मुक्ती ॥ २४॥" {त्या देवतेच्या लोकांत जाऊन राहणे याला स्वलोकता म्हणतात. समीप असावे यास समीपता मुक्ती म्हणतात. त्या देवतेचे स्वरूप प्रास होऊन सहाणे याला स्वरूपता मुक्ती म्हणतात. ही तिसरी मुक्ती आहे.} "देवस्वरूप जाला देही । श्रीवत्स कौस्तुभ लक्ष्मी नाहीं ।स्वरूपतेचें लक्षण पाहीं । ऐसें असे ॥ २५॥" {त्याला विष्णूचे रूप मिळाले तरी त्यास श्रीवत्स, कौस्तुभ मणी व लक्ष्मी यांची प्राप्ती होत नाही. स्वरूपता मुक्तीचे लक्षण हे अशा प्रकारचे आहे. "सुकृत आहे तों भोगिती । सुकृत सरतांच ढकलून देती ।आपण देव ते असती । जैसे तैसे ॥ २६॥" {पुण्याचा साठा असेपर्यंत त्या त्या लोकातील भोग भोगावयास मिठ्यात. पुण्याचा पूर्ण क्षय झाला की तेधून ढकलून देतात. मात्र त्या लोकातील देव तेथे तसेच पूर्वीप्रमाणेच असतात. "म्हणौनि तिनी मुक्ति नासिवंत । सायोज्यमुक्ती ते शाश्वत ।तेहि निरोपिजेल सावचित्त । ऐक आतां ॥ २७॥"

{या तिन्ही मुक्ती नाशिवंत आहेत. सायुज्यमुक्ती ही अविनाशी आहे. ते कसे ते आता सांगतो. चित्त सावध ठेवून ऐकावे.}

ब्रह्मांड नासेल कल्पांतीं ।पर्वतासहित जळेल क्षिती ।तेव्हां अवघेच देव जाती । मां मुक्ति कैंच्या तेथें ॥ २८॥"

{कल्पांती ब्रह्मांडाचा नाश होतो. पर्वतासहित भूमी जळून जाईल तेव्हा सगळे देवही जातात. तेव्हा मग तेथल्या मुक्ती कशा राहणार ? }

## मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**कळे आकळे रूप ते ज्ञान होता।**
**तेथे आटली सर्व साक्षी अवस्था।**
**मना उन्मनी शब्द कुंठीत राहे।**
**तो गे तो चि तो राम सर्वत्र आहे।।२००।।**


**श्लोकार्थ :** ज्ञान झालें म्हणजे तें परमात्मस्वरूप कळते, त्यांचे बरोबर आकलन होते. मग सर्वसाक्षीपणाची अवस्थाही नाहीशी होते. मनाचे उन्मन होते व शब्द लटके पडतात. एका परमात्म्याहून अन्य काही प्रत्ययास येत नाही. **विवेचन :** सद्गुरूकृपेने अती गूढ, जीर्ण, तर्काच्या पलीकडील परमात्म्याचे साधकाला सहज प्राप्त होत असते असे समर्थांनी मागील श्लोकात सांगितले. सद्गुरू कृपेनेच मनुष्याला होणाऱ्या भगवंताच्या प्राप्तीचे वर्णन समर्थ या श्लोकात करीत आहेत. साधना फळास येणे आणि सद्गुरू कृपेने भगवंताची प्राप्ती होणे हा मनुष्याच्या जीवनातील सर्वोच्च आनंदाचा अनुपम्य सोहळा असतो. बाळंतपण म्हणजे बाळ किंवा अंत. बाळ जन्माला आले बाळाचे मुखदर्शन झाले की आई प्रसूतीच्या अति तीव्र वेदना विसरून जाते. परमात्म्याच्या भेटीसाठी मनुष्याच्या देहबुद्धिचा, मीपणाचा अंत अनिवार्य असतो. बाळंपणाच्या मरणासन्न वेदना सोसून कधी एकदा बाळाला बघते अस त्या माऊलीच झालेलं असते. भक्ताचे देखील असेच होते. परमात्म्याची भेट हा जीवाच्या आयुष्यातील परमोच्च आनंदाचा क्षण असतो. मातृत्व प्राप्त होत असताना प्राप्त झालेल्या आनंदाचे सर्वार्थाने यथार्थ वर्णन करणे कोणत्याही मातेला शक्य होईल असे वाटत नाही. लौकिकाची गोष्ट अशी असेल तर परमात्मप्राप्तीचा आनंदाचे किंवा माऊली म्हणतात त्याप्रमाणे भक्त आणि परमात्मा भेटीचा सोहळा वर्णनातीत असणार यात दुमत नसावे. सागराच्या भेटीच्या ओढीने निघालेली नदी जेव्हा सागरास जाऊन मिळते तेव्हा तिला काय वाटते हे सांगायला ती शिल्लकच राहिलेली नसते. भक्त आणि भगवंत भेट होते तेव्हा भक्ताची स्थिती अशीच होत असते असे समर्थ आपल्याला सांगतात. संत प्रत्येक गोष्ट अनुभतीने लिहितात, त्यामुळे त्यांचे लेखन अक्षर असते. विवेचन करणाऱ्यांना अनुभूती असतेच असे नाही, त्यामुळे त्यांच्या लेखनास मर्यादा येत असते, त्यामुळे ते लेखन परिपूर्ण असतेच असे म्हणता येत नाही. हा आत्मानंद म्हणजे दुसरे तिसरे काही नसून परब्रह्माचे, परमेश्वराचे स्वरूप जाणवणे. समर्थ पुढे या श्लोकाच्या अखेरच्या चरणात मनाला आदेश देत आहेत की अरे हे स्वरूप म्हणजे रामाचेच रूप आहे. तेच तुला उन्मनी अवस्थेत जळी स्थळी काष्ठी पाषाणी, सर्वत्र दिसत राहील. मनोभावे, भक्तिभावे पहात रहा. समर्थ म्हणतात, "भक्त म्हणिजे विभक्त नव्हे । आणी विभक्त म्हणिजे भक्त नव्हे । विचारेंविण कांहींच नव्हे । समाधान ॥" (दास.०४.०९.०६)

ज्ञान प्राप्त होते तेव्हा मनुष्याची जागृती, स्वप्न, सुषुप्ती आणि तूर्या या चारही अवस्थांतून सुटका होते. मनुष्य जागा असणे, स्वप्न पाहणे आणि सुषुप्ती म्हणजे गाढ निद्रेत असणे या तीन प्राथमिक अवस्था आहेत. सामान्य मनुष्याला या तीन अवस्थांची जाणीव असते. चौथी अवस्था म्हणजे तूर्या. तूर्या अवस्थेची जाणीव सद्गुरू कृपेशिवाय होऊ शकत नाही. ती सात्विक अशी जाणीवस्वरूप अवस्था आहे. सामान्य मनुष्याला या अवस्थेची जाणीव सहज होत नसली तरी या अवस्थेला सर्व जाणीव असते. समर्थ म्हणतात,

{जी ब्रह्मालाही जाणते व जी मायेलाही जाणते. तिला सर्व जाणणारी म्हणूनच सर्वसाक्षिणी अशी तुर्यावस्था म्हणतात.}

समर्थ पुढे म्हणतात की पारमार्थिक दृष्ट्या हे जग मिथ्या आहे, त्यामुळे जागृती, सुशुप्ती आणि स्वप्न या अवस्था मिथ्या आहेत. मनाचे उन्मिलन झाले की मन वृत्ती विरहित होते, थोडक्यात ही वृत्तिशून्य अवस्था असते. मग इथे सर्वसाक्षी असलेल्या तूर्यावस्थेचे प्रयोजनच उरत नाही. "जंव खरेपण मायेसी । तंवचि साक्षित्व ब्रह्मासी । मायेअविद्येचे निरासीं । द्वैत कैंचें ॥ १० ॥" जोपर्यंत माया खरी वाटते, तोपर्यंतच ब्रह्मास साक्षित्व बहाल केले जाते. ज्यावेळी अविद्येचा-मायेचा निरस होतो, तेव्हा द्वैत कसे राहणार ?

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६



# वृत्तपत्र क्षेत्रातील पाल्यांना शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज : चंदुलाल बियाणी

## बन्सल क्लासेसमध्ये 11 जणांना मोफत शिक्षण; कै. सुधाकरराव डोईफोडे प्रेरणादायी पत्रकारिता पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** वृत्तपत्र क्षेत्रातील पाल्य शिक्षणापासून वंचीत राहू नये आणि त्यांना उच्च शिक्षणासाठी अडचणी निर्माण होऊ नये म्हणून अशा गरजवंताना राजस्थानी मल्टीस्टेटच्या माध्यमातून बिनव्याजी कर्ज व 11 विद्यार्थ्यांना बन्सल कोचींग क्लासेसमध्ये मोफत शिक्षण देण्याचे वचन बँकेचे संस्थापक तथा ज्येष्ठ संपादक चंदुलाल बियाणी यांनी पत्रकारिता पुरस्कार सोहळ्यात दिल्याने त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

मीमांसा फाऊंडेशन, मीडीया-पोलीस सोशल क्लब, समीक्षा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व मंथन क्रिएटिव्ह ग्रुपच्यावतीने दरवर्षी पत्रकार दिनानिमित्त पत्रकारिता पुरस्कार सोहळा आयोजीत करण्यात येतो. मागील पंधरा वर्षापासून घेण्यात येणाऱ्या पुरस्कार प्रदान सोहळ्याला लायन्स क्लब ऑफ नांदेड मिडटाऊनचे अध्यक्ष प्रेमकुमार फेरवानी, फिजीओ केअर सेंटरचे संचालक डॉ.राजेंद्र पाटील, इतिहासाचे अभ्यासक प्रा.डॉ.साईनाथ शेटोड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ.शंकररावजी चव्हाण पत्रकारिता पुरस्कार मुंबईच्या प्रेरणा जंगम, कै. सुधाकरराव डोईफोडे प्रेरणादायी पत्रकारिता पुरस्कार परळी येथील दै.मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, दै.महासागरचे ज्येष्ठ संपादक एम.एम.बेंद्रीकर यांना स्व.रामेश्वर बियाणी जीवन गौरव पुरस्कार तर नायगावचे सुर्यकांत सोनखेडकर स्व.अनिल कोकीळ स्मृती पत्रकारिता पुरस्कार, डॉ.शंकररावजी चव्हाण विकास पत्रकारिता पुरस्कार (ग्रामीण) अर्धापूरचे रामराव भालेराव, पंचनामाकार लक्ष्मणराव गायकवाड निर्भीड पत्रकारिता पुरस्कार जय महाराष्ट्र लातुरचे सचिन अंकुलगे, मीमांसा फाऊंडेशन ह्युमन राईट्स पुरस्कार भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष शंकरराव मावलगे, स्व.अनंतराव नागापूरकर वृत्तपत्र विक्रेता पुरस्कार (शहर) प्रमोद योगी, स्व.अनंतराव नागापूरकर वृत्तपत्र विक्रेता पुरस्कार (ग्रामीण) उमरीचे गोविंद ढगे, वृत्तपत्र क्षेत्रातील जाहिरात आधारस्तंभ भोकरचे बी.आर.पांचाळ, मंथन क्रिएटिव्ह डिजीटल मिडीया पुरस्कार नमस्कार महाराष्ट्रचे संघरत्न पवार, वृत्तपत्र क्षेत्रातील सहकारी दुवा (संगणक चालक) लोकमतचे पुरूषोत्तम काशटवार, स्व. माधव अंबुलगेकर सामाजिक पत्रकारिता पुरस्कार कंधारचे गणेश कुंटेवार, स्व.सुरेश पटणे मुद्रण



सेवा पुरस्कार रमेश आवटे यांना पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. तर ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ बोकारे व मारोती सवंडकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला श्रद्धेय डॉ.शंकररावजी चव्हाण, कै.सुधाकररावजी डोईफोडे, स्व.रामेश्वरजी बियाणी व स्व.अनंतराव नागापूरकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे मंथन क्रिएटिव्ह ग्रुपचे रामेश्वर धुमाळ, सुनिल कुलकर्णी, सौ.उज्वला दर्डा, अरूणा पूरी, शिवहारी गाढे व रूपेश पाडमुख यांनी पुष्पगुच्छ, शाल व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी मार्गदर्शन करून पत्रकार दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्तावीक ह्यूमन राईट्सचे रामेश्वरजी धुमाळ यांनी केले तर सुरेश सुत्रसंचलन संतोष देवराये यांनी केले. शेवटी संपादक रूपेश पाडमुख यांनी आभार मानले. मयत पत्रकार दशरथ भदरगे यांच्या कुटूंबाला कोरोनामुळे मयत झालेले भोकरचे पत्रकार दशरथ भदरगे यांच्या कुटूंबाला लायन्स क्लब ऑफ मिडटाऊन व पत्रकार संघाच्यावतीने शिलाई मशीन देऊन सहकार्य करण्यात आले. यावेळी अध्यक्ष प्रेमकुमार फेरवाणी, डॉ.राजेंद्र पाटील यांच्यासह क्लबचे इतर पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# मला दादाच मुख्यमंत्री झाल्यासारखे वाटते

## सुप्रिया सुळे यांचे विधान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज हे धर्मवीर नसून स्वराज्यरक्षक असल्याचा उल्लेख विधानसभेत केला. त्यानंतर राज्यातील वातावरण ढवळून निघाले. भाजपाने आक्रमक पवित्रा घेत राज्यभर आंदोलन केले. यावर अजित पवारांच्या भगिनी आणि बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अनेक वेळा मला दादाच मुख्यमंत्री असल्याच वाटत असल्याचं विधान खासदार सुप्रिया सुळे यांनी केलं. सुप्रिया सुळे या पुण्यात एका कार्यक्रमासाठी आल्या होत्या. त्यावेळी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधी सोबत संवाद साधला.

बेळगाव प्रश्नावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काही भूमिका मांडताना दिसत नाही. त्यावर त्या म्हणाल्या की, बेळगाव प्रश्नावर अमित शाह यांच्यासोबत महाविकास आघाडीतील खासदाराची बैठक झाली. त्याबद्दल मी अमित शाह यांचे आभार मानते. त्यावर दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांना बोलवून चर्चा केली. याप्रकरणी कोणी काही बोलणार नाही. न्यायप्रविष्ट



बाब असल्याच अमित शाह यांनी त्यावेळी सांगितले होते. तरीदेखील कर्नाटकचे मुख्यमंत्री सतत विधान करीत आहेत. ऐरवी आपले ईडी सरकार सतत बोलत राहतात. पण यावर काही बोलण्यास तयार नसून दोघे जण बोटचेपी भूमिका घेत आहेत. महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न असून कोणीही याव आणि महाराष्ट्राला टपली मारून जावे. आम्ही हे कधीच सहन करणार नाही. या कृतीतून महाराष्ट्राच महत्व कमी करण्याच काम अदृश्य हात करीत सांगत भाजपावर त्यांनी टीका केली.

# राम मंदिराच्या उद्घाटनावरून खरगेंचे अमित शाहांवर टीकास्त्र

आधुनिक केसरी न्यूज

**त्रिपुरा :** येथे भाजपाच्या 'जनविश्वास' यात्रेदरम्यान बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अयोध्या येथे निर्माणाधीन असलेल्या राम मंदिराची तारीख जाहीर केली होती. १ जानेवारी २०२४ रोजी राम मंदिराचे उद्घाटन होईल, असे ते म्हणाले होते. दरम्यान यावरून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी अमित शाहांवर टीकास्त्र सोडले आहे. राम मंदिराचे उद्घाटन करणारे तुम्ही कोण? असा प्रश्न खरगे यांनी विचारला आहे. काँग्रेसची भारत जोडो यात्रा हरियाणात असून पाणीपत येथे झालेल्या सभेत बोलताना खरगे यांनी भाजपा सरकारवर टीकास्त्र सोडले. यावेळी त्यांनी अमित शाहांनी राम मंदिराबाबत केलेल्या विधानाचाही समाचार घेतला. "अमित शाहांनी राम मंदिराचे उद्घाटन १ जानेवारी २०२४ रोजी होणार असल्याचे म्हटले आहे. मात्र, ही तारीख घोषित करणारे अमित शाह कोण आहेत? ते मंदिराचे पुजारी आहेत की महंत आहेत? या देशात प्रत्येकाची देवावर श्रद्धा आहे. मात्र, राम मंदिराची घोषणा अमित शाह का करत आहेत? हा अधिकार त्यांना कोणी दिला? अशी टीका त्यांनी केली. तसेच अमित शाह हे राजकीय नेते असून पुजारी नाहीच. त्यांनी त्यांचं काम करावं आणि पुजारांना पुजाऱ्याचे काम करू द्यावे", असेही ते म्हणाले. दरम्यान, यावेळी बोलताना त्यांनी केंद्रातील मोदी सरकारलाही लक्ष्य केलं. "मोदी सरकारने सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजही शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले नाही. मोदी सरकारने देशात दरवर्षी दोन कोटी नोकऱ्यांचे आश्वासन दिले होते, तेसुद्धा या सरकारने पूर्ण केलं नाही. मोदी सरकारने प्रत्येकाला १५ लाख रुपये देण्याचेही म्हटलं होतं. मात्र, त्याचं पुढं काय झालं माहिती नाही. त्यामुळे हे सरकार केवळ निवडणुकीच्या वेळी घोषणा करते. मोदी सरकार केवळ जुमला सरकार आहे", अशी टीकाही त्यांनी केली.

# थंडीमुळे शाळांच्या वेळा बदलण्याची युवासेनेचे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात थंडीचे प्रमाण वाढत असून शाळेत जाणार्या लहान मुलांना मोठ्या प्रमाणात थंडीचा त्रास होत आहे. त्यामुळे सकाळच्या सत्रातील शाळेची वेळ बदलण्यात यावी, अशी मागणी जिल्हा युवासेनेतर्फे शिक्षणाधिकार्यांकडे करण्यात आली आहे.

याबाबत युवासेनेने दिलेल्या निवेदनानुसार, अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून दररोज शिक्षणासाठी शहरात येतात. भल्या पहाटे कडाक्याच्या थंडीत वाहनाने येणे म्हणजे कसोटीच. काही पालक तर दुचाकीवरुन मुलांना शाळेपर्यंत सोडायला येतात. थंडीमुळे विद्यार्थ्यांना त्रास होतो. मुलांना शाळेत सोडताना पालकांचीही कसरत होते. त्यामुळे या समस्यांचा गांभीर्याने विचार करुन शाळांच्या वेळेत योग्य तो बदल करावा, अशी मागणी युवासेना सहसचिव यशवर्धन कदमबांडे, जिल्हाप्रमुख हरीष माळी, उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे, राज माळी, महानगर प्रमुख सिद्धार्थ करनकाळ आदींनी केली आहे.

# एकलव्य निवासी शाळेतील विद्यार्थ्यांचे अन्नत्याग आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** अन्नात किडे, पोळ्याही अर्धवट भाजलेल्या, वरणात कधी झुरळ तर कधी उंदीर पडलेला, असे जेवण आम्हांला नेहमीच दिले जाते. असे जेवण का करावे ? सकाळपासून दुपारी तीनपर्यंत आम्ही उपाशी असतांना कोणीच विचारायला आले नाही. दररोजच्या त्याच त्या त्रासाला कंटाळलेल्या पंचवटीतील दिंडोरी रस्त्यावरील एकलव्य निवासी शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या सहनशक्तीचा शुक्रवारी उद्रेक झाला. या शाळेत चौथी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी राहतात. ४०० विद्यार्थी शिकत आहेत. सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहेत. विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे जेवण मिळत नसल्याची तक्रार आहे. आम्हांला १५ दिवसांपासून एकच भाजी मिळत असून पोळी कच्ची, भात कच्चा, असे सर्वकाही आहे. याविषयी आम्ही आमच्या प्रमुखांना माहिती दिल्यास ते दुर्लक्ष करतात. कधी वरणात झुरळ येतं तर कधी उंदीर. असे जेवण आम्ही कसे करु, अशी तक्रार उज्वला भोईर हिने केली. सकाळपासून दुपारी तीनपर्यंत आम्ही उपाशी आहोत. मात्र याविषयी कोणी बोलण्यास तयार नाही, असेही विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. प्रशासनाच्या ढिम्म भूमिकेचा निषेध करण्यासाठी विद्यार्थ्यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेले जेवण न करता वसतिगृहात खालील बाजूस ते बसून राहिले.

नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# अस्मितेचे राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**हल्लीचा काळ गतिमानतेचा, गुंतागुंतीचा आणि गरमागरमीचा आहे हे सहज ध्यानात येते. गती आणि प्रगती यातला फरक आपण विसरत चाललो आहोत, ज्याच्याशी आपले काही कर्तव्य नाही अशा कित्येक गोष्टीत गुंतत आहोत आणि नको त्या विषयाला घेऊन आपले नाहक रक्त उसळत आहे का? असा प्रश्न पडावा अशी सर्वत्र अवस्था आहे. आपल्या भावना इतक्या तीव्रपणे टोकदार का होत असाव्यात, याचा साधा विचार करण्याची उसंतही असू नये, हे आपल्या कार्यमग्नतेचे लक्षण म्हणावे की संवेदनाहिनतेचा शाप म्हणावा हा प्रश्नच आहे.**

काही असले तरी आपण एका चक्रात अलगत अडकत चाललो आहोत. आणि हे धारदार अऱ्यांचे चक्र आहे अस्मितेच्या राजकारणाचे. ज्याला अस्तित्व आहे आणि अस्तित्वाची लढाई आहे तेथे अस्मिता असणार यात दुमत नाही. व्यक्तिगत अस्तित्वाची अनुभूती स्वाभिमानास जन्म घालते, परंतु हीच समूहाच्या पातळीवर अस्मिता म्हणून उभी टाकते. अस्मितेच्या राजकारणाचे आणि त्याच्या बऱ्या वाईट परिणामांचे हजारो उदाहरणे आपणांस सांगता येतील. पाकिस्तानच्या निर्मितीमागे हाच घटक होता तसेच राम मंदिर आणि बाबरी मस्जिद वादातही तोच कार्यरत होता आणि भीमा कोरेगाव विजय स्तंभामागे सुद्धा हाच विचार आहे. आपण विचार करताना मात्र स्वतःस वगळून विचार करतो हा भाग वेगळा. अशा कोणत्याही ठिकाणी आणि कोणत्याही विचाराने समूहमन चेतविण्याचा जिथे प्रयत्न होतो, त्या ठिकाणी अस्मितेच्या राजकारणाची सुरुवात झालेली असते. मंडल आयोगाच्या शिफारशीनंतर येथील डाव्या विचारांच्या जाणकारांनी यामुळे जातीय अस्मितेच्या राजकारणाची टोके आणखी तीक्ष्ण होतील, याकडे लक्ष वेधले होते; परंतु तेव्हा त्याकडे कोणी लक्ष दिल्याचे आठवत नाही. भूमिका योग्य की अयोग्य याबद्दल खल होऊ शकतो, पण भूमिकेकडे हेतूतः दुर्लक्ष करणे दूरगामी परिणामांच्या दृष्टीने महागात पडू शकते. नाईलाजास्तव बहुजनांच्या राजकारणामुळे आणि भाजपाला विरोध म्हणून डाव्या पक्षांना ओबीसी आरक्षण लढ्याशी जोडून घेणे भाग पडले, हा इतिहास आहे. आपण कितीही नाकारण्याचा प्रयत्न केला तरी भाजपाच्या चढत्या आलेखाचा प्रारंभ बिंदू हा रथयात्रा होता, आणि ही रथ यात्रा कशासाठी निघाली होती याच्या विश्लेषणाची आवश्यकता नसावी. म्हणजे अस्मितेच्या राजकारणात आम्ही करतो ते राजकारण चांगले आणि विरोधकांचे वाईट असे आपण म्हणत असलो तरी, तसे म्हणता येत नाही. मुळात या राजकारणाची सुरुवात होते ती बहुसंख्यांकांच्या विरोधात वातावरण निर्मितीसाठी. सुरुवातीचे ध्येय काहीही असले तरी त्याचा शेवट मात्र जात, धर्म, वंश, भाषा, प्रांत अशा प्रकारच्या गटबाजीतच होत असतो. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे एखादा माणूस नोकरदार, मजूर, भूमिहीन, शेतकरी असला तरी त्यातील प्रतवारीमुळे समूहमनाचा भाग बनू शकत नाही किंवा हा विचार दीर्घकाळपर्यंत समूहाला एका धाग्यात बांधून ठेऊ शकत नाही. परंतु जात, धर्म किंवा तत्सम गोष्टी समूहाच्या म्हणून एकसामायिक असल्यामुळे मोठ्या भागाचा आपणांस छोटासा हिस्सा होऊन राहता येऊ शकते. समूहाच्या परिघात सुरक्षेचा भ्रम कायम राहतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे इतर लढ्यांना विचार महत्त्वाचा असतो. आणि अस्मितेच्या राजकारणात विचारांपेक्षा भावनेला महत्त्व असते. विचारांचा लढा दीर्घ प्रदीर्घ काळ चालणारा असल्यामुळे सामान्य माणूस अशा कोणत्याही वैचारिक लढ्याचा भाग होताना दिसणार नाही. त्याला जे काही मिळवायचे ते अत्यंत ताबडतोबीने हवे असते. अस्मितेचे राजकारण घोड्याच्या पुढे बांधलेल्या गवताच्या पात्यासारखे कार्यकर्यांना आशेवर ठेवत असते. जगात आजपर्यंत ज्या ठिकाणी अस्मितेच्या राजकारणाच्या माध्यमातून काही निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला त्याची परिणती नकारात्मकतेत झाल्याची उदाहरणे जास्त प्रमाणात आहेत. कारण अस्मिता ह्या केवळ आपल्या व्यक्तिगत पातळीवर काम करत नसून त्यात आपण सोडून इतरांना नाकारावे लागते. हे जे नाकारलेपण आहे ते स्वतःच्या ठिकाणी प्रतिशोध म्हणून त्याच स्वरूपाचा लढा देण्याच्या तयारीत समूहमन चेतवीत असणार, हे उघड आहे.




म्हणून अस्मितेचे राजकारण सर्वसमावेशक किंवा सर्वव्यापी होऊ शकत नाही. आमचे अस्मितेचे राजकारण सकारात्मक, रचनात्मक आणि देशहिताचे आहे इतरांचे सर्वस्वी त्याउलट आहे, असे कदापिही होणे शक्य नाही. बृहतार्थाने हे देशविघातक आणि देशविरोधीच असते. फरक एवढाच आहे की, त्याचे परिणाम आपणास ताबडतोब दिसत नसल्यामुळे निष्कर्ष नोंदविता येत नाहीत. उदाहरणासाठी इथला हिंदू मुस्लिम प्रश्न असेल किंवा दलित - सवर्ण समस्या असेल, बोडो - संथाल समस्या असेल, बोडो-मुस्लिम प्रश्न असेल किंवा महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न असेल. त्याची सोडवणूक अस्मिता टोकदार बनवून होऊ शकत नाही, हे उघड आहे. समस्या निवारणाचे जे शास्त्र असते त्यात अस्मितेचे राजकारण बसत नाही, हे कोणत्याही विवेकी माणसाला समजू शकते. म्हणूनच समाजात विवेकी माणसांची संख्या वाढली पाहिजे. माणूस शिकला म्हणजे विवेकसंपन्न होत नसतो. आधुनिक शिक्षणाने माणूस विवेकी होण्यापेक्षा चलाख झाला आहे. या चलाखीतूनच तो माणसांना एकत्र करण्याचे नवनवे तंत्र शोधत असतो. जोपर्यंत उत्तर आधुनिकतेचे दृश्य दुष्परिणाम आपल्यासमोर येणार नाहीत, तोपर्यंत अस्मितेचे राजकारण असेच चालू राहणार. आपण फार झाले तर त्याचे विश्लेषण करू शकू, परंतु त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग कोणता असावा, यावर मतैक्य होऊ शकत नाही. विरोधकांच्या मतैक्याभावी सत्ता स्पर्धेतील बहुतांश राजकीय पक्ष अस्मितेचे राजकारण करणार, यात शंका नाही. कारण विवेकाच्या, विकासाच्या आणि बेरजेच्या राजकारणापेक्षा अस्मितेचे राजकारण हे अधिक स्वस्त, तीव्र आणि जलदगतीने समूहमनाला संमोहित करणारे असते. समाजाच्या भ्रममूलक गतीला थोडेशे आवरते घेणे, चार शहानपणाच्या गोष्टी समाजमनावर बिंबवणे हा यावरचा उपाय असू शकतो. अन्यतः असेच जर चालू राहिले तर आम्ही भारतीय कधी काळी एकमेकांचे बांधव होतो, असे म्हणण्याची आपल्यावर वेळ येऊ शकते. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# नेत्यांचे हित कशात आहे ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतामध्ये संसदीय लोकशाही आहे. आणि संसदीय लोकशाही मध्ये बहुपक्षीय व्यवस्था केलेली आहे. म्हणूनच आपण बघतो देशामध्ये छोटे मोठे अनेक पक्ष निर्माण झाले आहेत. काही पक्ष प्रादेशिक आहेत तर काही पक्ष राष्ट्रीय आहेत. बऱ्याच पक्षाचे सरपंच सुद्धां निवडून येत नाहीत अशा पक्षाचे नेते नावा अगोदर राष्ट्रीय लावतात. काही नेत्यांच्या सभेला गर्दी असते परंतु मतपेटी रिकामी असते. काही लोक एका तिकिटावर निवडून येतात आणि काम दुसऱ्याच्या तिकिटाचे काम करतात. सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की बहुपक्षीय व्यवस्था असल्याने गल्लीत कोणी ओळखत नाही पण राष्ट्रीय नेते बनले आहेत. बर एवढे मोठे पक्ष आणि एवढे मोठे नेते आहेत. सर्वच पक्षाचे सर्वच नेते तर निवडून येऊ शकत नाहीत. काही काही पक्षाचे तर डिपॉझिट सुद्धा जप्त होते एवढी ताकद त्यांच्या मध्ये आहे.**

शेकडो पक्ष हजारो नेते पण कार्यकर्ते कोणते? बर एवढे पक्ष तयार झाले, एवढे नेते तयार झाले याच्या मागचे नेमके कारण काय? जनसेवा, राष्ट्रसेवा, ग्रामीण विकास, पर्यावरण, पाणी, उर्जा, दळणवळण शिक्षण, आरोग्य, रोजगार मिळवून देण्यासाठी राजकीय पक्ष निर्माण करून नेते तयार झाले का? असा प्रश्न ग्रामीण भागातील जनतेला जरी विचाराला तर ते ग्रामीण भाषेमध्ये समजेल असे उत्तर देतात. खरं पाहिले तर बहुपक्षीय व्यवस्था लोकशाही मजबूत करून विकासासाठी पोषक परिस्थिती निर्माण करत असते. राजकारण सर्वांगिन विकासाचे द्वार उघडणारी महत्वाची चाबी आहे. पण आज परिस्थिती उलटी झालेली दिसत आहे. कोणताही पक्ष सहज उभा राहिला अस तर कधीच झाले नाही. पक्ष उभा करण्यामागे खुप मोठी मेहनत असतेच हे कोणी नाकारू शकत नाही. पक्ष उभा करतांना अनेक कठीण परिस्थिती चा सामाना करावा लागतो. जनतेत जाऊन जनतेच्या समस्या जाणून घ्याव्या लागतात. त्या कशा सोडवता येतील यावर विचार करावा लागतो, काही समस्या सोडवण्यासाठी आंदोलने करावे लागतात. वेळप्रसंगी जेल मध्ये जावे लागते. अनेक लोकांचा विश्वास संपादन करावा लागतो. तेव्हा कुठे पक्षाची कल्पना डोक्यात येते मग जनहीताचे मुद्दे घेऊन पक्षाची घटना तयार करून पक्ष निर्माण केला जातो. प्रत्येक निवडणुकी मध्ये उमेदवार उभा करायचा तर पक्षाचा निवडणूक अजेंडा तयार करून तो गावागावातच नाही तर लोकांच्या मनामनात पोहचावा लागतो. तेव्हा कुठे लोक नेता मानायला तयार होतात. त्यातही काही पक्षाला चांगला पाठिंबा मिळतो तर काही पक्षाला योजके लोक जोडले जातात पण एकदा पक्ष निर्माण झाला की नेता हवेतच असतो. मागे जनतेचे समर्थन वा नोंदणी कृत सदस्यांची संख्या जरी नसली तरी त्या नेत्याला निवडणुकी पुरता का होईना पण भाव येतो. स्वतः उभा राहीला डिपॉझिट ही जप्त होते तो भाग वेगळा असतो. निवडणूक झाली की बहुमत आलेल्या पक्षाचे सरकार स्थापण होते, ज्यांचे बहुमत तयार नाही असे पक्ष विरोधी पक्ष म्हणून काम करत असतात. आता जास्त उमेदवार निवडून आलेले सत्तेत असतात, कमी उमेदवार निवडून आलेले विरोधी पक्ष म्हणजे सरकार जे काम करते त्या कामावर लक्ष ठेवण्याचे काम विरोधी पक्षाचे असते. आणि ज्यांचे उमेदवार निवडून येतच नाहीत ते लोक निवेदन देऊन सरकारला कोणती कामे करायचे हे लक्षात आणून दिले जाते.

उमेदवार वा पक्षाचा नेता हा जनसेवक असतो आणि तो जनतेला उत्तर देण्यासाठी कटिबद्ध असतो. जनहीत आणि जनसेवा ह्याच मुद्यावर कोणत्याही नेत्यांचे अस्तित्व असते. आपल्या मतदार संघातील लोकांशी संपर्क करून त्यांच्या हिताचे निर्णय व कामे करण्याची जबाबदारी लोकशाही मध्ये नेत्यावर असते. लोकांच्या समस्या सुटल्या नाही तर आपल्या नेतृत्वाला धोका निर्माण होऊ शकतो म्हणून तात्काळ जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी नेता प्रयत्न करुन स्वतः चे अस्तीत्व दाखवण्याचा प्रयत्न करत असतो. जनतेचे मत मिळाले पाहिजे म्हणून जनतेच्या हिताचे कामे झाले पाहिजे हा मुख्य हेतू संसदीय लोकशाही चा आहे. परंतु आजची परिस्थिती पाहली तर नेते मत न बघता नोट बघताना दिसत आहेत. जनतेचे मत मिळो या ना मिळो पण नोटा मिळाल्या पाहिजे. प्रत्येक पक्षाला एक विचार धारा असते, एक तत्व असते परंतु सत्तेची व सत्तेतून मिळणाऱ्या पैशाची लालसा नेत्यांना विचार व तत्वाशी तडजोड करण्यासाठी भाग पाडतात आणि मग अडचणीत सापडतो तो समाज जो एका विचारावर, तत्वावर विश्वास ठेवून नेत्याकडे आणि पक्षाकडे आकर्षित झालेला असतो. हल्लीची परिस्थिती बघितली तर अनेक पक्ष नेते सत्तेच्या व पदाच्या लालसेपोटी जनतेचा विश्वास घात करून विरोधी विचारधारेच्या पक्ष व नेत्यांसोबत हात मिळवणी करून मिळेल तेवढे घेऊन स्वहीत साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. आणि म्हणून समाजाच्या समस्या जसे शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई वाढत आहेत. जनतेला मुलभूत सुविधा देखील मिळत नाहीत. जनतेच्या विकासाचा पैसा निवडणुकीत झालेला खर्च व त्यावर कमाई करण्यासाठी केला जातो. यात नेतेच दोषी आहेत असे नाही तर जनता सुद्धां तेवढीच जबाबदार आहे. निवडणूकीच्या वेळ पैसा दारु घेऊन मत देणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. मग एखादा नेता मतासाठी पैसा खर्च करत असेल तर तो निवडून आला की अगोदर खर्च झालेला पैसा वसुल करण्याचा प्रयत्न करतो. म्हणून जनहिताचे काम होण्यास विलंब होतो किंवा होतही नाहीत मात्र निधी खर्च झालेला असतो. कामाला हातही लावलेला नसतो. आज आपण विचार केला तर विरोधात बोलणार कोणता नेता दिसत नाही. एकीकडे निवडून आलेले दुसरी कडे जाऊन सरकार स्थापन करतात आणि तिसऱ्यालाही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष त्यात सहभागी करून घेतात व सगळ्यांना ऐपतीप्रमाणे खायला देतात त्यातही एखाद्या नेत्याला कमी दिले दुसऱ्याला जास्त दिले म्हणून एकमेकांवर नाराज होणे, पाठींबा काढून घेण्याचे वक्तव्य करणे अशाप्रकारचे कृत्य केले जाते. सध्या असा एकही नेता दिसत नाही की जनतेचे काम होत नाहीत म्हणून नाराज होईल, पाठींबा काढून घेईल. परंतु मंत्रीपद, खाते, आणि वरुन भर भक्कम निधी मिळाला नाही तर रुसवे फुगवे देशाला व जनतेला वेगळे नाहीत. सत्तेत असेलेले नेते अजून जास्त काही मिळेल म्हणून दुसरी कडे जातात आणि फक्त लाभासाठी दुसऱ्याच्या दारात बसतात, अस्तित्व तर शुन्य झालेले असते. स्वतः चे घर सोडून दुसऱ्याच्या ओसरीत बसणारे नेते खरचं जनहीताचे निर्णय घेऊन जनकल्याण करतील का हा महत्त्वाचा प्रश्न आहे आणि. आणि दुसरी गोष्ट म्हणजे स्वतः चे घर सोडून दुसऱ्याच्या ओसरीत बसुन स्वतःच्या घरालाच नावे ठेवणाऱ्यांना ओसरीवाला घरात घेऊन स्वतःच्या घराला आग लावणार नाही. काम झाले की ओसरीमधुनच बाहेरचा रस्ता तो दाखवल्या शिवाय राहणार नाही. कारण जे घर स्वतः मेहनत करून निर्माण केले जर फक्त स्वार्थासाठी सोडले असेल तर फुकटच्या घरात कोणीच आसरा देत नाही हेही सत्यच आहे.



काही नेते तर संविधानाला जिव कि प्राण समजतात आणि जे लोक संविधान बदलण्याची भाषा करतात त्यांच्या मांडीला मांडी लाऊन बसतात याचा अर्थ त्यांना संविधान, जनता, व जनतेच्या समस्या महत्वाच्या नसुन मांडीला मांडी लाऊन बसले तर थोडेफार तरी काही मिळेल या आशेने बसतात. जनतेच्या भावना व विश्वास याला नेते काहीच किंमत देत नाही. त्यांच्या मनात येईल तसे निर्णय घेतात कोणासोबतही जातात, निर्णय घेताना इतरपक्षांसोबत जाताना पक्षाचे जे कार्यकर्ते आहेत त्यांनाच न विचारता पक्ष बदलने, युती करणे म्हणजे लोकशाही चे विचार व कार्यकर्त्यांची अस्मिता पाई तुडवणे होय. स्वतः ला पुरोगामी समजून, तळागाळातील पुरोगामी लोकांना मीच तुमचा नेता आहे असे सांगायचे आणि हळूच प्रतिगामी विचार सरणीच्या पक्षाशी हातमिळवणी करायची यातून पुरोगामी जनता तर दुर होतेच मग फायदा आहे कोणाचा तर आणि फक्त नेत्यांचा. जनतेला आपल्या मताची किंमत कळाली नाही, मतदार हा साक्षर झाला नाही जनतेच्या हिताच्या नावाखाली नेते मंडळी स्वहीत साधुन घेत आहेत. ज्याला जेवढे मिळेल तेवढे मिळण्यासाठी एकमेकांच्या घराच्या पायऱ्या झिजवत आहेत. कारण त्यात नेत्याचे हित आहे. निवडून आलेला उमेदवार सत्तेत असो वा विरोधी पक्षात स्वतः ची संपत्ती शंभर टक्के वाढते. आरोग्य, रस्ते, शिक्षणासाठी न बोलणाऱ्या नेत्यांच्या शाळेच्या इमारती मोठ्या होतात, पथसंस्था मोठ्या होतात, हॉटेल्स मोठ्या होतात परंतु जनतेची कामे वर्षानुवर्षे तशीच रखडली जातात. म्हणजे नेते सत्तेत असो विरोधात दोघही मिळून लुटतात आणि जनतेला विकास व प्रगती पासून दुर ठेवतात. मोठमोठ्या नेत्यांच्या मुला मुलांची लग्न धर्म जात न बघता केली जातात, परंतु सर्वसामान्य लोकांना जाती धर्माच्या विरोधात भडकवुन समाजात द्वेष निर्माण केला जातो. सत्तेत मात्र मिळुन खायला जमते. तसे नसते तर कट्टर हिंदुत्ववादी पक्षासोबत मुस्लिम नेता कशासाठी गेला असता. जनहित कि वैयक्तिक हित हे नव्याने सांगण्याची गरज नाही. लोकशाही मध्ये कोणताही निर्णय हा लोकांनी घ्यायची असतो. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्यावर मनमानी करून मतदाराचे मत दुसऱ्या च्या दावणीला बांधायचे नसतात पण हल्ली तसे होत आहे कारण त्यामध्ये नेत्यांचे हित दडले आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जैन तीर्थाला 'पर्यटनक्षेत्र' करण्याचा धूर्त डाव ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**झारखंड राज्यातील पार्श्वनाथ पारसनाथ टेकडीवर असलेल्या जैन समुदायातील 'सम्मेद शिखरजी' या तीर्थक्षेत्राला झारखंड सरकारने 'पर्यटनक्षेत्र' म्हणून घोषित केले.या निर्णयामुळे जैन समाज संतप्त झाला.शांतताप्रिय असलेला समाज रस्त्यावर उतरला होता.पण या प्रकरणात झारखंड सरकारने हटवादी भूमिका जाणीवपूर्वक घेतली. अखेर केंद्रातील भाजपा व मोदी सरकारने जैन तीर्थक्षेत्राला पर्यटन दर्जा देण्याच्या निर्णयावर बंदी घातली. त्यामुळे 'झामुमो'सरकारचा धूर्त डाव उधळला गेला. भारतात जैन समाजाची लोकसंख्या २०११ जनगणेनुसार केवळ ०.४ टक्के आहे. समाजातील साक्षरतेचे प्रमाण ९४ टक्के आहे.**

समाजाची लोकसंख्या कमी असूनही २४ टक्के लोक आयकर भरतात. देसासाठी या समाजाचे योगदान महत्वाचे आहे.जैन समाजात अनेक श्रीमंत व मोठी माणसे होऊन गेली व आहेत.यात म.गांधीजींचे अध्यात्मिक गुरू श्रीमद रामचंद,कर्मवीर भाऊराव पाटील,व्ही.शांताराम,इस्त्रोचे संस्थापक विक्रम साराभाई, प्रसिध्द उद्योगपती गोदाम अदानी,व्ही शांताराम,विंग कमांडर अभिनंदन वर्धन अशी मोठ्या व्यक्तींची यादी फार आहे.जैन समाजातील व्यक्ती श्रीमंत होण्याचे मागे पाच आदर्श पाळले जातात. यात शिकेल तो टिकेल,पेराल तेच उगवेल,साधी राहणी,आणि उच्च विचारसरणी, एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथे,आणि जगा आणि जगू द्या,अशी आहेत. जैन धर्म हा एक प्राचीन धर्म आहे. जैन धर्म म्हणजे,'जीनने उन्नत केलेला धर्म' जे 'जीन' चे अनुयायी आहेत.त्यांना जैन म्हणतात. जीन हा शब्द 'झी' धातूपासून बनला आहे.'झी' याने विजयी.जैन धर्मात पाच महातत्वे आहेत,त्यात अहिंसा,सत्य,अलोय (चोरी) अरिग्रह आणि ब्रह्मचर्य असे आहेत.धर्माचे ज्ञान देणाऱ्यास धर्मोपदेशक किंवा तीर्थकर म्हणतात.धर्माच्या मान्यतानुसार एकूण २४ तीर्थकार होऊन गेले.यात पहिले तीर्थकर ऋषभदेव व शेवटचे वर्धमान महावीर होत.जैन धर्माचे बारा तीर्थक्षेत्र आहेत.त्यात सम्मेद शिखरजी अयोध्या,कैलासपर्वत, वाराणशी, तीर्थराज कुंडलकर,पावापूर,गिरनार पर्वत,श्रावणबेलगोला, चंपापूरी, बवनगजा,चांदखेडी,पालितावा,हे आहेत.

झारखंड राज्यातील गिरिडोह जिल्ह्यात सर्वात उंच पारसनाथ पर्वत आहे.हि पर्वत सुमारे १२ हजार ५०० एकरात पसलेला आहे.हिंदु धर्मात काशी क्षेत्राला महत्व आहे.त्याप्रमाणे सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्र महत्वाचे मानले जाते.जैन धर्माचे संस्थापक ऋषभदेव होते.नंतर अजितनाथजी हे तीर्थकर झाले. त्यांनी दिव्य प्राप्तीसाठी येथे तपस्या केली,येथेच त्यांना मोक्ष प्राप्त झाला.या ठिकाणी चोवीस तिर्थकरांपैकी वीस तीर्थकरांना येथे मोक्ष प्राप्त झाला. या पवित्र तीर्थक्षेत्राच्या दरवर्षी लाखो भाविक येत असतात.पर्यावरण संवेदनशील कायदा १९८६ नुसार व समितीच्या अहवालानुसार केंद्रातील भाजपा सरकारने पारसनाथ पर्वत परिसर ईको सेसिंटिव्ह



झोन (ECO SENSTVIE ZONE ) २०१९ मध्ये अधिसूचना काढली.त्यानुसार परिसरात उद्योग, खाण,खणिज बंदी,मोठ्या इमारती, मोठी धरणे,यावर आदीवर निर्बंध असतात.पण शेती पुरक उद्योग,साखर कारखाने,नदी बांधारे,कुटीर व लघु उद्योग,प्रदुषण नसणारे उद्योग आणि पर्यटन व्यवसाय करण्यास मुभा आहे.याचा आधार घेवून २०१८ मध्ये झारखंड राज्याचे भाजपाचे तत्कालिन मुख्यमंत्री रघुदार पारसनाथ पर्वताच्या पर्यटनाचा प्रस्ताव पाठविला होता,असे झोमुमो नेत्यांचे म्हणणे आहे.राज्यात झारखंड मुक्ती मोर्चाचे सरकार व हेमंत सोरेन हे मुख्यमंत्री झाले.या सोरेन यांचेवर नुकतेच भाजपाने खाण घोटाळ्याचे आरोप केले. यामुळे त्यांचे सदस्यत्व व मुख्यमंत्रीपद धोक्यात आले होते.महाराष्ट्रात शिवसेनेचा मोठा गट भाजपाला मिळालेला होता.यातून महाविकास आघाडीचे सरकार कोसळले,अशी झारखंडमध्ये घडेल,याची भीती झामुमो नेत्यांना होती तेंव्हा सोरेन यांनी आमदारांना राचीहून रायपूरला सुरक्षितस्थळी नेण्यात आले.पण सोरेन न्यायालयामुळे ते सत्तेत राहिले. याघटनेमुळे भाजपा व सोरेन यांच्यात कुटूता निर्माण झाली. 'झामुमो' सरकारने २६ फेब्रुवारी २०२२ मध्ये पारसनाथ पर्वताच्या पर्यटन क्षेत्राची अधिसूचना काढली.जगात पर्यटनबाबतीत भारत हा ८ व्या क्रमांकावर आहे.२०१९ च्या आकडेवारीनुसार भारताच्या 'जीडीपी'मध्ये पर्यटनाचा ३ टक्के वाटा आहे.यात सुमारे १० कोटी रोजगार या क्षेत्रातील



आहेत. या पर्यटनातून सुमारे १४ हजार कोटीचे उत्पन्न मिळते.करोनाच्या काळात पर्यटकाची संख्या घटली होती.आता यावर्षी पर्यटकांची संख्या १ कोटी १० लाखाच्यावर जाईल असा अंदाज आहे. अनेक राज्यात पर्यटक जातही नाहीत.पर्यटन क्षेत्रामुळे राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल, तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात,हा झारखंड राज्याचा प्रयत्न असावा.पण जैन समाजाच्या तीर्थक्षेत्रावर डोळा कश्यासाठी?इतर महत्वाचे स्थान होतेच.झारखंड सरकारचा पर्यटन निर्णया घेतल्याने जैन समाजात संतापाची लाट पसरली.झारखंड सरकारने पर्यटनाची अधिसूचना मागे घ्यावी,अशी मागणी केली गेली. पण त्याकडे राज्य सरकारने दुर्लक्ष केले.या मागणीसाठी जैनमुनी सुज्ञेयसागर यांनी अन्नत्याग करून प्राणत्याग केला.जैन तीर्थ क्षेत्राला पर्यटनस्थळाचा दर्जा दिल्याने या ठिकाणी असंख्य पर्यटक येतील, त्यांचेवर कोणतेही निर्बंध असणार नाहीत.या परिसरात मास, दारू, आणि नाचगाणे,आदीचा बाजार भरला जाईल.यातून मग सम्मेद शिखरजी तीर्थक्षेत्राचे पावित्र्य धोक्यात येईल,असे जैन समुदायांचे म्हणणे होते.देशातील शांतताप्रिय असलेला जैन समाज मात्र लाखोंनी रस्त्यावर उतरला.अनेक शहरात निषेध मिरवणूका निघाल्या.महाराष्ट्रातही मुंबईत मोर्चा निघाला होता. पण कोठेही किरकोळ हिंसाचाराची घटना घडलेली नाही,हे विशेष आहे पण यावेळी झारखंडचे मुख्यमंत्री सोरेन यांनी केंद्रातील भाजपाला लक्ष्य केले,त्यांनी हट्टवादी भूमिका घेतली. केंद्रातील भाजपा सरकारने जैन समाजाची माफी मागावी,व अधिसूचना मागे घ्यावी,अशी मागणी केली. वास्तविक झारखंड सरकारला पर्यटन क्षेत्राची अधिसूचना मागे घेता आली असती.तसेच सम्मेद शिखरजी तीर्थस्थळ हे धार्मिकस्थळ म्हणून घोषित करता आले असते. पण त्यांनी यात राजकारण आणले.देशात पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार अनेक निर्णय घेण्यात आले. २०१४ मध्ये देशातील सहा राज्यातील सुमारे ५६ हजार ८२५ स्वे. कि.मी. संवेदनशील घोषित केली होती.यात कर्नाटक, तामीळनाडू, गुजरात, गोवा,केरळ आणि महाराष्ट्रातील १७ हजार ३४० स्वे.कि मी.चा समावेश होता.त्यामुळे त्याभागात नवीन कोणतेही प्रकल्प हाती घेण्यात येत नाहीत. पुणे येथील बारा ज्यार्तिलिंगापैकी भीमाशंकर परिसरातील लोकांनी विरोध केला होता.तसेच केरळ व तामिळनाडू राज्य सरकारने विरोध केला होता. या संवेदनशील प्रकरणावरुन 'झामुमो' व भाजपा नेत्यात आरोप -प्रत्यारोप सुरु झाले.यावेळी कॉंग्रेस नेते सोरेन यांच्या बाजूने किल्ला लढवत होते. या राजकीय संघर्षात मात्र जैन समाजाची कोंडी झाली.गुजरात राज्यात महातीर्थ शत्रुजंय या पवित्र ठिकाणाला अवित्र करण्याचा व पादुका खंडित करण्याचा प्रयत्न झाला. यावरून जैन समाज नाराज झाला होता.पण गुजरात सरकारने त्वरित कारवाई करून व एकास अटक केली.त्याठिकाणी पोलिस चौकी निर्माण केली व तीर्थस्थळाचे पावित्र्य कायम रहावे यासाठी विविध उपाय योजना सुरु केल्या. त्यामुळे जैन समाजाला दिलासा मिळाला.पण झारखंडचा विषय सुटत नव्हता. जैन समाजाच्या प्रतिनिधींनी केंद्रिय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेतली.झारखंड सरकारचा पर्यटन विकासाचा नियोजित २५० पानाचा आराखडा असल्याचा सांगितले.केंद्राने दि.५ जानेवारी २०२३ काही तासात केंद्राने अधिसूचना काढून तीर्थक्षेत्र सम्मेद पारसनाथ पर्वतावरील शिखरजी पर्यटनावर बंदी घातली.तसेच अधिसूचनेनुसार २०१९ अधिसूचनेच्या च्या खंड(३) मधील तरतुदीला बंदी घातली.तसेच पर्यटन व इको टुरिझमच्या कामाला त्वरित बंदी घालण्यात आली.तसेच केंद्राने एक समिती गठीत केली. समितीत राज्यात जैन समुदायाचे दोनगु प्रतिनिधी असणार आहेत.याबाबत झारखंड राज्य सरकारने त्वरित पाऊले उचलवावी,असे निर्देश केंद्राने दिले. केंद्र सरकारने तातडीने निर्णय घेणार नाही,असे वाटत होते.यामुळे सोरेन यांनी जैन समाज हा भाजपा विरोधात जाईल, हा जो धूर्त डाव खेळला.पण तो केद्राने अखेर उधळून लावला.केंद्राच्या या निर्णयाचे जैन मुनी व समुदायाने स्वागत केले.या घटनेतील केंद्रातील भाजपा व मोदी सरकार हे संवेदनशील असून ते अल्पसंख्याक विरोधी,कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही,हेच स्पष्ट झाले आहे.

# वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणातील गणिताचार्य: देवेंद्र फडणवीस



कॉ. के.के. जामकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**कुठल्याही विषयात आचार्य म्हणून मिळालेली पदवी ही नावलौकिक व बहुमानास पात्र असते. सहजासहजी कुणीही आचार्य होवु शकत नाही त्यासाठी लागते ती ज्या-त्या विषयातील उच्चकोटीची बुद्धी पारंगतता, अशी उच्च कोटीची बुद्धी कौश्यलता व त्यातील पारंगतता ज्या व्यक्तीमत्वाच्या ठायी असते तीच व्यक्ती आचार्य म्हणून संबोधल्या जाते. मित्र हो, प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत वेगवेगळे विषय अभ्यासक्रमात असतात त्याचप्रमाणे गणित हा विषय विषयही असतोच जो इतर विषयाच्या तुलनेत शंभरपैकी शंभर गुण विद्यार्थ्याला मिळवून देवू शकतो पण त्यासाठी लागते ती अचुक व निष्णात अशी बुद्धीमत्त जी सर्वसामान्य विद्यार्थ्यात असतेच असे नाही म्हणूनच गणित या विषयात शंभरपैकी शंभर गुण घेवुन प्राविण्यासह उत्तीर्ण होणारे विद्यार्थी हे अेक्के-दुक्केच आढळतात. तसे मी कुठल्याही विषयातला तज्ज्ञ नाही पण सरस्वती प्रेम व भक्ती पोटी वेगवेगळ्या विषयाचे शब्द वेध घेवू शकतो. तसा गणित हा विषय इतर विषयाच्या तुलनेत मानला तर सोपा नाही तर अवघडच. या विषयात इतर विषयांपेक्षा अेक मोठी गम्मत असते यात दोन पद्धती असतात अेक गणिताची रित आणि त्याची सोडवणूक करत असताना त्याचे येणारे अचूक उत्तर, या दोन्ही बाबी जर बरोबर असतील तरच या विषयात शंभरपैकी शंभर गुण मिळतात. यातला एक जरी प्रकार चूकला तर तो शंभरटक्के गुणास पात्र होत नाही. विषय तसा अवघड व डोकेखावु असल्यामूळे बहुतांश विद्यार्थी या विषयाच्या फंदात पडत नाहीत म्हणजेच त्यांना शंभर टक्के गुण मिळत नाहीत हे नक्किच.**

नेमके गणित विषयानुरुप प्रकार प्रदिर्घ कालावधीनंतर महाराष्ट्राच्या " राजकारण" या विषयात आपण बघत आहोत. तसे "राजकारण " हा विषय कुठल्याही शालेय अथवा महाविद्यालयीन अभ्यासक्रमात शिकविला जात नाही. "राजकारण" या विषयाचे बाळकडू केवळ त्या क्षेत्रात काम करत असतांना फक्त करत असलेल्या क्षेत्राच्या अनुभव या अभ्यासक्रमातुनच व्यक्तीपरत्वे मिळत असते. हे राजकारणरुपी विषयाचे ज्ञान पारंगततेसाठी लौकीकास पात्र असणाऱ्या व्यक्तिमत्वाचा सहवास व सहभाग फारच महत्वाचा असतो त्याशिवाय प्राप्त परिस्थिती कशी कौशल्यपूर्ण हाताळावी याचा अभ्यास व जाण असणे गरजेचे असते. तसा गणित हा विषय आकडेवारी स्पष्ट करणारा असल्यामुळे त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही पण राजकाणातील गणितासारख्या आकडेवारीत देवेंद्रजी मात्र अव्वल स्थानि असुन ते राजकारण या विषयात रीत व उत्तर नेहमीच 100% बरोबरच सोडवतात हे सर्व झाले थोडक्यात गणित पुराण.

आता आपणास वर्तमान राजकारणातील गणिताचार्य या विषयाकडे वळायचे आहे त्याचे असे की, आजपर्यंतच्या आपल्या भारतीय राजकारणात अनेक धुरंधर झाले पण राजकारणातील गणिताचार्य बोटावर मोजण्याइतकेच ज्याची भुतकाळापासून इतिहासात साक्ष आहे. आजवर जे काही राजकारणात गणिताचार्य झाले त्यांना सर्वानाच "आचार्य" ही पदवी देता येणार नाही कारण त्यांची राजकारणरुपी गणित या विषयातील रीत जरी बरोबर आली किंवा उत्तर चुकले म्हणजेच त्यांना शंभरपैकी शंभर गुण न मिळाल्यामुळे ते "राजकारणाचार्य" या संज्ञेस पात्र ठरु शकले नाहीत. पूर्विच्या काळी राजे महाराजे यांचे दरबारी विदुर, चाणक्य, बिरबल, मोरोपंत यासारखे अनेक महाबुद्धीमान, विद्वान कारभारी राजदरबारी अगदी प्रामाणिकपणे सर्व बाबीचा तोल सांभाळुन राजाला राज्यकारभार करण्यासाठी निष्ठा व प्रामाणिकपणे काम करत. राजकारणातील सर्व खाच खळगे याचे त्यांना परिपूर्ण ज्ञान असल्यामूळे राजकारभार सुरळीत चालविण्यासाठी मार्गदर्शक म्हणून त्यांचा "राजदरबारी मुख्य" म्हणून बहुमान असे त्यामूळे राज्यकर्ते निवांत असत. प्राप्त परिस्थिती हाताळण्याचा कौशल्यपूर्ण ज्ञानासह भविष्याचा अचूक वेध, राजकारभाराची दशा-दिशा ठरविण्याचे व हजरजवाबीपणे राहुन कारभारात सुसुत्रता आणण्याचे काम त्यांच्याकरवी होत असल्यामूळे ते निष्णांत तज्ञ म्हणून ओळखले जावून "आचार्य" सारख्या पदविस यथार्थ ठरत असत. नेमकी अशीच स्थिती वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणातील अेका "आचार्या" ची आहे. आणि ते आचार्य म्हणजे वर्तमान शिंदे सरकारमध्ये उपमुख्यमंत्री पदी कार्यरत असणारे असेच सर्व गुणसंपन्न व्यक्तिमत्व म्हणजेच "देवेंद्र फडणवीस" जे तत्कालीन मुख्यमंत्री पद उपभोगणारे असून



देखिल आज उपमुख्यमंत्री पदाची धुरा अगदी आचार्य या विषेणाला शोभेल अशीच सांभाळत आहेत म्हणून त्यांना वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणातील "राजकारणाचार्य" म्हणून संबोधण्यास संदेह नसावा. तसे देवेंद्र या नावातच सर्व काही दडलेले आहे. देवेंद्र म्हणजे देवांचा राजा असे म्हणतात परंतु देवांचा राजा होण्यासाठी जेवढी पात्रता लागते तेवढी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात नक्कीच आहे.

प्रश्न कुठलाही आणि कितीही जटील अथवा संवेदनशील असो त्यातुन नक्कीच मार्ग निघणार. परवाच विधानसभेचे हिवाळी अधिवेशन नागपुरात पार पडले. या महाशयांनी अधिवेशन काळात बहुतांश प्रश्न अनुभव व बुद्धीकौशल्य पणाला लावुन विरोधकांची बोलतीच बंद केली. विरोधकांच्या प्रत्येक प्रश्नाला अगदी यथार्थ व अचूक पुराव्यानिशी उत्तरे देऊन त्यांची गळचेपी केली. "खोटे बोल पण रेटून बोल" या उक्तीप्रमाणे विरोधकांनी चहा-पाण्यापासुन बहुतांश प्रश्नावर गोंधळ घालून जनतेच्या प्रश्नाचा व पैशाचा चुराडा नक्कीच केला.

" हम भी कुछ कम नही" या वाक्याप्रमाणे शेवटी तात्वीक विरोध नोंदविण्याऐवजी विरोधासाठी विरोध विरोधकांनी नक्कीच केला असे जनमत कानोस्यावरुन स्पष्ट होते. राजकारभारात अनेक जनहिताचे संवेदनशिल प्रश्न असतात त्यात विचारपूर्वक व अभ्यासूवृत्तीने निर्णय घेऊन जनहित साधावे लागते याचे भान विरोधकांना रहात नाही ही भारतीय लोकशाहीची मोठी शोकांतिकाच म्हणावी लागेल. नुकतेच कर्नाटक सिमावाद, विद्युत खात्याचा बेमुद्दत संप हे ऐकून महाविकास आघाडी काळातील एसटीचे भरकटलेले आंदोलन बघुन महाराष्ट्रीयन आम जनता मेटाकुटीला आलेली असताना देवेंद्रजीनी अतिशय संयमी व प्रामाणिकपणे हे प्रश्न हाताळून जनतेसह आंदोलन कर्त्याला नक्कीच दिलासा देऊनआपली बाजू भक्कम बनविली. अशी अनेक प्रकरणे व उदाहरणे या व्यक्तिमत्वाबद्दल जनतेच्या कायम आठवणीत आहेत. म्हणुन महाराष्ट्राच्या राजकारणात एक संयम्मी व अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणुन त्यांची आगळीवेगळी ओळख आहे.

"WHEN THE ROOTS ARE IN DEEP , THERE IS NO NEED TO FEAR THE WIND " जेंव्हा झाडाच्या मुळा घट्ट असतात तेव्हा त्याला कोणतेही मोठे वादळ हलवू शकत नाही.

आपल्या कार्यकर्तृत्वावर प्रमाणिक विश्वास ध्येय प्राप्तीसाठी लागणारी प्रचंड इच्छाशक्ती स्वाभिमान बुद्धीचातुर्यासारख्या अनेक गुणांचा संगम म्हणजे देवेंद्र नावाचा अथांग सागर.

केव्हा कसे वागावे, कुठल्या प्रश्नाला प्रामाणिकपणे कोणते योग्य उत्तर द्यावे, थोडक्यात जशास तसे वागून प्रसंगी लवचिक ही होवून अेक धुरंधर राजकारणी म्हणून राज्याच्या राजकारण्यावर त्यांची पकड असून ते सर्वार्थाने व सक्षमतेने कसे चालवावे याचे मुर्तीमंत स्वरुप म्हणजेच "देवेंद्र फडणीस" राजा कसा असावा, जनताभिमुख व कल्याणकारी निर्णय कसे घ्यावेत याचा संग्रह म्हणजेच देवेंद्र. त्यांच्या या लोकाभिमूख गुण चातुर्याबाबत ते सर्व जनतेच्या मनी भवतात असे जनाधारावरुन स्पष्ट होते. म्हणूनच जसे गणित या विषयात फरफेक्ट उत्तरे देवून शंभरपैकी शंभर गुण घेणाऱ्या विद्यार्थ्या गत ते वर्तमान महाराष्ट्राच्या राजकारणातील "आचार्य" या संज्ञेस निश्चितच पात्र ठरतात. "विंचु देव्हाऱ्यापाशी आला | देवपण न ठावे त्याला" येथे पैजरांचे काय काम | अधर्माशी व्हावे अधर्म" हा रामदासी उपदेश या व्यक्तिमत्वास तंतोतंत खरा ठरतो.

# स्थलांतरित मतदारांसाठी रिमोट वोटिंग मशीन



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**मतदान हा लोकशाहीचा पाया आहे कारण लोकशाहीमध्ये मतदानाद्वारेच लोक आपला प्रतिनिधी निवडतात. ज्या क्षेत्रात निवडणूक असते त्या क्षेत्रातील मतदार आपल्या क्षेत्रासाठी कोणता उमेदवार योग्य आहे, कोणता उमेदवार आपल्या क्षेत्राचा विकास करू शकतो याचा विचार करून मतदान करतात. आपल्या देशात पहिली निवडणूक झाली ती १९५२ सालची लोकसभा निवडणूक. त्यानंतर अनेक निवडणुका झाल्या. आता तर दरवर्षी कोणती ना कोणती निवडणुक असतेच.**

ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत कोणतीही निवडणूक असो मतदान करण्याबाबत आपले देशातील मतदार उदासीनच दिसून येतात. मतदारांनी भरभरून मतदान करावे, मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी निवडणूक आयोग मतदान जागृती करण्यासाठी अनेक उपक्रम राबवते मात्र असे असूनही आपल्या देशात मतदानाची टक्केवारी ६० ते ७० टक्क्यांच्या घरातच असते. ग्रामपंचायत वगळता कोणत्याही निवडणुकीत ७० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही. याला अनेक कारणे आहेत त्यातील महत्वाचे एक कारण म्हणजे मतदारांचे स्थलांतर. अनेक जण नोकरी, उद्योगानिमित्त आपले मूळ गाव सोडून दुसरीकडे राहायला जातात. स्थलांतर केले तरी मतदारांचे नाव मूळ गावाकडच्या मतदान यादीतच असते.

स्थलांतर करून दुसऱ्या गावात गेल्यानंतरही त्या गावातील मतदार यादीत त्यांचे नाव समाविष्ट होत नाही त्यामुळे इच्छा असूनही निवडणुकीच्या दिवशी ते मतदान करू शकत नाही कारण नव्या गावातील मतदार यादीत त्यांचे नाव नसते. मूळ गावाच्या मतदारयादीत नाव असूनही वेळ किंवा सुट्टी न मिळाल्याने इच्छा असूनही ते मतदान करू शकत नाही. मतदारांची ही अडचण ओळखून आता निवडणूक आयोगाने स्थलांतरित मतदारांसाठी रिमोट वोटिंग मशीन तयार केली आहे. या मशीनच्या माध्यमातून आपले शहर व राज्यापासून दूर असलेले मतदार विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकीत मतदान करु शकतील. मतदानासाठी त्यांना आता आपल्या मूळ गावी जाण्याची गरज नाही त्यासाठी त्यांना रिमोट वोटिंग मशिन असलेल्या मतदान केंद्रावर जावे लागेल. आयआयटी मद्रास या संस्थेने हे मतदान यंत्र विकसित केले असून २०२३ मध्ये होणाऱ्या नऊ राज्यातील विधानसभा निवडणुका आणि २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत हा प्रयोग करण्याचा निवडणूक आयोगाचा प्रयत्न आहे. तया निवडणुकीत जर जर हा प्रयोग यशस्वी झाला तर पुढे सर्व निवडणुकीत त्याचा वापर केला जाणार आहे. निवडणूक आयोगाने या संदर्भात नुकतेच एक पत्रक जारी केले असून राजकीय पक्ष, नेते आणि मतदारांच्या हरकती आणि सूचना मागवल्या आहेत. १६ जानेवारी रोजी निवडणूक आयोग या मशीनची चाचणी घेणार आहेत. स्थलांतरित मतदारांसाठी निवडणूक आयोगाने केलेला हा रिमोट वोटिंग मशीनचा प्रयोग स्वागतार्ह आहे. रिमोट वोटींग मशीनचा प्रयोग यशस्वी झाला तर स्थलांतरित मतदारांना मतदानाचा त्यांचा मूलभूत हक्क बजावता येईल.

मतदारांचा उत्साह वाढून मतदानाची टक्केवारी वाढेल त्यामुळे लोकशाही व्यवस्था आणखी बळकट होईल. लोकशाहीला सुदृढ करणाराच हा प्रयोग असून त्यामुळे मतदारांचा वेळ आणि पैसाही वाचेल. अर्थात हे करताना निवडणूक आयोगाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल त्यातील पहिली आणि मुख्य समस्या म्हणजे निवडणूक आयोगाला जनप्रतिनिधी कायद्याच्या नियमात दुरुस्ती करावी लागेल.



मतदारांमध्ये रिमोट वोटिंग मशीन संदर्भात जनजागृती करावी लागेल. अर्थात आपले निवडणूक आयोग याबाबत सक्षम आहे. सर्व अडचणींवर मात करून निवडणूक आयोग हा प्रयोग यशस्वी करतील या बाबत शंका नाही. मतदारही या नव्या प्रयोगाचे स्वागतच करतील. सर्व मतदारांनी निवडणूक प्रक्रियेत भाग घेऊन मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी रिमोट वोटिंग मशीनची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल निवडणूक आयोगाचे आभारच मानायला हवे.

# सिनेकलावंतांचा विलक्षण प्रवास....चित्रकर्मी



उमेश घेवरीकर
संपर्क क्र. ९८२२९६९७२३

आधुनिक केसरी

**कलाकारांच्या वाट्याला आलेली नियती विचित्र असते. ती कलाकाराच्या आयुष्यातील अनेक छोटी मोठी सुखे हिराऊन घेते, त्याची अगदी सत्वपरीक्षा पाहते, कधी टोकाचे नैराश्य,अवहेलना, वंचना त्याच्या पदरात टाकते अशा सगळ्या खडतर अग्निदिव्यातून ताऊन सुलाखून निघाल्यानंतर ती त्याच्या झोळीत यशाचे दान टाकते.याचा उत्तम मागोवा घेणारे पुस्तक म्हणजेच 'चित्रकर्मी'. 'रसिक होऊ दे दंग , चढू दे रंग असा खेळाला' ही त्याची आर्त अपेक्षा पूर्ण होण्यासाठी साता जन्माची पुण्याई पणाला लावत तो हात जोडून नियतीला तिचा संग लाभण्यासाठी व्याकूळ विनवणी करतो. सर्वसामान्यांना दिसतो तो या कलाकारांचा पैसा, प्रसिद्धी, मानमरातब आणि झगमगाट पण यामागे लपलेली त्याची वेदना, अश्रू मात्र कुणालाच दिसत नाहीत. कधी कधी तर अगदी त्याच्या कुटुंबीयांनाही !**

मोराचा फुललेला पिसारा पाहूनआनंदी होण्यासाठी सारेच आतुर असतात पण त्या पिसार्यातील झडलेल्या पिसाची विरहिणी ऐकण्यात समजून घेण्यात कुणालाच रस नसतो. कलाकार एका बेहोशीत जगत असतो. यश मिळत असत तोवर त्याचा हा कैफ हीच त्याला जीवन साधन वाटते पण यशाचा हा आलेख उतरणीला लागला की वास्तवाचे भयान रूप समोर येऊ लागते आणि मग अनेक कलाकर या सत्याला स्वीकारू शकत नाहीत. अगदी बोटावर मोजण्या इतकेच सम्यक दृष्टीकोन स्वीकारून वास्तव स्वीकारत शांतपणे आयुष्य व्यतीत करतात. आशिष निनगुरकर यांनी अशा कलंदर व्यक्तीमत्वांच्या सिनेमा क्षेत्रातील कारकीर्दीचा वेध घेताना दुर्दैवाने आज आपल्यात नसलेल्या तीस दिग्गज कलाकारांच्या आयुष्याचा पट 'चित्रकर्मी' या आपल्या पुस्तकातून घेतला आहे. बेहोशीत जगणाऱ्या कलाकरांना स्वत बद्दल फारसे काही लिहून ठेव्याची आवश्यकता वाटत नसते, पण आगामी पिढ्यांसाठी त्यांची धडपड, अनुभव, प्रवास आणि यश अपयशाचा सामना करताना त्यांनी स्वीकारलेला दृष्टीकोन मोलाचा ठरतो. हे सारे आपल्याला चित्रकर्मी या संग्रहातून भेटत राहते हे या संग्रहाचे वैशिष्ट्य ! चित्रकर्मी म्हणजे चित्रपट क्षेत्र हेच कर्म मानलेल्या कलाकरांचे जगणे मांडणाऱ्या या संग्रहाचे नाव अगदीच समर्पक असे आहे.

दुर्गाबाई खोटे, राजाभाऊ परांजपे, शरद तळवलकर, गणपत पाटील, डॉ. लागू, रमेश देव, श्रीकांत मोघे, निळू फुले, प्रभाकर पणशीकर, जगदीश खेबुडकर, प्रा. मधुकर तोरडमल, शशिकला, दादा कोंडके, अरुण सरनाईक, किशोर प्रधान, राजशेखर,रवी पटवर्धन, आशालता वाबगावकर, विजू खोटे, जयश्री गडकर, सुमित्रा भावे, इलाही जमादार, कुलदीप पवार, सदाशिव अमरापूरकर, विनय आपटे, लक्ष्मीकांत बेर्डे, विजय चव्हाण, स्मिता पाटील, सतीश तारे आणि राजीव पाटील अशा तीस हरहुन्नरी आणि प्रतिभावंत कलाकरांच्या क कारकीर्दीचा लेखाजोखा मांडताना तो वस्तुनिष्ठ, पारदर्शी आणि नितळ ठेवण्याची खबरदारी आणि जबाबदारी आशिष यांनी सहजतेने पेलेली आहे.

यातील काही कलाकरांच्या वाट्याला आलेले सन्मान वाचताना आपण मोहरून जातो आणि पुढच्याच पानावर काहींच्या वाट्याला आलेली टोकाची वंचना वाचताना हळहळतो. ऑर्गनवादक म्हणून चित्रपट सृष्टीत प्रवेश केलेल्या आणि नंतर हा माझा मार्ग एकला आणि पाठलाग अशा दोन चित्रपटांसाठी दोनवेळा राष्ट्रपतींचे सुवर्णपक मिळवणाऱ्या राजाभाऊ परांजपे यांच्या पाठलागचा मेरा साया यानावाने तर पेडगावचे शहाणेचा चाचा चौधरी यानावाने हिंदी रिमेक निघावा, बाप बेटे यासारख्या बिग बजेट हिंदी सिनेमाचे दिग्दर्शन करण्याची विनंती त्यांना दक्षिणात्य निर्मात्याने करावी, चीन येथे गेलेल्या चित्रपट विषयक मंडळात त्यांचा समावेश पृथ्वीराज कपूर, बलराज सहानी, बिमल रोय यांच्या बरोबरीने व्हावा हे वाचताना आपल्याला अभिमान वाटतो लगेचच गणपत पाटील यांच्या कलासक्त जगण्यामुळे त्याच्या खऱ्या आयुष्याची झालेली परवड त्यांच्या पत्नीला, मुलाबाळांना आलेले दाहक अनुभव वाचताना आपण गहिवरून जातो. मुलीला पहायला आलेले पाहुणे सर्वांसमक्ष त्यांना, तुम्हाला मुलगी कशी असू शकते ? असा प्रश्न विचारतात तेंव्हा त्याच्यातील बापाला काय वाटले असेल? याची आपण कल्पना देखील करू शकत नाही. डॉ. लागूंची सामाजिक बांधिलकी, शरद तळवलकर यांचा नैसर्गिक अभिनय आणि प्रत्यक्ष जीवनातही त्यांनी जपलेली मिश्किली, श्रीकांत मोघे यांची तीव्र स्मरणशक्ती, त्यांना लाभलेला पु.ल. देशपांडे यांचा सहवास,निळूभाऊ यांनी खलनायक साकारतांना प्रत्यक्ष अ आयुष्यात जपलेली माणुसकी, डॉ.घाणेकर यांच्यासह आपल्या नाटक कंपनीच्या दौऱ्यात कामगारांना सुद्धा घरच्या माणसासारखे जपणारे प्रभाकर पंत, नगर सारख्या खेड्यातून थेट मराठी आणि हिंदीचा पडदा काबीज करणारे प्रा. तोरडमल आणि सदाशिव अमरापूरकर, सलग नऊ रौप्यमहोत्सवी चित्रपट देणारे दादा कोंडके, अफलातून टायमिंगचे कौशल्य लाभलेले, मराठी सोबतच इंगजी नाटकांमध्ये रमलेले किशोर प्रधान , उस्त्फुर्त अभिनयाचा हुकमी एक्का असलेले पण अकाली काळाच्या पडद्या आड गेलेले सतीश तारे. संवेदनशील मनाचे दिग्दर्शक राजीव पाटील अशा अनेकांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनातील लहान शान गोष्टींच्या, आजवर समाजासमोर न आलेल्या नोंदी वाचताना वाचकाला नवे काही मिळाल्याची जाणिव सुखावते. असे काही. प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या कलाकारांच्या बाबत वाचकांसाठी दुर्मिळ ठरेल अशी माहिती मिळवण्यासाठी लेखकाने घेतलेली मेहनत इथे अधोरेखित होते.




६० ते ७० च्या दशकात मराठी आणि हिंदीमध्ये खल भूमिका करून अढळ स्थान प्राप्त केलेल्या शशिकला (शशिकला जवळकर, सोलापूर) या मराठमोळ्या अभिनेत्रीच्या वैयक्तिक जीवनातील हेलावून टाकणाऱ्या घटना वाचताना कलाकारांच्या आयुष्यातील करडी बाजू वाचकाला अस्वस्थ करत राहते. प्रसिद्धीच्या शिखरावर असणाऱ्या या अभिनेत्रीला मनशांती साठी चक्क मानसिक विकलांग, वयोवृद्ध याची सेवा करत थेट मदर तेरेसा यांच्या सूचनेवरून गरिबांसाठी समाजसेवा करावी लागते ही नोंद झगमगत्या आयुष्यामागीलगहिरी वेदना मांडते. अवघे ३१ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या आणि प्रतिष्ठित राजकीय घराण्याचा वारसा लाभलेल्या स्मिता पाटील यांचा कला क्षेत्रातील विलक्षण प्रवास, शबाना आझमी यांच्या सोबतचे त्यांची मैत्री आणि दुरावा, कलासक्त मनाला असलेली एकाकीपणाची जाणीव, त्यातून झालेला पण वादग्रस्त ठरलेला विवाह आणि अकल्पित अकाली शेवट लेखकाने संवेदनशीतेने मांडला आहे.

चंदेरी दुनियेत पडद्यावर दिसणारे तारेच नेहमी ओळखले जातात पण पडद्यामागे काम करणारे मात्र उपेक्षित राहतात. या संग्रहात लेखकाने मात्र गीतकार जगदीश खेबुडकर आणि गझलकार इलाही जमादार यांचा आवर्जून केलेला समावेश सम्यक ठरला आहे. खेबुडकर यांनी साथ हून अधिक संगीतकारांसाठी २७५० गाणी लिहिली असून दादा कोंडके यांच्या चित्रपटांच्या लोकप्रियतेमध्ये त्या त्यांच्या गीतांचा मोलाचा वाट आहे. “नका सोडून जाऊ रंग महाल” लिहिणारे खेबुडकर त्याच सहजतेने “अष्टविनायका तुझा महिमा कसा” लिहितात किंवा ‘ ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे' म्हणणारे तेच खेबुडकर दादांसाठी ‘कुठ कुठ जायचं हनिमूनला लिहून जातात' हा प्रवास मांडताना लेखकाने गीतरचणे मागची 'थिंकिंग प्रोसेस' मनोज्ञतेने मांडली आहे. पिंजरा साठी शांताराम बापूनी त्यांच्याकडून ११० गाणी लिहून घेतली आणि त्यातील फक्त ११ निवडली. यातील नका सोडून जाऊ रंग महाल.. निवडण्याआधी बापूंनी त्यांनी लिहिलेली ४९ गाणी नाकारली होती. ही शब्दिनष्ठा आणि संयम आज कुठेही दिसत नाही. पहिली ओळ मराठी आणि दुसरी उर्दू असा गझलेला अनोखा बंध मांडणारे इलाही जमादार या संग्रहात भेटतात ते “जखमा अशा सुगंधी” घेऊनच.

मिश्कील विजय चव्हाण , मनस्वी लक्ष्या बर्डे, बोलक्या डोळ्यांची अलका कुबल, दरारा असलेले विनय आपटे, जरब असलेले रवी पटवर्धन. खवैय्ये विजू खोटे, रुबाबदार कुलदीप पवार, दिग्दर्शनाचे विद्यापीठ ठरलेल्या सुमित्रा भावे यांना भेट , समजून घेत आपण या संग्रहाच्या शेवटाकडे येतो तेंव्हा मनात हुरहूर असते की अरे, अजून काही वाचता यायला हव होत..! वाचकांच्या मनात ही हुरहूर निर्माण करू शकणारे लेखन हेच तर सच्चे लेखन असते . जेष्ठ सिनेसमीक्षक श्री. अशोक उजलंबकर यांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे मोहमयी दुनियेत वहावत न जाता लेखन प्रेरणेशी प्रामाणिक असलेला आणि धडपड्या आशिष कडून यापुढे सिनेमा विषयक सकस लिखाणांची अपेक्षा करणे अगदीच रास्त ठरणार आहे. 'चित्रकर्मी' या पुस्तकाला आता सिनेप्रेमी वाचक, चित्रपट महामंडळ, सिनेविषयक संघटना आणि शासन यांनी पाठबळ देणे गरजेचे आहे असे नाही तर आपल्या सगळ्याचे ते कर्तव्यच आहे.

**पुस्तक- चित्रकर्मी**
**लेखक—आशिष निनगुरकर**
**प्रकाशन- सकाळ प्रकाशन, पुणे**
**पृष्ठे -१८४**
**किंमत- २९९ रुपये**

# आय लव्ह यू गूगल

आधुनिक केसरी



राजश्री कुलकर्णी, पुणे

गूगल म्हणजे सर्व काही हे वेगळं सांगायची आता गरज नाही, विश्वव्यापी अलाउद्दीनचा चिरागच म्हणा ना ! तसं पाहिले तर सध्याच्या या आधुनिक युगात खूप सारे ॲप आलेले आहेत पण GOOGLE हे एकमेव ॲप आहे ज्यामध्ये नाही असं काहीच नाही व त्यामुळे ते अल्पावधितच जगप्रिय झाले आहे कोणीही त्याच्या प्रेमात नाही हे शक्य नाही आणि प्रत्येकजणाला हा हवाच असतो. अगदी शाळेतील मुलं पण अभ्यासासाठी गूगल रेफर करतात, गूगलने माणसाच्या मेमरीचा ताण एकदम कमी केला आहे त्यामुळे सर्वजण एकदम रिलॅक्स झाले आहेत सर्व प्रश्नाची उत्तरे गूगलकडे आहेत त्यामुळे सर्वजण विद्वान झाले आहेत या आधुनिक अलाद्दीनमूळे लाखों वर्षाची संस्कृती जतन करणे शक्य झाले आहे पुर्वी हे पुस्तकांच्या माध्यमात, छायाचित्रांच्या माध्यमांतून जतन केले जायचे पण ते काही वर्षातच वातावरणाच्या प्रदूषणाने नष्ट होत होते ते आता गूगलच्या मदतीने एका जम्बो हार्ड डिस्कमध्ये सुरक्षितरित्या साठवणे शक्य झाले.

जगातील सर्व भाषांत गूगल बोलतो, त्यांचे दुःख-आनंद समजतो, त्यांच्या सर्व प्रश्नांचे निरसन करतो, त्यांच्या सर्व मागण्या पुर्ण करतो तेही विनामूल्य खरंच सर्व जगाचा एक सच्चा साथी म्हणून गूगल हे समीकरण झाले आहे आणि हे कुणीच नाकारू शकत नाही.

संपुर्ण जगाचा सर्व ड़ाटा गूगलमध्ये समाविष्ट आहे. गूगल एक असा संग्राहक आहे जिथे जगातील सर्व भाषांचा सर्व महत्त्वाचा ड़ाटा कायमस्वरूपी जतन (SAVE) करून ठेवला जातो की जे इतर कोणालाही शक्य नाही. गुगल म्हणजे अगदी घरातला एक खुप विश्वासू किंवा खुप महत्वाची व्यक्ती म्हणून जर संगितल तरिही काही हरकत नाही. आज पाहिले गेले तर प्रत्येकगोष्ट आपण गुगलवर सर्च करतो आपणास जी मदत पाहिजे त्यासाठी आपणाकडे गुगल शिवाय काही दुसरा पर्याय नाही. स्वतःला व्यक्त करणे असो किंवा कोणाच्या बाबतीत काही महिती काढून घ्यावयाची असो सर्वांचा पोर्टफोलीओ आपल्याला इथे मिळतो. घरात वापरता येणारे वास्तु पासुन वस्तूपर्यंत सगळच भेटण्याचे एकमात्र स्थान म्हणजे गुगल. मुल जन्मल्यावर त्यावर कसे संस्कार करावेत याची माहिती आई गूगललाच विचारते, पुढे त्याला चांगली शाळा, चांगले क्लासेस, कल्चरल ऐक्टिविटीज, सगळीच महिती इथे मिळते अगदी लग्नासाठी मुलं किंवा मुली शोधण्या पासुन भटजी, मंगल कार्यालय, घोडी, वाजंत्री डेकोरेशन सर्व काही ऑनलाइन मिळते. गुगलनी आपल्या सर्वांचा खुप ताण कमी केला इतकेच काय पण सध्या माणूस आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी पण इथेच व्यक्त होतो आईची माया वडिलांची छाया भावाच किंवा बहिणीच प्रेम सर्व काही गूगल. म्हणूनच आय लव्ह यू गुगल


# स्त्रीवाद आणि शिक्षण

आधुनिक केसरी

*(मागील अंकावरून)*

सन 1840, सावित्रीबाईंचा विवाह महात्मा फुलेशी झाला व तेव्हापासूनच त्यांचे शिक्षण सुरू झाले त्यापूर्वी त्या निरक्षर होत्या. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्या शिक्षिका झाल्या व फुलेंच्या कार्यात मदत करू लागल्या. त्यांनी महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील पहिल्या महिला शिक्षक व पहिल्या मुख्यद्यापिका बनण्याचा मान मिळवला. पुढे सावित्रीबाईंनीच सत्यशोधक समाजातील महिला विभागाचे नेतृत्व केले. फुले दाम्पत्यांना स्वतःचे मूलबाळ नव्हते म्हणून त्यांनी "यशवंत" ला दत्तक घेतले. या रुढीप्रिय समाजाला विकसित समाजात बदलण्यासाठी जिवंत उदाहरण पाहिजे होते म्हणून फुले दांपत्याने मुल दत्तक घेतले होते. महाभारताचे युद्ध संपल्यावर रक्तरंजित क्रुरुक्षेत्र बघून द्रौपदीने श्री कृष्णाला रागाने विचारते की हे युद्ध का होऊ दिले, तुला तर सगळं माहिती होत की कोण जगणार कोण मरणार मग का नाही थांबवलं हे युद्ध? तर कृष्ण तिला म्हणतो येणारा काळ हा कलियुग आहे त्या काळात स्त्री चे जीवन कधी नव्हते तेवढे असुरक्षित व पीडादायी असेल त्यांना धडा म्हणून हे कुरुक्षेत्राचे युद्ध आहे आणि त्या राक्षसी वृत्तीच्या लोकांच्या मनामध्ये ही भीती असली पाहिजे की एका स्त्रीवर अन्याय झाल्यास तिच्यासोबत एक पुरुष उभा असेल. अगदी तसाच धडा समाजाला देण्यासाठी ह्या दांपत्याने यशवंत ला दत्तक घेतलं जेणेकरून समाजातील लोक सुध्दा पुढे येवून मुलं दत्तक घेतील पण आज 21 व्या शतकात आम्हाला मूलबाळ झाले नाही तर आम्ही नको ते प्रकार करतो, अंधश्रध्देच्या आहरी जातो मात्र एखाद्या बाळाला दत्तक घेण्याचं धाडस आम्ही करू शकत नाही कारण त्यात आम्हाला आमचं रक्त, आमची वंशावळ दिसत नाही पण ह्या दांपत्याने हे त्यावेळी करून दाखवले ज्यावेळी हे असलं कर्म केल्यावर ह्या दाम्पत्याला समाजकंटक आणि समजघातकी म्हणून घोषित केले गेले होते. यशवंत हा एका ब्राम्हण विधवा स्त्री च्या पोटी जन्माला आलेला होता त्यामुळे त्याला कोणी लग्नासाठी मुलगी देण्याची तयारी दाखवली नाही मात्र सावित्रीबाईंनी त्याला मुलगीच शोधली नाही तर त्यांचा विवाह सत्यशोधक पद्धतीने लावून दिला. या प्रकारच्या विवाहामध्ये मंत्र म्हणण्यासाठी ब्राम्हण नव्हते, हुंडा घेतलेला किंवा दिलेला नव्हता तसेच कोणताही तामझाम नव्हता, अगदी साध्या पद्धतीने लागलेलं लग्न होत. आज आमचा PhD झालेला नवरदेव म्हणतो की माझ्या लग्नात 2 ब्राम्हण बोलवा एकाला मराठीत मंगळ अष्टक म्हणू द्या आणि दुसऱ्याला इंग्रजी मध्ये आणि चालू द्या त्या दोघांमध्ये सा रे ग म प, हळदी पासूनच Dj वाले बाबू वाजवा शेजाऱ्यांना झोपायचे नसतेच की! आणि तसेही ध्वनी प्रदूषण कुठे शिकवता PhD ला! मित्रांची खाण्याची आणि पिण्याची व्यवस्था करा गटारी रिकाम्या चांगल्या दिसत नाहीत! हुंडा तर मुळीच नको पण पोरीला सोनं, घरात वस्तू, पोरीला फिरायला गाडी एवढं तर दिलच पाहिजे! हे कोणत्या प्रकारच शिक्षण आहे ज्यामुळे समाज तर सोडाच हा PhD वाला अडाणी स्वतः शिकू शकला नाही? असो, क्रांतीज्योती जेवढ्या साहसाने जीवन जगल्या त्यांचा अंतिम काळ सुध्दा तेवढाच साहसी होता. 1896 मध्ये पुण्याला प्लेग ने वेढले. एक प्लेग ग्रस्त मुलगा ज्याची कोणी काळजी घ्यायला तयार नाही, कोण घेणार हो काळजी! प्लेग होता तो लागण झाली म्हणजे तुम्हाला कोणी येवून बघणार नाही पण स्वतःचा जीव मृत्यूच्या तोंडात देवुन सावित्रीबाईंनी ते करून दाखवलं आणि त्या मुलाची सेवा करत असताना नको तेच झालं, त्यांना देखील प्लेगची लागण झाली आणि 10 मार्च 1897 ला आमची क्रांतीची ज्योत कायमसाठी काळामध्ये विलीन झाली

महात्मा फुले यांच्यासाठी फक्त डिग्री घेणे किंवा वाचता लिहिता येणे म्हणजे शिक्षण नव्हते तर स्वतः मधे आणि समाजामधे बदल घडवून आणते तेच खरे शिक्षण. याची प्रचिती आपल्याला त्यांच्या संपूर्ण आयुष्याच्या संघर्षातून बघायला मिळते. महात्मा फुले साधे Highschool पूर्ण केलेले व्यकी त्या वेळी समाजाच्या व घरच्यांच्या विरोधात जावून पत्नीला शाळेत शिकवतात, त्या शिकलेल्या मुलीला पुढे भारतातील पहिली शिक्षिका बनावतात, हे दाम्पत्य समाजाच्या विरोधात जावून मुलाला दत्तक घेतात त्याचा विवाह साध्या पद्धतीने लावून देतात, हे खरे शिक्षण! ज्यातून बदलाव दिसून येतो आणि आजचा आमचा Post Graduate झालेला मुलगा नौकरी करणाऱ्या मुलीला चूल आणि मूल हे कसं शिकवता येईल याचे नाक्यावर आणि पारावर बसून धडे घेत असतो. MPhil वाला नौकरी लागल्यावर हुंडा कसा वाढवून मिळेल याचे संशोधन करतो आणि PhD वाला तत्वज्ञान मांडतो की स्त्रीयांना पुरुषाच्या अधिपत्याखाली कश्या पद्धतीने ठेवायचे. आमचे फुले सावित्रीबाईंना धीर देत होते की समाजाचा दृष्टिकोन बदलेल, ही परिस्थिती बदलेल, धीर धर, घाबरु नकोस आणि आज नौकरी करणारी बायको संध्याकाळी 5 नंतर 5 मिनिटे उशिरा आली की आमच्या सद्य समाजातील उच्च शिक्षित पुरुषाने तिला अगदी सहज विचारावे कुठे होतीस? का उशीर झाला? उद्या पासून वेळेत घरात नाहीतर..... आज आम्ही Graduation, Post Graduation, MPhil, PhD सारखे उच्च शिक्षण घेतो पण आम्हाला ना स्वतःला बदलता आले ना आमच्या समाजाला. एवढेच काय तर आम्ही शिक्षक म्हणून देखील शिक्षणाची पद्धत बदलू शकलो नाही. आम्ही स्वातंत्र्यापासून मुलांना शिकवतो एक पांढरा शर्ट आहे त्यावर छोटासा काळा डाग पडतो मग आपल्याला काय दिसतं? पोरं पण लगेच एकसुरात म्हणतात काळा डाग! अरे अपल्या पेक्षा ते surf excel वाले चांगले आहे समाजाला हे सांगताय की डाग चांगले आहे कारण प्रत्येक डाग वाईट काम करताना येत नाही काही डाग चांगले काम करताना देखील येतात. समजा उद्या मी रस्त्यावर अपघात झालेल्या एखाद्या माणसाला उचलून अंबुलन्स मध्ये टाकलं आणि माझ्या पांढऱ्या शर्ट ला रक्ताचा डाग लागला म्हणजे शाळेत आल्यावर पोरांनी अगदी सहज विचार करावा की सर एखाद्याचा खूण करून आले! याला कारण म्हणजे आमच्या शिकवण्याच्या पद्धती मध्ये चालू असलेले मेंढी वळण. अरे पोरांनी



नाहीच Positive विचार केला तर कमीत कमी त्यांनी प्रश्न तरी करायला हवा-काय झाले तुमच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे? ज्या नोंदी तुम्ही मूल्यमापन रजिस्टर मध्ये लिहिता 'जिज्ञासू वृत्ती जोपासतो' कुठे आहे ती जिज्ञासू वृत्ती? कशी येईल जर आपण असेच परंपरागत शिक्षण देत राहिलो तर? पोरांमधे शिक्षक म्हणून एवढा साधा बदल घडवून आणण्यामध्ये आपण असफल ठरलो म्हणून आम्ही फक्त शिक्षित सुशिक्षित व्हायचे अजून बाकी आहे! आम्ही मानाने डिगर्या मिरवणारे अडाणी आहोत ज्यांचा कालखंड हा 1800 पूर्वीचाच होता.....परंतु दुर्दैव या समाजाचे.

आपण महात्मा गांधींना अहिंसेचे पुजारी म्हणून ओळखतो. मला याठिकाणी तो लगे रहो मुन्नाभाई चित्रपटातील सीन आठवतो, त्या मुन्नाभाईला ला एक वॉचमन कानाखाली मारतो तर तो सर्किट पुढे येतो पण तो मुन्नाभाई त्याला म्हणतो "अरे बापू ने बोला है अगर कोई तुम्हारे एक गाल पे मारे तो दुसरा आगे करणे का" आणि तो हसत हसत दुसरा गाल पुढे करतो तेवढयात तो वॉचमन दुसऱ्या कानाखाली देखील आवाज काढतो तर तो सर्किट म्हणतो "भाई इसने तोह चिपका दिया!" त्यावर मुन्नाभाई लगेच त्या वॉचमन ल मारतो आणि म्हणतो "दोनों गाल पे पड़े तो आगे क्या करने का ये बापू ने नही बोला" पण बापूंनी पुढे जे सांगितल ते त्या चित्रपटाच्या लेखकाने वाचलेल नसावं, महात्मा गांधी हे सुध्दा सांगून गेले की, "जर तुमच्या मनामध्ये हिंसेचा भाव असेल आणि तुम्ही तुमची निर्बलता लपवण्यासाठी अहिंसेचे सोंग मिरवत असाल तर मग हिंसाच बरी" असा पूर्ण सत्याचा, पूर्ण अहिंसेचा मार्ग सांगणारे आमचे महापुरुष आणि त्यांची ही भूमी जिथे आम्ही जन्माला आलो आणि त्याच भूमीवर आम्ही सावित्रीबाई, महात्मा फुले व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंत्या थाटामाटात साजऱ्या करतो, त्यांच्या मिरवणुका काढतो पण जेव्हा त्यांचे विचार, त्यांचे आचार पाळण्याची वेळ येते तेव्हा आम्ही ह्या महापुरुषांना विसरतो, त्यांनी दिलेली शिकवण विसरतो.

शिक्षण म्हणजे बदल आणि शिक्षणाने समाज बदलू शकतो हे फुलेंनी 1848 मध्येच जाणले होते. परंतु आजच्या 21 व्या शतकात हे परिवर्तनाचे साधन अपूर्ण आहे याला जोड पाहिजे ती तुमच्याजवळ अधिकार असण्याची, पद असण्याची. जेव्हा एखाद्या सायबाकडून माहिती येते तेव्हा ती अधिक विश्वसनीय असते, ही मानवी डोक्याची सहज प्रवृत्ती असते. आज प्रत्येक दुसरा व्यक्ती डीग्री च्या कागदात फुटाणे खाणारा आहे त्यामुळेच परिवर्तन घडवून आणणे एवढे सोपे राहिले नाही. तुम्ही त्याला सांगा की बाबा रे दारू पिने वाईट गोष्ट आहे पिऊ नको! खूप चांगला सल्ला आहे पण त्याच्या ज्ञानाची सुरुवात कशी होते बघा- मी माझ्या पैशाची घेतो तुझ्या बापाची नाही. त्यानतंर त्याचं तत्वज्ञान- मी थोडीच घेतो आणि आजकाल सगळेच घेता आपल्याला चोरून लपून जमत नाही जे आहे ते समोर, छाती ठोकून, मला टेंशन आल की मग घेत असतो, आणि असे सगळे कारणं देवुन झाले की मग त्याचे ब्रम्हज्ञान-मेडिकल सायन्स सांगतं थोडी दारू घेतली की शरीराच्या सगळ्या क्रिया व्यवस्थित चालतात. बघा किती व्यापक आहे हे! म्हणून आज परिवर्तन थोडेसे अवघड आहे. त्यामुळेच तुमच्याजवळ एखादे अधिकाराचे पद असले की तुम्ही घडवून आणलेले बदल हे जरी त्वरित नसले तरी त्यांची जी रेंज आहे ती अधिक व्यापक असते व तुम्ही केलेला बदल हा अधिक लोकांपर्यंत पोहचू शकतो तसेच त्याचे गांभीर्यही अधिक असते.

आजच्या काळात हे अधिकाराचे पद मिळवण्याचे सर्वाधिक प्रभावी माध्यम म्हणजे Competative Exam किंवा स्पर्धा परीक्षा. त्यामुळे मी अधिकाधिक तरुणांना आव्हान करतो की त्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये उतरा आणि एखादे पद मिळवून देशाची सेवा करता करता या स्त्रियांच्या समान अधिकारांसाठी लढा. त्या अधिकाराच्या पदावरून सर्व स्त्रियांना हा संदेश द्या की पिंजरा कीतीही सोन्याने मढवलेला असेल आणि अगदी पर्वता एवढा मोठा असेल तरी खरे स्वातंत्र्य त्या पिंजऱ्याच्या बाहेर आहे.

मला याठिकाणी एवढेच सांगायचे आहे की पुरुषांनी स्त्रियांवर कोणतेही बंधन घालण्या अगोदर स्वतः वर ते बंधन घालून बघा. एखाद्याला आपण उपाशी ठेवतोय तर अगोदर स्वतः उपाशी राहून बघा! मी याठिकाणी स्त्रियांना विशेष अधिकार मिळवून देण्याचं बोलत नाही पण मी ठामपणे त्यांच्यासाठी ती समानता मागत आहे जी त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या संविधानामध्ये दिलेली आहे, जी समानता या स्त्रियांचा मूलभूत अधिकार आहे.

**अमोल मोकासे**
पिशोर, जि.औरंगाबाद

# राजवाडे युग आणि महाराष्ट्रातील इतिहास मीमांसा

आधुनिक केसरी

*(मागील अंकावरून)*

प्रेरक मूल्यांचा आदर्श प्रस्थापित केला. इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन होय.

केवळ राजकीय घडामोडी सत्तांतरासाठी कटकारस्थाने आणि युद्धे ह्यांच्याच हकिकती नव्हेत, हे त्यांचे सूत्ररूप प्रतिपादन निश्चितच व्यापक व प्रामाणिक दृष्टीचे द्योतक होते. राजवाडेंची परंपरा समृद्ध करण्याचे श्रेय आधुनिक महाराष्ट्रातील इतिहासकारांकडे जाते. महाराष्ट्राच्या तेजस्वी इतिहासाचे शास्त्रीय विश्लेषण करताना त्यांनी एक प्रखर वैज्ञानिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. कागदपत्रांचे संकलन व प्रकाशन या बरोबरच बिनचूक विश्लेषण करण्यावरही त्यांनी भर दिला. ज्ञानेश्वरीची सर्वांत जुनी प्रत संपादीत करून तिच्या व्याकरणावर त्यांनी केलेले भाष्य हे भाषाशास्त्रीय अभ्यासात नवा विक्रम नोंदविणारे ठरले. संस्कृत साहित्यातील व्युपत्ती व धातूशास्त्रावर त्यांचे भाष्य हे वैशिष्ट्यपूर्ण ठरते. इतिहासाच्या संशोधनाची समाजशास्त्रीय दृष्टीही त्यांनी दिली. वि. का. राजवाडे यांच्या अविश्रांत परिश्रमांतून साकारलेले 'मराठ्यांच्या इतिहासाचे लेणे' हे महाराष्ट्र इतिहास मीमांसेत नवयुग निर्माण करणारे ठरले यात शंका नाही. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी एका बाजूला महाराष्ट्रातील इतिहास संशोधनाची पद्धती विकसित केली तर दुसऱ्या बाजूला इतिहास संशोधनासाठी कार्य करणाऱ्या 'भारत इतिहास संशोधन मंडळ' आणि 'राजवाडे संशोधन मंडळ' या दोन संस्थांच्या उभारणीस मौलिक दिशा दिली. त्यांनी शोधलेली कागदपत्रे आणि दस्तावेज तसेच लिखित ग्रंथ यांचे प्रकाशन त्यांच्या नंतरच्या काळातील संशोधकांनी मोठ्या जिद्दीने प्रकाशित केले. धुळ्यातील राजवाडे संशोधन मंडळाच्या वतीने इतिहासाचार्य वि. का. राजवाडे लिखित समग्र साहित्य खंडरूपाने प्रकाशित करण्यात आले आहे. शिवाय वि. का. राजवाडे यांच्याविषयीचे लेखन, संशोधन यावर आधारित





३० पेक्षा अधिक ग्रंथ उपलब्ध आहेत. अद्यापही राजवाडे यांचे काही साहित्य अप्रकाशित स्वरूपात उपलब्ध होऊ शकते, तसेच त्यांनी लिहिलेल्या नियतकालिकातील लेखांचा संग्रह सुद्धा नवीन दृष्टीकोन देण्यासाठी उपयुक्त असा आहे. आरंभापासून अखेरपर्यंत राजवाडे यांच्या लेखन व चिंतनात एक प्रकारचे सातत्य दिसून येते. इ. एच. कार सारखे संशोधक 'इतिहास म्हणजे काय?' (WHAT IS HISTORY?) या व्याख्यानांतून आणि प्रकाशित ग्रंथांतून इतिहास संशोधकास समाजशास्त्राची जोड कशी आवश्यक आहे हे अलिकडे जाणीवपूर्वक प्रतिपादन करीत आहे. परंतु वि. का. राजवाडे यांनी आपल्या ऐतिहासिक संशोधनास समाजशास्त्रीय चिंतनाची बैठक अगदी प्रारंभापासून दिलेली होती. किंबहुना 'इतिहास म्हणजे समग्र समाजजीवनाचे यथार्थ दर्शन' हे सूत्र घेऊन त्यांनी मीमांसा केली. त्यामुळे वि. का. राजवाडे यांनी लिहिलेल्या प्रस्तावना, त्यांनी केलेले भाषाशास्त्रीय संशोधन, आणि त्यांच्या लेखसंग्रहांतून प्रकट होणारा त्यांचा दृष्टीकोन खरोखरच नवविचारांवर आधारलेला होता. 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ' या काव्यवचनाप्रमाणे महाराष्ट्रातील इतिहास संशोधनाची ही तेजस्वी परंपरा पाहता महाराष्ट्र इतिहास व संस्कृतीचे विवेचन करताना भविष्यकाळही तेवढाच उज्ज्वल आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी केलेले ऐतिहासिक साधनांचे संकलन आणि प्रकाशनाचे कार्य भविष्यातही तेवढ्याच निष्ठेने पुढे नेण्यात येत आहे. य. दि. फडके यांनी 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र' हे खंड प्रकाशित करून आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासाची नवीन साधनांच्या आधारे मांडणी करण्याचे कार्य केले आहे. मराठी संतसाहित्य, मध्ययुगीन महाराष्ट्र आणि आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील अनेक दुवे साधण्यासाठी आणि अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करण्यासाठी राजवाडे युगातील आरंभीचे संशोधनकार्य भावी वाटचालीसाठी दिशादर्शक ठरणारे आहे यात शंका नाही.

वि. का. राजवाडे यांची परंपरा रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई, सर यदुनाथ सरकार, डॉ. बाळकृष्ण, तसेच महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, वा. शि. बेंद्रे यांनी समर्थपणे पुढे चालविली. इतिहास लेखनशास्त्रामध्ये काय म्हटले आहे? कोणी म्हटले आहे? आणि त्याबाबत कोणती भौतिक साधने उपलब्ध आहेत? हे तीन प्रश्न महत्त्वाचे असतात.

राजवाडे यांनी या पलिकडे जाऊन समग्र समाजाच्या कल्याणासाठी आपण कोणता बोध घेतला पाहिजे याबाबत विश्लेषण केले. त्यांच्या प्रगल्भ इतिहासमीमांसेतून आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीचा पाया घातला गेला. राजवाडे यांच्या इतिहासमीमांसेतील आणखी एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे भूत वर्तमान आणि भविष्य काळ यांना एकत्र जोडण्याचे कार्य त्यांनी केले. भूतकालीन - अनुभवांच्या आधारे भविष्याची जडणघडण करण्यासाठी भावी पिढीस नवी दिशा देण्याचे सामर्थ्य त्यांच्या इतिहास लेखनामध्ये होते. भारतीय राष्ट्रवादाची भक्कम उभारणी करण्यासाठी त्यांनी घडविलेले विचारमंथन इतिहासातून नवी वाटचाल करण्यासाठी उपयुक्त ठरले. पाश्चिमात्य जगामध्ये लिवोपाल्ड रैंके याने इतिहासाची शास्त्रीय व वैज्ञानिक उभारणी करण्यासाठी जसे सिद्धांत मांडले तसे राजवाडे यांनी नवमहाराष्ट्राच्या उभारणीसाठी मांडले. त्यांची इतिहासमीमांसा समाजकेंद्री, संस्कृतीकेंद्री आणि लोककेंद्री होती. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासलेखनासाठी आवश्यक साधनसामुग्रीची समिधा त्यांनी उपलब्ध करून दिल्यामुळे पुढील काळात इतिहासाचे निरक्षीर विवेकावर आधारीत तर्कसंगत विश्लेषण करणे शक्य झाले. इतिहास हा कार्यकारण भावावर आधारलेला असतो आणि त्याची मांडणी विशुद्ध वैज्ञानिक दृष्टीने केली जाते तेव्हा तो अधिक प्रकाशमान होतो. हे सत्य त्यांच्या इतिहासमीमांसेत प्रकट होते. इतिहास लेखन हे तत्त्वज्ञानावर आधारलेले असते आणि अशा तत्त्वज्ञानाचे महत्त्व आणि उपयुक्तता ही संदर्भाच्या जुळणीवर आधारलेली असते. यादृष्टीने पुढील मीमांसेसाठी वैविध्यपूर्ण संदर्भाचा खजीना राजवाडे यांनी आधुनिक महाराष्ट्राला उपलब्ध करून दिला. हे त्यांच्या इतिहासमीमांसेचे सार होय.

**डॉ. वि. ल. धारुरकर**
संपर्क क्र. 9225313592

तुकारामनीती
भाग 40

# एका बीजा केला नास । मग भोगिले कणीस ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**मराठी वाङ्मयाचे सूक्ष्म सिंहावलोकन केले असता एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत अत्यल्प प्रमाणात गद्य वाङ्मय लिहिले गेले. मराठी पद्य वाङ्मय हे संत, तंत आणि पंत या तीन प्रकारे निर्मित झाले. तंत म्हणजे पोवाडे, लावण्या लिहिणारे कवी जसे की राम जोशी, होनाजी बाळा, अनंत फंदी यांनी तत्कालीन काळात आपल्या लेखणीने एक वेगळे वातावरण निर्माण केले. पंत वाङ्मय म्हणजे मोरोपंत, वामंन पंडीत, रघुनाथ पंडित आदींनी पंडिती काव्य निर्माण करून आपली वेगळी ओळख निर्माण केली. तंत कवींनी श्रृंगार आणि वीर रसाच्या सहाय्याने पोवाडा-लावणी लिहून, सादरीकरण करून लोक रंजनाबरोबरच प्रबोधन केले. पंत कवींनी मात्र आपले पांडित्य प्रदर्शित करून संस्कृत भाषेच्या श्रृंगाराने मराठी भाषा सजवण्याचा प्रयत्न केला, परंतु मराठी वाचक-रसिकांना पंत काव्य फार काळ भुरळ घालू शकले नाही. या दोन्ही काव्य प्रकाराशिवाय संत काव्य हा एक प्रकार लोकाभिमुख झाला. त्यात प्रामुख्याने अभंग आणि ओवी याचा समावेश होतो. संत नामदेवांनी पंढरीच्या वाळवंटात अठरापगड जातींचे भजनकरी, पंढरीचे वारकरी एकत्र करून सर्वांना पचेल-रुचेल सहज समजेल अशा लोकवाणीतून अभंग-भजन-कीर्तनाचा वाळवंटात खेळ मांडला.**

यांच्या जोडीला धर्म बहिष्कृत ब्राह्मण, वर्णव्यवस्थेने अतीव छळलेले, ज्यांच्या आई-वडिलांना धर्माच्या कडेकोट भिंतीमुळे जीव द्यावा लागला असे निवृतीनाथ, ज्ञानदेव, मुक्ताबाई आणि सोपानदेव आदि चार भावंडे येऊन मिळाली. इथेचे खऱ्या अर्थाने मराठी वाङ्मयात क्रांतीची पेरणी झाली. यानंतर संत ज्ञानदेवांनी संस्कृत भाषेतील श्रीमद् भगवद्गीता ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्राकृतात भाषांतरित करून मराठीच्या ललाटावर कुंकुमतिलक केला! "नाचू कीर्तनाचे रंगी" सारखे अभंग लिहून सामान्यांच्या हृदय सिंहासनावर नामदेवादी संत विराजमान झाले असतांना, पंढरीचा विठोबा लेकुरवाळा झाला! यावर ज्ञानदेवादी भावडांनी काव्य आणि ओव्या लिहून सुवर्ण झळाळी चढवली! अक्षरशः मराठी भाषेने कूस बदलली! 'अमृताते हि पैजा' जिंकणारी सर्वांग सुंदर माय मराठी! या प्रेमळ, गोड भाषेने मराठी माणसाच्या काळजाचा ठाव घेतला! हाच वसा आणि वारसा पुढे अडीचशे वर्षांनी संत एकनाथांनी मजबूत केला आणि त्यानंतर सतराव्या शतकांत तुकोबांनी आपल्या अलौकिक, अनुभूतीपूर्ण अभंगांनी मराठी भाषेला कलशस्थानी नेवून ललामभूत केले! कालौघात तंत, पंत आणि संत काव्याने आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु ठेवला असला तरी, तंत आणि पंत काव्य हळूहळू लुप्त होत गेले आणि संत काव्याने लोकमनावर आपले अधिराज्य आणखीनच दृढ केले. तंत आणि पंत वाङ्मय हे लोकवाणी होऊ शकले नाही, त्याच तुलनेत वारकरी संतांच्या अभंग-ओव्यांनी मराठी मनाचा ठाव घेतला! हे असे का झाले? याचे उत्तर प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे आपल्या 'वक्तृत्व कला आणि साधना' या ग्रंथात देतांना लिहितात, "लोक जी भाषा बोलतात आणि जी त्यांना समजते, ती लोकवाणी. लोकांना जी समजत नाही, पण जिच्यामुळे पंडिताच्या पांडित्याचे प्रदर्शन थाटले जाते, ती पंडितवाणी." हे एकच वाक्य सर्वकाही सांगून जाते. याशिवाय संत वाङ्मय आजतागायत चीरतरुण आणि सर्वांग समाज प्रवाही का आहे? याचे उत्तर म्हणजे हे वाङ्मय सामान्य लोकांच्या कथा-व्यथा बोलते. हे वाङ्मय सर्वांना समजेल आणि जीवनाला एक दिशा भेटेल अशा पद्धतीने लोकांच्या भाषेत प्रबोधन करते. जसे संत तुकोबाराय आपल्या

एका बीजा केला नास । मग भोगिले कणीस ॥१॥
कळे सकळां हा भाव । लहान थोरांवरी जीव ॥धृ॥
लाभ नाहीं फुकासाठीं । केल्यावीण जीवासाठीं ॥२॥
तुका म्हणे रणीं । जीव देतां लाभ दुणी ॥३॥

या अभंगातून 'एखादा माणूस महान किंवा पूजनीय केंव्हा होतो?' यासाठी सहजच दोन-तीन दृष्टांत देऊन आपला सिद्धांत लोकांच्या हृदयावर उमटवतात. तुकोबांची भाषाशैली आणि उदाहरण सामान्य नांगरी जीवनातले असून एका बीजाने प्रथम स्वतःला जमिनीत गाडून घ्यावे लागते आणि तदनंतरच आपल्याला त्यापासून कणीस मिळते! एका दाण्याचे हजार दाणे व्हावेसे वाटत असतील तर सर्वप्रथम एका दाण्याला आपले सर्वस्व अर्पण करावे लागते. जीवनाच्या या रणभूमीवर आपल्याला जर चिरकाल विजयी व्हायचे असेल तर जीवाची पर्वा न करता कार्य करावे लागेल! तेंव्हाच कुणीतरी तुमची जयंती-पुण्यतिथी साजरी करेल, नाहींतर "जन्मा आला हेला। ओझे वाहता वाहता मेला॥" अशी दुर्गती होऊ शकते! अनेक गडगंज, श्रीमंत माणसे मोठमोठ्या पदांवर विराजमान झाली आणि निवर्तली याचा कुणाला थांग पत्ता सुद्धा लागला नाही! मात्र जे महामानव सामान्यांच्या हृदय सिंहासनावर विराजमान झाले त्यांनीच खऱ्या अर्थाने या जगावर अधिराज्य गाजवले, गाजवत आहेत आणि यावश्चंद्र दिवाकरो गाजवत राहतील! याचे कारण भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला श्रीमद् भगवद्गीतेत सांगतात,

हतो वा प्राप्यसी स्वर्गम् । जित्वा वा भोग्यसे महीम् ॥

म्हणजे युद्ध खेळतांना 'वीरगती गेलास किंवा



जिंकलास' या दोन्हीमध्ये तुला किर्तीच लाभणार आहे. यामुळेच ज्ञानोबा-तुकोबा आदिकरून छत्रपती शिवराय, महात्मा ज्योतीराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर कवडीभर संपत्ती नाही, तरीही तेच खरे श्रीमंत आहेत! यापुढे जाऊन जे घरासाठी किंवा देशासाठी काम करतात त्यांचे काम लहानथोर सर्वांना ज्ञात असते, कारण ते घरातील सर्वांना सारखाच जीव लावत असतात. न्यायाने वागतात. अशी तुरळकच माणसे असतात, जी कोणत्याही सुख किंवा लाभासाठी काम करत नाहीत, तर हेच जीवाचे खरे कार्य आहे या न्यायाने ते अहोरात्र कार्य करत असतात. हेच गमक तुकोबाराय आपल्या वरील अभंगात "तुका म्हणे रणीं । जीव देतां लाभ दुणी" हे अमरतत्व अधोरेखित करतात. याच अनुषंगाने कविश्रेष्ठ कुसुमाग्रज 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' मध्ये

कशास आई, भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल
सरणावरती आज अमुची पेटता प्रेते
उठतील त्या ज्वालांतून क्रांतीचे नेते
लोहदंड तव पायांमधले खळखळा तुटणार
आई, खळखळा तुटणार
गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार!

अशा सुंदर ओळी लिहितात! जी माणसे मृत्यूला भितात ती जिवंत असेपर्यंतच जगतात आणि जी माणसे मृत्यु अथवा कोणत्याही संकटांना भिक न घालता कार्य करत राहतात तिच माणसे अजरामर होतात! त्यामुळेच घरी मेलेल्या श्रीमंत अथवा मोठ्या पदावरील व्यक्तीला लोक जळतात तर रणांगणात वीरगती प्राप्त झालेल्या महान सुपुत्राला शासकीय मानदंडासह तिरंगी झेंड्यात लपेटून, तोफांची सलामी देऊन सन्मानाने निरोप देतात! म्हणजे अमरत्व पाहिजे असेल तर स्वतःचा जीव द्यावाच लागतो! असीम त्यागानंतरच अजरामर होणे शक्य आहे! हेच साधे सोपे तत्व शेतकऱ्याच्या 'दाणा-कणीस' याद्वारे तुकोबाराय जगास देतात!

ही साधी-सोपी नीती तुकोबांच्या जीवन-अभंगात पाहायला, वाचायला अथवा अनुभवायला मिळते! ही अनमोल नितीतत्वे तुकोबा समाजासमोर ठेवून अजरामर झाले. हे लिहिण्यासाठी आणि प्रसारित करण्यासाठी तुकोबांना लोकांचा मार खावा लागला. नतदृष्ट लोकांनी तुकोबांना लाठ्याकाठ्यानी मारले. असे असले तरी तुकोबांनी मारणाऱ्या लोकांना शिव्या-शाप देण्यासाठी आपली प्रतिभा अथवा शब्द खर्ची घातले नाहीत. याउलट "बरे झाले देवा निघाले दिवाळे" असे लिहून आपल्या अभंग-जीवनाला झळाळी देण्याचा महान प्रयत्न केला! तुकोबांचे संपूर्ण जीवन नितीतत्वांनी ओतप्रोत भरलेले असून त्यांच्या गाथ्यातील एक न एक शब्द म्हणजे अनंत काळाची महान तपश्चर्या आहे! त्यामुळेच प्रत्येक मराठी वाचकाने तुकोबांचा गाथा नीट वाचून व्यवस्थित समजून घ्यावा लागेल!

तुकोबांच्या गाथ्यातील तुकाराम नीतीच खऱ्या अर्थाने आज तरुणांना आणि तमाम लोकांना आपले दैनंदिन जीवन आनंदी आणि सुखकारक करू शकते! तुकोबांचे सर्वच अभंग आपल्या सर्वांना प्रत्येक प्रसंगांना लढायला बळ देतात. याच अनुषंगाने तुकाराम चरित्राचे आद्य लेखक श्रीमान केळुस्कर गुरुजी हे कॅन्सरसारख्या दुर्धर रोगांवर विजय मिळवू शकले असे ते स्वतःच आपल्या "तुकाराम चरित्र" ग्रंथात लिहितात. म्हणजेच तुकोबांचा जीवन संघर्ष, तुकोबांच्या आनंददायी व्यथा, त्यातून निर्माण झालेला गाथा आणि त्यातील नितीतत्वे म्हणजेच तुकाराम नीती! या तत्वांचे घरोघर वाचन व्हावे, मराठी मातीतील तमाम जाती-धर्म-पंथांच्या लोकांनी तुकोबांच्या जीवन आणि नीतीचे अवलोकन करून आपले जीवन कृतार्थ करावे! आज सगळीकडे पळापळ सुरु आहे. कोण किती पाळतो? कोण किती पैसे कमावतो? वस्तू कमावतो? याचीच जीवघेणी स्पर्धा लागली आहे! स्पर्धा कशाची करावी? हेच अजून उमगले नाही. सगळे काही जरूर करा परंतु एखाद्या जीवाला त्रास देऊन जर तुम्ही काही करत असाल किंवा कमावत असाल तर त्या त्रासाचे फळ तुम्हाला भोगावेच लागेल! हे वैश्विक तत्व लक्षात ठेवून आपण काहिंतरी लोकांसाठी करून ठेवण्याचा प्रयत्न करावा! असे केल्यास खऱ्या अर्थाने प्रत्येकाला आनंद होईल आणि संपूर्ण संसारी माणसे आनंदाने नाचू-बागडू लागतील! संत आणि महापुरुषांनी या साठीच स्वतःला गाडून घेतले आणि हे आनंद कणीस आपल्या हाती दिले आहे याची आपण नित्य जाण ठेवूयात! जय तुकोबाय!

**(टीप : लेखक हे व्याख्याता, कवी, कीर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**

# धन्यवाद... महात्मा गांधी मिशन विद्यापीठ




संदीप मानकर
संपर्क क्र. 9595117878

आधुनिक केसरी

**पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून ती या देशांतील कष्टकरी, दिनदलित, गोरगरीब आणि श्रमिकांच्या तळहातांवर तरलेली आहे असा विज्ञानवादी विचार मांडून ज्यांनी औपचारिक पद्धतीने शिक्षण देणाऱ्या शाळेची दीड दिवसही नीट पायरी चढली नाही असे वास्तववादी साहित्यक्षेत्रातील कोहिनुर हिरा म्हणून ओळखले जाणारे व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अग्रगण्य असलेलं व्यक्तिमत्त्व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना साहित्यक्षेत्रांतील अत्यंत नावाजलेल्या औरंगाबाद येथील (MGM) महात्मा गांधी मिशन विद्यापीठ यांनी मरणोत्तर डी. लिट अर्थात डॉक्टर ऑफ लिटरेचर ही विद्यापीठाची प्रथम पदवी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेऊन विद्यापीठाचे कुलपती डॉ.अंकुशराव कदम यांनी अण्णाभाऊंना डॉक्टर ही पदवी बहाल केली व तद्नंतर लोकशाहीर अण्णाभाऊ हे डॉ.अण्णा भाऊ साठे झाले.**

दि.27 नोव्हेंबर रोजी एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात संपन्न झालेला हा सोहळा इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहला गेला. खऱ्या अर्थाने हा स्तुत्य आणि ऐतिहासिक निर्णय घेऊन नावाला मोठे असणाऱ्या मात्र शिक्षणक्षेत्राचे केवळ उदात्तीकरण आणि बाजारीकरण करणाऱ्या विद्यापीठांना एक प्रकारची चपराक देऊन त्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातले आहे. त्यांवर भाष्य करणारा पत्रकार तथा "मातंग एकता आंदोलन" या राज्यव्यापी सामाजिक संघटनेचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष संदीप मानकर यांचा एमजीएम विद्यापीठाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा लेख.



अठराविश्व दारिद्र्याच्या दलदलीत जन्मलेल्या जातीतील व सोबतच अन्याय-अत्याचारांनी कायमच ग्रासलेल्या व वेढलेल्या काळांत कठीण स्वरुपाच्या यातना भोगून भूक, गरिबी व त्यांतून आलेली उपेक्षा आणि वेदना या सर्व गोष्टींची चीड मनात घेऊन वाटेगांव ते मुंबई आणि नंतर मुंबई ते मॉस्को (रशिया) असा अलौकीक जीवन प्रवास करणारा प्रतिभासंपन्न साहित्यिक म्हणजे साहित्यरत्न डॉ.अण्णा भाऊ साठे. अण्णाभाऊंनी अठरा पगड जाती-जमातींना आपल्या साहित्यात मानाचे आणि आग्रहाचे स्थान दिले.

नैतिकतेची चाड केवळ मध्यमवर्गीयांची किंवा श्रीमंतांचीच नाही हे साहित्यरत्न अण्णाभाऊंनी आपल्या लिखाणातून सिद्ध केलेले आहे विज्ञाननिष्ठ विचारांचा पुरस्कार आपल्या साहित्यात करुन त्यांनी अमानुष रूढी, प्रथा व परंपरा नाकारल्या व त्यांतील जिवंत अनुभव आपल्या डोळ्यांसमोर घेऊनच साहित्यक्षेत्रांत वास्तविक कीर्ती गाजवली. म्हणूनच त्यांच्या या सर्व वास्तविक साहित्याचा आढावा घेऊनच त्यांना डॉक्टरेट देण्याचा निर्णय एमजीएम विद्यापीठानी घेतला. हा सन्मान अण्णाभाऊंच्या वतीने त्यांच्या स्नुषा सावित्रीबाई साठे यांनी अत्यंत कृतज्ञतापूर्वक स्वीकारला व यांवेळी नातू सचिन साठे यांनी डी. लिट स्वीकारतांना हा सन्मान केवळ अण्णाभाऊंचा सन्मान नसून तो गांवकुसाबाहेरच्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान आहे असे सांगून विद्यापीठ प्रशासनाचे मनःपूर्वक ऋण व्यक्त केले. तर अण्णाभाऊंच्या प्रतिभेला केलेले वंदन मोठे लौकिक असून अण्णाभाऊ साठे यांची विपूल साहित्यसंपदा आणि त्यांनी सर्वसमावेशक समाजाप्रती न्यायाभिमुख पद्धतीने केलेले कार्य हे आमच्यासाठी सदैव आदर्श असून एमजीएम विद्यापीठाची प्रथम डी.लिट प्रदान करतांना आम्हांला अतिशय आनंद आणि अभिमान वाटत आहे असे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांवेळी म्हणाले तर अण्णाभाऊंचा महाराष्ट्राकडून होणारा हा सन्मान उशिरा झाल्याची खंत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम यांनी एका सामाजिक कार्यक्रमात व्यक्त केली. एकीकडे रशियासारख्या बलाढ्य देशातील मॉस्को सारख्या युनिव्हर्सिटी मध्ये अण्णाभाऊंचा पुतळा उभारला गेला. व त्यांना अण्णा भाऊ कळाले, परंतू भारतीयांच्या मनांत ही कल्पना येऊ शकली नाही ही फार मोठी शोकांतिका आहे. अण्णाभाऊंनी आपल्या उभ्या आयुष्यात ज्या हाल अपेष्टा सहन केल्या व अनुभवल्या त्याच वेदना त्यांनी आपल्या वास्तविक




लिखानातून मांडल्या व हे सगळे करत असताना मला कल्पनेचे पंख घेऊन उंच भरारी मारता येत नाही असेही अण्णाभाऊ म्हणायचे. शिक्षणापासून कोसो दूर असलेल्या परंतु आज औपचारिक शिक्षण पद्धतीत व शिक्षण व्यवस्थेच्या अभ्यासक्रमांत समाविष्ठ झालेला थोर साहित्यिक अण्णाभाऊ आज अनेक भाषांनी अनुवादित झालेला आहे. कारण तो जगलेल्या आणि सहन केलेल्या अनुभवाच्या शाळेत शिकला नाहीतर विद्यापीठे आज अण्णाभाऊंच्या उशा-पायथ्याशी असती. गांवकुसाबाहेरचा माणूसही माणूसच आहे आणि गावांतल्या माणसांसारखीच त्यालाही भूक लागते, उलट त्यापेक्षा कडकडून लागते म्हणून त्याचा न्याय हा व्यवस्थेच्या योग्य पातळीवरच असावा ही भूमिका ठामपणे मांडणारा तळमळीचा आणि तळागाळाचा मानवतावादी साहित्यीक म्हणजे एकच नाव समोर येते आणि ते नाव म्हणजे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे त्यांच्या या कार्याला सलाम करतांना एकच खेदजनक बाब समोर येते ती म्हणजे अण्णाभाऊंच्या साहित्याच्या जोरांवर अभ्यास करुन वेगवेगळ्या विद्यापीठातून आतापर्यंत शेकडो विद्यार्थी पीएचडी प्राप्त करुन डॉक्टर झाले होते परंतु स्वतः अण्णाभाऊ या सन्मानापासून आजदेखील उपेक्षित आणि वंचित होते. परंतु औरंगाबाद येथील एमजीएम विद्यापीठाने अण्णाभाऊंना डी.लिट बहाल करुन अगदी उचित आणि रास्त न्याय दिला. यांबद्दल तमाम बहुजन समाज, दलित समाज आणि मातंग समाज एमजीएम विद्यापीठाचा कायम ऋणी राहील. व शेवटी एकच सांगावे वाटते की अण्णा भाऊ हे नाव समस्त देशाच्या सन्मानाचे आणि अभिमानाचे नाव आहे म्हणून त्यांचा गौरव हा देशाचा गौरव आहे..!

**(लेखक मातंग एकता आंदोलन औरंगाबाद जिल्हाध्यक्ष आहेत)**

## सांगून गेले गाडगेबाबा

सांगून गेले गाडगेबाबा
नका विचारू कुणी
जातधर्म
निस्वार्थ भावनेनं करावे
सर्वांनी आपले कर्म

देव नाही दगडात
मग पावणार कसा ?
दीनदुबळ्यांची सेवा
करण्याचा
घ्या बाप्पा वसा

कर्ज काढूनी कुणी
कर्मकांड नका करू
एक एक पैसा जमवूनी
हाती पाटी-पुस्तक धरू

निर्मळ करा गाव
हाती घेवूनी झाडू
रोगराईला बाप्पा मग
समदे मिळून गाडू


दारू म्हणजे विष
नका घेवू हाती
घरात भांडण करुनी
तोडू नका रक्ताची नाती

भुकेल्याला द्या अन्न
तहानल्याला द्या पाणी
जनसेवा हीच ईश्वरसेवा
असू द्या बाप्पा ध्यानी

- रविंद्र व्ही. चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि. यवतमाळ
मो.नं. ९०११५५९१०६



## तिन्हीसांजा



कुठुन एकसा ढग शुभ्र तो
विहरत होता नभामधे
पक्षीही वाट चुकला तेव्हा
पाहत होता तुझ्याकडे

लालसर आभाळी फडके
जरीपटका तो वनामधे
हर महादेव घोष एकसा
दुमदुमला हो मनामधे

सर्पाच्या त्या वावटळीने
मार्ग उमटला मातीमधे
वाऱ्यासही हवेसे वाटे
घोंघावणे त्या झाडीमधे

कसे कायसे वर्णन करु मी
सृष्टीचे ह्या काव्यामधे
साठवणे ते अवघड आहे
निसर्गास त्या शब्दांमधे

- © स्वानंद नंदकुमार मराठे

## सापडेना अंत...

क्षितिजा पल्याड
असा एक गाव
सापडेना ठाव
दिगंताला...
अंधाऱ्या विवरी
कवडसा छोटा
पल्ला असे मोठा
अनंताचा..
अट्टाहासापोटी
होई घालमेल
कधी गेला तोल
शिडीचाच..
धुंडता प्रारब्ध
भेंडाळले वारे
चक्राकार फिरे
भोवऱ्यात..
विश्वाचा पसारा
अनादी अनंत
मिळेना उसंत
दिगंतरा..
पामराने केली
उगाचच भ्रांत
सापडेना अंत
ठिकाणाचा..!!

-महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत, जि.
सांगली
मो. 9765374805

## नाती -गोती



मना मनात पेरलेली नाती
जपली फुलासारखी
त्याच फुलांना गुंफायची
देवा द्या आता उभारी
अशीच संपवायची नाही आम्हांला
आमच्या जिव्हाळयातलीं नाती-गोती
देवा जपनाम तुमचाच आमच्या ओठी
सैदव रहा तुम्ही आमच्या पाठी
धीर बांधायला
देवा तुम्हीच हिंमत द्या पहाडी
या वाटेवर पुन्हा चालायला
खंबीर उभे रहा आमच्या पाठी
माणसा माणसात पेटलेल्या आशा
आता निराशा खोदणार नाही
वचनाची थाप मारलेल्या माणसाला
आता खचू देणार नाही
दिलेल्या वचनांच्या ठस्यावर
अंगाऱ्या वरुन भरारी घेऊ
या एकलकोंडी वाटेवर
पुन्हा मानवता उभी करु
कोरडवाहू मनात ही
माणूसकीची हिरवळ उगवून आणू
डोळ्यातून वाहणाऱ्या आशेला
रोखून धरु किणाऱ्यावरती
वाऱ्याच्या वेगाने पेटून उठतील
आपले संवगडी
कोसळत्या आभाळाला पाठीला
बांधून मारु आता उडी
नाती-गोती टिकवायला ,मानवतेच्या
या वाटेवर देवा उभे रहा आमच्या पाठी

लक्ष्मण वाल्डे-कन्नड
ता.कन्नड जि.संभाजीनगर
मो.नं-8888606068

## अतृप्त आत्मे...!

कावळ्यांनी गिळले माणिकमोती सारे,
दाण्यालाही महाग झाले हंस बिचारे.
घुबडांनी चित्कारून केले इशारे,
गरूडांच्या अंगावर उठले शहारे.
खोटयांच्या गळ्यात पडती रोज हारतुरे,
सत्यावर बसली आहेत बंदिस्त पहारे.
दुर्जनांच्या शिरी मिरविती मुकूटतुरे,
सज्जनांच्या पाठीत घुसती खंजीर-सुरे.
स्वार्थी भक्तांनी गेली भरून आज मंदिरे,
देव सारे गेले आता सोडून गाभारे.
इथे लोकामध्ये फिरतात अतृप्त आत्मे सारे,
खोट्यापुढे सत्याने जगणाऱ्यांचा देह मात्र झुरे...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

## जेव्हा आभाळ फाटतं



जेव्हा आभाळ फाटतं
तेव्हा सापडत नसते जागा
त्या प्रलयंकारी वादळात
पावसापासून वाचण्यासाठी इतभर.


अन मिळत नसते वेळ
उभं राहण्यासाठी पुन्हा आयुष्यभर.

इथं आभाळाच फाटलंय
त्या रानाचं काय घेऊन बसलाय
ते तर कायमच फाटलेलं दुभंगलेलं
झाला दुष्काळी सोसून जीर्ण झालेलं.

तरी ही आता
तो हरवलेला सुईदोरा शोधू म्हणतो
फाटलेलं आभाळ शिवणारा..
पुन्हा अख्ख आभाळ फाटू नये म्हणून.

अन आता ते आभाळ शिवता येणार
नाही मरेपर्यंतम्हणून आभाळ होऊ
म्हणतो तापलेल्या रानातील कोवळ्या
रोपट्यांसाठी.

ज्ञानेश्वर गायके..कन्नड
मो..९४०३३८४८८९




## फ़रियाद ...



उम्र भर रखो तुम एक बात याद में
दिल पहले जला है मेरा जिस्म बाद में

नाज़ नहीं है मुझे किसी भी दौलत पर
तू ही बेशकीमती है मेरी जायदाद में

बंद आंखों में तुम ही नज़र आते हो
एक तुम ही तुम हो मेरी मुराद में

मेरे हिस्से की खुशियां बांटकर मत आना
इतना ही कहा था मैंने फ़रियाद में

फ़ैसले होते नहीं मेरे दिमागी हुनर से
एक दिन ही रखा है मैंने बुनियाद में

मैं फिर से रूठ जाऊं फिर से तुम मनाना
मनाने का ही जिक्र किया है मैंने इरशाद में

भूल कर मुझे भी तुम तो जी रहे हो
ऐसा ही नुक्स़ा ढूंढ रहा हूं ईजाद में

बलराज संधई
9420015108

## सुनो कहानी माता की

सुनो कहानी माता की
सुनो कहानी माता की,
जगत के रखवाली,
जगत जननी दाता की।
सरस्वती, लक्ष्मी, पार्वती तीनों की रूप
की शक्ती,
सममिलन आदिशक्ति माता जाननी हैं,
तो करो मां दुर्गा की भक्ती।
काला उसका सुंदर बदन, जीभ लाल
बाहर निकली,
दृष्टों का वध किया जिसने,
मां दुर्गा का विक्राल रूप,
जगत जानी वो माता नाम से मां काली।
सुंदर उसकी आंखे, लहराते सुंदर घने
बाल,
सुंदरता जैसे मन को भाया, गुलाबी होंठ
लाल _ लाल,
चंड - मुंड दो भाई, सुंदरता से उसकी
मोहित हुये,
पाने उसको उसकी दरबार मे आये।
उसने मधुरिली आवाज से गर्जना की,
पाना है मुझे तो युद्ध की पुकार मैंने की।
पा मुझे लेकीन पहले मुझे हारा,
सुंदर नारी कुछ ना करेगी,
नादानी में भाइयों ने युद्ध ललकारा।
दोनों भाइयों ने युद्ध किया,
एक नारी ने दोनों का सर उड़ाया।
फिर खुश होकर मां अम्बा ने वरदान
दिया,
"चंड _ मुंड का वध करके आपने
इतिहास रचाया,
सारा संसार पूजेगा , संसार जानेगा मां
चामुण्डा आप,
और कोई नहीं हैं वो मेरी मां,
मां काली का वो रूप,
शेरों पे सवार, संसार की दाता, दृष्टो
और चंडों को मिटाने, जोधपुर में बसी
वो मां चामुण्डा आप ।

- मयुरी प्रधान (मुंबई)



# रस्ते अपघातातील मृत्यू चिंताजनक बाब



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**देशातील रोड अपघातात प्रत्येक तासाला 18 लोकांचा मृत्यू चिंताजनक बाब. देशात सध्याच्या परिस्थितीत रस्ते अपघातांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.यामागे अनेक कारणे दिसून येतात. यात प्रशासनाचा व वाहनचालकांचा निष्काळजीपणा असे अनेक कारणे आपल्याला पाहायला मिळतात. देशात रस्ते अपघातांमध्ये प्रत्येक तासाला 18 लोकांचा मृत्यू होतो. ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.**

सन 2021 मध्ये देशात एकूण 4 लाख 12 हजार 432 रस्ते अपघात झालेत. यात 1लाख 53 हजार 972 लोकांना आपले प्राण गमवावे लागले तर 3 लाख 84 हजार 448 लोक जखमी झालेत. यामध्ये सरकारी आकडेवारीनुसार देशात एकूण 19748 सडक हादसे झालेत.यात ड्रायव्हिंग करतांना संतुलन न ठेवणे, मद्य प्राशन करून ड्रायव्हिंग करणे, वाहनचालवीतांना मोबाईलचा वापर करने इत्यादी अनेक कारणांमुळे अनेक दुर्घटना झाल्याचे दिसून आले.ही संपूर्ण आकडेवारी सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाच्या वार्षिक अहवालात नमूद केली आहे. वाहनचालवीतांना मोबाईल फोन वापरल्यामुळे सन 2021 मध्ये एकुण 1997 रस्ते अपघात झालेत.यामध्ये 1040 लोकांना आपले प्राण गमवावे लागले.हे सुध्दा अहवालात नमूद केले आहे.म्हणजे मोबाईलचा जर आपण दुरूपयोग केला तर तो जिवावर केव्हाही बेतू शकतो ही बाब अहवालातुन लक्षात येते.अहवालावरून लक्षात येते की टू व्हीलरच्या दुर्घटनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे पायदळ चालनारे सुध्दा जीव सुरक्षित नसल्याचे स्पष्ट दिसुन येते. 2021मध्ये सडक दुर्घटनामध्ये सर्वात जास्त 8506 मृत्यू उत्तर प्रदेशात झालीत. यानंतर तामिळनाडू, महाराष्ट्र, राजस्थान इत्यादी अनेक राज्याचा नंबर लागतो. देशात रस्ते अपघातांची संख्या व त्यामुळे होणाऱ्या मृत्यूची संख्या ही अत्यंत गंभीर बाब आहे.राज्यात दिवसेंदिवस रस्ते अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते ही अत्यंत दुखदायी बाब आहे.रोडचे खड्डे, रोडचे बांधकाम यामुळे सर्वसामान्यांना आवागमन करण्यास मोठी अडचण निर्माण होते.त्याचप्रमाणे रोडचे काम सुरू असताना वनवे ट्राफीक असते अशाच ठिकाणी अपघाताचे प्रमाण जास्त दिसून येते. कारण प्रत्येक व्यक्ती आपल्या कामानिमित्त किंवा नौकरीवर जात असतो.परंतु वाढते रोडचे अपघात पहाता प्रत्येकामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होने सहाजिकच आहे.यावरून स्पष्ट होते की घरून निघालेला व्यक्ती वापस घरी सुखरूप पोहचेलच याची काहीही गॅरंटी नसते ही बाब सध्याच्या होणाऱ्या अपघातावरून लक्षात येते.कोणताही अपघात असो यात एकालाच दोष देता येणार नाही.वाहन चालकांनी आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे असते.त्याचप्रमाणे घरून निघताना हेल्मेट घालुनच निघायला हवे व चारचाकी वाहनचालकांनी सिटबेल्टचा वापर करावा. कारण कोणताही अपघात सांगुन येत नाही.त्यामुळे या धकाधकीच्या जीवनात स्वतःचा जीव स्वतःलाच सांभाळायचा आहे.वाहन चालवितांना दुचाकी असो अथवा चारचाकी असो आपल्या वाहणाच्या वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.



त्याचप्रमाणे सरकारने व वाहतूक प्रशासनाने दुर्घनांच्या ठिकाणी जातीने लक्ष देण्याची गरज आहे.रोडचे अपघात रोखण्यासाठी सरकार, प्रशासना व नागरिक यांच्यात समन्वय असणे अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे वाहतुकीच्या बाबतीत सरकारने किंवा वाहतूक प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे तीतकेच अती आवश्यक आहे.कारण "जान है तो जहान है" हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.परंतु देशातील व राज्यातील अनेक भागात टिप्पर,ट्रक चालकांच्या व इतर वाहनचालक यांच्या निष्काळजीपणामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.अपघातांचे उदाहरण द्यायचे झाले तर सरकारी आकड्यानुसार भंडारा जिल्ह्यात जानेवारी 2022 ते नोव्हेंबर 2022 या कालावधीत एकुण 426 अपघात झालेत या अपघातात 154 लोकांचा मृत्यू झाला व 216 गंभीर जखमी झालेत आणि इतर किरकोळ जखमी झाले असे अहवालात म्हटले आहे. अशी अपघातांची भयावह परिस्थितीत एकट्या भंडारा जिल्ह्याची आहे तर महाराष्ट्रासह देशात काय गंभीर परिस्थिती असेल हे आपण समजू शकतो. म्हणजेच अपघातांची वाढती संख्या अत्यंत चिंताजनक व धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे वाढते अपघात रोखण्यासाठी नागरिकांनी सामोरं येण्याची गरज आहे.याकरिता आपण सर्वांनी सर्वप्रथम वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे.वाहन चालवितांना मुख्यत्वे करून मोबाईलचा वापर करूच नये व कोणताही सिग्नल जंप करू नये किंवा तोडू नये.त्याचप्रमाणे आपल्या वाहनांचे हॉर्न, ब्रेक,इंडीगेटर सदैव व्यवस्थीत( ओके )असायला हवे व यांचा योग्यवेळी वापर व्हायलाच हवा जेनेकरून अपघात रोखण्यास मोठी मदत होईल.वाढते रस्ते अपघात पहाता सर्वांनाच माझी विनंती आहे की वाहन चालवितांना नेहमीच सतर्कता बाळगावी.


# तिच्या सावळ्या देहासाठी...

आधुनिक केसरी

*तिच्या सावळ्या देहासाठी पाऊस झालो*
*ती म्हणाली हिरवा हो मी उगवून आलो*
*वारा झालो तिच्याच खातर बिजली झालो*
*इंद्रधनुचे रंग तिच्यास्तव उधळीत आलो*
*झाडामधूनी हास म्हणाली हसलो इतका*
*हसता हसता सोसाटयांचा आला ठसका*
*समुद्र हो अन् रहा म्हणाली जवळ निरंतर*
*तुझ्या नि माझ्यातले नुरू दे मुळी न अंतर*
*सृष्टीमधले होते नव्हते ते ते झालो*
*शेवट तीचिया गाभ्यातच आश्रयास आलो.*

**शशिकांत शिंदे, कोल्हार.**


कवी शशिकांत शिंदे यांची आवडलेली रचना खूप दिवसापासून मनात रुंजी घालत होती. 10 व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या विश्वस्तरीय लेखन स्पर्धेच्या निमित्ताने मला आज व्यक्त होण्याची संधी प्राप्त झाली. कवी शशिकांतजी हे तसे इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर पण साहित्याची ही गोडी त्यांच्या शिक्षणाच्या आड कधी आले नाही. आठवणींच्या कविता पासून सुरू झालेला त्यांचा लेखन प्रवास नंतर शरणागतांचे स्तोत्र, आनंदाचं झाड, ताटातुटीचे वर्तमान, इत्यादी कवितासंग्रहाने समृद्ध झाला. त्यांच्या कविता संग्रहांना अनेक राज्यस्तरीय पुरस्कार ही लाभले. महाराष्ट्राच्या साहित्यिक परिवारात जरी त्यांना एक चांगला कवी म्हणून ओळख असली तरी इयत्ता 7 वीच्या पुस्तकातील त्यांची कविता " माणूसपण गारठलय" या कवितेने त्यांना महाराष्ट्रभरात कोट्यवधी मुला माणसातही ओळख मिळवून दिली. शेती मातीशी नाळ असलेला हा कवी जेंव्हा आपल्या प्रतिभेची थाप व्यक्त करण्यासाठी कवितेच्या पहिल्या ओळीतच म्हणतो " तिच्या सावळ्या देहासाठी पाऊस झालो... सुरुवातीला क्षणभर वाटले प्रेम कविता लिहिली आज मित्रवर्य शशिकांतजी यांनी. परंतु जसजशी कविता वाचत गेलो आणि मन सृष्टीच्या शृंगाराने भरून आले. अगदी सहज साधे शब्द असे चपखल पेरले गेले की निसर्गातले या प्रेमकाव्याने मनावर अधिराज्य गाजवले. पुढच्या ओळीत ते म्हणतात " ती म्हणाली हिरवा हो मी उगवून आलो वारा झालो तिचाच खातर बिजली झालो इंद्रधनुचे रंग तीच्यास्तव उधळीत आलो आपल्या प्रेयसीच्या इच्छापूर्तीसाठी जसा एखादा प्रेमवीर काय काय करू असा अगतिक होतो. तिच्या एक इच्छेसाठी अनेक ही स्वतः ला आवडतील त्या वस्तू ही घेवून येतो. जेणेकरून ती जास्तीत जास्त खुश होईल. तशीच भावना या ठिकाणी कवी प्रतीकात्मक अशा प्रेमी असलेल्या "भूमिसाठी" सृष्टिकडून आळवली जात असल्याचे दिसून येते. तिच्यासाठी मी काय काय झालो हे सांगताना तो म्हणतो " वारा झालो तिच्याच खातर बिजली झालो" मला आता एखादा प्रेमवीर मी प्रेयसीसाठी काय काय केलं हे मांडतांना जसे यादी वाचून दाखवतो. तशीच या प्रेमवीराची यादी काही संपत नाही.



*झाडामधूनी हास म्हणाली हसलो इतका*
*हसता हसता सोसाटयांचा आला ठसका*

कवी तिचे लडिवाळ हितगुज करतानाचे वर्णन टाकतात जसी एखादी प्रेयसी आपल्या प्रियकराशी प्रेममय होवून वार्तालाप करते, हास्यविनोद करते, प्रियकर तिला स्पर्श करण्याचा प्रयत्न करत असतांनाच ती दूर पळून जाते, प्रियकराच्या चेहऱ्यावरील रुसल्याचे भाव पहातांनाच जेंव्हा झाडाआडून ती लडिवाळपणे हास म्हणते. त्याने रुसल्याचा केलेला अभिनय सोडून तो इतका हसतो की शेवटी त्याला ठसका लागतो. असा काहीसा रोमान्स यांच्यात होत असावा. कदाचित कवींच्या भावना याहून वेगळ्या ही असू शकतील. समुद्र हो अन् रहा म्हणाली जवळ निरंतर तुझ्या नि माझ्या मध्ये नुरू दे मुळी न अंतर कवी भूमीच्या भावना व्यक्त करतांना आता म्हणतात की ही सृष्टी तिला इतकी जवळची वाटते की तिच्या थोड्याश्या विरहाचा विचार ही तिला तिला सहन होत नाही. म्हणून ती सृष्टीला म्हणते समुद्र जसा आपली जागा न सोडता एकाच ठिकाणी असतो. अगदी तसाच तू निरंतर माझ्याजवळ हवा आहे. तुझ्या नि माझ्यात आता मुळीच अंतर असू नये. अगदी अशाच भावना आजही एकदम खरे प्रेम करणाऱ्या प्रेमींच्या ही असतात. सृष्टी मधले होते नव्हते ते ते झालो शेवट तीचीया गाभ्यातच आश्रयास आलो. आपल्या प्रेमाची उत्कटता आणि समर्पण भावना कशी असावी हे कवींनी समारोपाकडे जातांना खूप छान आणि प्रेमवेड्या भावनेत सांगितली आहे की कविता वाचतांना प्रत्येकाला आपणच त्या दोघांच्या ठिकाणी दिसतो आहे. आणि आपल्यात ही तो बदल ही कविता वाचल्यानंतर झाल्याचे परिवाराच्या लक्षात येईल. अशी सुंदर रचना याठिकाणी पहावयास मिळाली. शशिकांतजींचे प्रत्येक कवितेचे हेच वैशिष्ट वाचकांना पहावयास मिळते. म्हणून तर महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक, कवी ना.धो. महानोर, विठ्ठल वाघ, राजन खान, संजीवनी तडेगांवकर, जगन्नाथ देविकर,प्रा. डॉ. कन्हय्या कुंदप, प्रा. डॉ. पृथ्वीराज तोर, प्रा. डॉ. सुनील शिंदे, सुमती लांडे, कविवर्य शंकर रामाणी, कवी खलील मोमीन, चित्रकार श्रीधर अंभोरे व रवींद्र सातपुते, हेरंब कुलकर्णी, प्रकाश घोडके, संजय कळमकर, सदानंद डबीर, अनिल सहस्त्रबुध्दे, विलास गीते, प्रा. डॉ. महेंद्र कदम, भूषण देशमुख , दादासाहेब कोते व मी सुध्दा व अजून ही खूप मोठा वर्ग त्यांच्या कवितांचे प्रचंड चाहते आहेत. यातील अनेक जण त्यांच्या कवितेवर लिहीत असतात. शेवटी कविवर्य ना. धो . महानोर यांच्या कवी शशिकांतजी शिंदे यांच्या लिखणाविषयी व या कविविषयी असलेल्या भावना त्यांच्याच शब्दात मांडतो. "तुझा अनुभव सच्चा आहे. तू ज्या खेड्यामधल्या शेतीची , शेतकऱ्यांची व त्यांच्या तळतळाटांची कहानी लिहून बसलास ती फारच थोर आहे. संपूर्ण शेतीशी मातीशी व त्या जीवनातल्या सुखदुःखाची एकरूप झाल्याशिवाय असा अनुभव कवितेत उतरतच नाही. तू हे सगळे ताकदीने मांडण्याचा प्रयत्न करतोस म्हणून चांगली कविता लिहितो. तुला लाख लाख धन्यवाद." अशा या ताकदीचा कवी असलेला शशिकांतजी शिंदे यांच्या कवितेचे रसग्रहण करण्याचा मी छोटासा प्रयत्न केला आहे. मला जसे भावले तसे मी लिहिण्याचा प्रयत्न केला. वाचक मला समजून घेतील. अशी मी अपेक्षा करतो.

**राजेंद्र फंड,**
**राहाता, जिल्हा, अहमदनगर**
**मो. 9881085671.**



# विनयशीलता : एक वरदान

आधुनिक केसरी

***संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे***
***विद्या विनयेन शोभते***
***अहंतेने ती डागाळते***

ज्ञानी मनुष्य जर उद्धट आणि गर्विष्ठ असेल तर त्याच्या ज्ञानाला काहीच किंमत राहत नाही. आजकाल तर अशा वागण्याचे इतके अनुभव येतात कि कुणी चांगला वागला तरी मन विश्वास करत नाही.असे वाटते तो आपल्याला आडवा बोलतो की काय? खर तर विनयशिलता ही सर्व गुणांचा पाया आहे. हा जितका भक्कम तितकी इमारत भक्कम असते.परंतु आजकाल विनयशीलता दुर्मिळ होत चालली आहे.जुनी पिढी आपल्या वडीलधाऱ्यांच्या समोर मान उंच करून बोलायला ही घाबरत होती. पण आजकालची पिढी मात्र आपला जन्म हा आई-वडिलांना धाकात घेऊन बोलण्यासाठीच झाला आहे कि काय अशा रीतीने वागतांना दिसून येते.



सुजाता नवनाथ पुरी
अहमदनगर
संपर्क 8421426337

तुकोबा म्हणतात की नम्रपणातच मोठेपण दडलेले असते स्वभावात असलेली नम्रता माणसाला यशाचं शिखर दाखवत असते म्हणूनच ती महत्वाची असते.ती जवळ बाळगणे मोठे कठीण काम आहे.हे ज्याला जमते तो खऱ्या अर्थाने जीवनात यशस्वी होतो. तुम्ही किती मोठे आहात हे तुमच्या नम्रतेवरून ठरत असते. नम्रतेला उंची असते,प्रतिष्ठा असते आणि एक वेगळी अशी ओळख असते. जशी सहनशीलता म्हणजे कमजोरी नसते तशीच नम्रता म्हणजे लाचारी नसते. नम्रता म्हणजे आपल्या विचारांचं कृतीतून अभिव्यक्त होणारं रूप होय.
त्यासाठी खूप मोठं मन असावं लागतं.
झुकता वही है जिसमे जान होती है
अकडे रहना तो मुर्दो की पहचान होती है
जिवंत माणसेच आदराने आणि नम्रतेने झुकू शकतात. नम्रता दाखवणे हे आपण जीवंत असल्याचेच प्रतीक आहे.तरी ही लोकांना किती अकड असते याची प्रचिती आपल्याला पदोपदी येत असते.खरंतर जगाचा आवाका ज्यांच्या डोक्यात असतो तेच नम्र राहात असतात. या अनंत विश्वात आपले अस्तित्व किती छोटं आहे आणि ते ही किती अनिश्चित.. हे एकदा समजले कि आपल्यातील अक्कड निघून जाते. परंतु त्यासाठी ज्ञान प्राप्त होण्याची गरज असते. ज्ञानाची वेगवेगळी कवाडे उघडण्यासाठी विनयशीलता म्हणजेच नम्रता खूप महत्त्वाची असते. त्यासाठी आयुष्यभर विद्यार्थी होऊन जगता आले पाहिजे. नम्रता बऱ्याच वेळा आपल्याला आपल्या पात्रते पेक्षा ही पद प्रतिष्ठा मिळवून देत असते. नम्रतेमुळेच आपण लोकांच्या हृदयाच्या जवळ राहात असतो. नम्रता जर नसेल तर आपण कितीही उपयोगाचे असलो तरी कुणीही आपल्याकडे लक्ष देणार नाही.
संत कबीर आपल्या एका दोह्यामध्ये असे म्हणतात कि - **बडा हुआ तो क्या हुआ**
**जैसे पेड खजूर पंछी को छाया नही**
***फल आगे अतिदूर***
खजुराच्या झाडासारखे होऊ नका ते उंच तर होते पण पांथस्थाला सावली देऊ शकत नाही आणि त्या झाडाची फळे ही पक्ष्यांना जवळची वाटत नाहीत. नम्रता ही आंतर बाह्य असते.तिचा ओढून ताणून आव आणता येत नाही.नम्रतेने पाय हे नेहमी मातीत रोवलेले असतात पण हात मात्र उच्च संस्कारांनी आकाशाला टेकलेले असतात.मग आपण काहीही रुजवू शकतो,फुलवू शकतो,साकारू शकतो. नम्रतेमध्ये स्वाभाविकता हवी, नजाकत हवी. नम्रता आपल्याला सर्व काही भरभरून देत असते. एखाद्याच्या उद्धट बोलण्यामुळे तो माणूस आपल्या डोक्यात बसतो तर एखाद्याच्या नम्र बोलण्यामुळे तो माणूस सदैव आपल्या हृदयात असतो. समोरच्या व्यक्तिच्या डोक्यात बसायचं कि हृदयात हे तुमच्या वर्तनावर अवलंबून असते. आपले वर्तन ठरविणारा नम्रता हा एक अत्यंत महत्वपूर्ण असा घटक आहे. विनयशीलतेमुळेच व्यक्तीला समाजात एक आगळे आणि वेगळे स्थान प्राप्त होते. गर्वाचे घर खाली असतात तर विनयशीलते मुळे मोठमोठी कामे चुटकीसरशी मार्गी लागतात. हा एकूण अनुभव आहे.

# धर्मवीर की स्वराज्यरक्षक



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**विधानसभेमध्ये बोलताना विरोधी पक्ष नेते अजित पवार म्हणाले की छत्रपती संभाजी राजे हे स्वराज्य रक्षक होते. धर्मवीर नव्हते. त्यांनी त्यांच्या जीवनामध्ये धर्माला कधीही थारा दिलेला नाही. सर्वसामान्य जनता तर त्यांना धर्मवीर संभाजीराजे म्हणूनच ओळखते. असे असताना कोणाला खुश करण्यासाठी विरोधी पक्ष नेत्यांना असे बोलण्याची गरज निर्माण होते हा खरा प्रश्न आहे. ज्या संभाजी राजांचे जीवन तसे पाहिले तर मोगलाई जवळून पाहण्यात गेलेले होते.**

पुरंदराच्या तहानंतर संभाजी राजे हे जेव्हा शंभूराजे होते त्यावेळेस त्यांना औरंगजेबाकडे गहाणच टाकलेले होते. सर्व किल्ले औरंगजेबाच्या सुपूर्द करीत पर्यंत संभाजी राजे हे मुघलांकडेच राहणार होते. म्हणजे ज्यांनी बालपणी मुघलांची जीवनपद्धती जवळून पाहिलेली होती ते संभाजी राजे, त्यांना औरंगजेबाने पकडल्यानंतर म्हटले की तुम्ही मुसलमान व्हा. वास्तविक पाहता ज्या व्यक्तीने आपले बालपण मुसलमानांच्या सोबतीत घालविलेले होते त्या व्यक्तीला त्या धर्माबद्दल आपुलकी निर्माण व्हायला पाहिजे होती. व पकडल्या गेल्यानंतर आपल्या प्राणाचे रक्षण करण्याकरता त्यांनी मुसलमान व्हायला पाहिजे होते. परंतु संभाजी महाराजांनी औरंगजेबाने दिलेल्या अत्यंत अमानवीय, क्रूर हाल अपेष्टा सहन केल्या. त्यांची कातडी सोलून काढल्या गेली तरी ते मुसलमान झाले नाही. त्यांची जीभ हासडून टाकण्यात आली तरी ते मुसलमान झाले नाही. औरंगजेबाने त्यांना दुसऱ्या कुठल्याही शत्रूला जितक्या क्रूरपणे हाल हाल करून ठार मारले नसेल तेवढे हाल हाल करून ठार मारले. त्यांनी मृत्यू स्वीकारला परंतु मुसलमान होणे स्वीकारले नाही. अशा व्यक्तीला धर्मवीर म्हणू नये तर काय म्हटले पाहिजे? धर्मवीरच म्हटले पाहिजे. परंतु संभाजी राजांना धर्मवीर म्हटले नाही व स्वराज्य रक्षक म्हटले म्हणून मुसलमानांना ते जवळचे वाटू लागणार आहेत का? याचे उत्तर नाही असेच आहे. असे असताना सुद्धा अजित पवार यांना संभाजी राजांना स्वराज्य रक्षकच म्हणावेसे वाटते. म्हणजे संभाजी राजांना सुद्धा शिवाजी महाराजां प्रमाणे सेक्युलर करण्याचा हा डाव आहे.वास्तविक पाहता इतिहास हा इतिहास आहे. केव्हा मुसलमान बनायला नकार देतो आहे म्हणून संभाजीराजांना दिलेल्या क्रूर यातनांना तुम्ही गुदगुल्या ठरवू शकत नाही. संभाजी राजे हे महाराष्ट्रातील तमाम हिंदू मुस्लिम आणि इतर कुठल्याही धर्माचे लोक जे महाराष्ट्रात राहतात त्या सर्वांचेच राजे होते. त्यामुळे त्यांच्याबद्दल आपुलकी ही सर्वांनाच वाटायला पाहिजे. प्रजेची जात किंवा धर्म बघितल्या जाऊ नये असे आपण म्हणतो मग राजाचा धर्म किंवा जात ही का बघितल्या गेली पाहिजे? बघितली जाऊ नये. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या राजकारणामुळे मुस्लिम समाज हा नेहमीच छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या पासून दूर राहिलेला आहे. कारण महाराष्ट्रातल्या सर्वच लोकांनी जर शिवाजी महाराजांना किंवा संभाजी महाराजांना स्वीकारले तर सेक्युलर वाद्यांची मोठी पंचायत होईल व त्यांना हिंदुत्वविरोधक आपला अजेंडा राबवता येणार नाही. महाराष्ट्रामध्ये मतांचे ध्रुवीकरण करता येणार नाही. ज्यांना हिंदुत्व आवडत नाही अशा लोकांचे एक संघटन बनवणे व त्याच्या आधारावर महाराष्ट्रामध्ये आम्ही पण जिवंत आहोत अशा पद्धतीचा नारा देत मतांचे ध्रुवीकरण करीत राहणे ही या राजकीय लोकांची खेळी आहे. प्रत्येकच राजा आपल्या स्वराज्याचे रक्षण करतो. त्याला वाढवितो. त्याची सर्व हयात ही स्वराज्यासाठीच खर्च होत असते. मग ते छत्रपती शिवाजी महाराज असो, संभाजी महाराज असो शाहू महाराज असो, ताराराणी बाईसाहेब असो किंवा पेशवे असो. या सर्वांनी स्वराज्याचे रक्षण करण्याचे काम केलेले आहे. प्रभावीपणे संभाजी महाराजांनी पण तेच केले आहे. त्यामुळे ते स्वराज्य रक्षक तर होतेच पण त्यांचा मृत्यू त्यांचे बलिदान हे त्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारण्यास नकार दिल्यामुळेच त्यांना करावे लागले होते. त्यांच्या मनात आले असते तर ते मुस्लिम धर्म स्वीकारू शकले असते. औरंगजेबाशी तह करू शकले असते. आणखी पाच पंचेविस वर्षे राजे म्हणून मिरवू शकले असते. परंतु त्यांना माहिती होते की अशा पद्धतीने जिवंत राहण्यामध्ये जे रोप छत्रपती शिवाजी महाराजांनी लावलेले आहे ते स्वराज्याचे इवलेसे रोप नष्ट होऊन जाईल. या देशांमध्ये एतद्देशीयांचे राज्य निर्माण झाले पाहिजे ही जी भावना सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेली आहे ही भावना थीजून जाईल. आज मी या भावनेचा प्रतिनिधी आहे. आणि म्हणून लांछनास्पद जीवन जगण्यापेक्षा तेजपुंज मृत्यू हा माझ्या जनतेला शेकडो वर्ष पर्यंत प्रेरणा देत राहील. आमचा राजा मारला गेला म्हणून जनता माघार घेणार नाही. कच खाणार नाही. तर ती औरंगजेबाशी लढायला पुन्हा एकदा सिद्ध होईल. प्रत्येक मावळा हा स्वराज्य रक्षक बनेल. आणि त्यांचा हा आशावाद सार्थ ठरला. इतिहास साक्षी आहे की येथील जनतेने महाराष्ट्र लढत ठेवला. स्वातंत्र्याच्या भावनेचे निखारे कधी विझू दिले नाही. लाखावर सैनिकांची फौज घेवून औरंगजेब स्वराज्याला संपूर्णतः नामशेष करायला स्वतः दक्षिणेमध्ये आला. ज्याने छत्रपती संभाजी राजांना हालहाल करून मारले त्याची कबर इथल्या जनतेने याच महाराष्ट्रामध्ये खोदली. छत्रपती संभाजी महाराजांच्या नंतर महाराष्ट्रामध्ये एक वेळ अशी आली की महाराष्ट्राला कोणीही नेता नव्हता. अशाही परिस्थितीमध्ये महाराष्ट्र औरंगजेबाशी लढत राहिला. औरंगजेब लढाया मागून लढाया जिंकत चालला होता परंतु तो युद्ध जिंकू शकत नव्हता तो मराठ्यांना नामशेष करू शकत नव्हता. छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाने संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला आणि हा महाराष्ट्र औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूशी लढत राहिला. संपूर्ण महाराष्ट्राला लढण्याची प्रेरणा देणारे बलिदान छत्रपती संभाजी महाराजांनी केलेले आहे. आणि म्हणूनच ते धर्मवीर आहेत याचे आम्ही नित्य स्मरण ठेवले पाहिजे.




# जलसाक्षरतेचा मौलिक संदेश

आधुनिक केसरी



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

पृथ्वीतलावर राहणाऱ्या प्रत्येक सजीवांसाठी जगण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे जल अर्थात पाणी. सजीवाला जगण्यासाठी लागणारे पाणी म्हणजे अमृतच आहे. पाण्याशिवाय सजीवसृष्टी तग धरु शकत नाही. शारीरिक स्वच्छतेपासून ते अन्नपदार्थ शिजवण्यापर्यंत तसेच पिण्यासाठी असे प्रत्येक गोष्टीसाठी पाणी आवश्यक असते. एक दिवस घरी पाणी आले नाही तर आपली दैनंदिन कामे खोळंबतात. पाण्यासाठी दुसरे पर्याय शोधावे लागतात. पाण्याशिवाय सजीव आपलं अस्तित्व टिकवू शकत नाही. एक वेळ पोटात अन्न नसले तरी फक्त पाण्यावर माणुस 3 दिवस राहू शकतो. इतकी क्षमता पाण्यात आहे. ज्या पंचमहाभूतांमुळे आपलं अस्तित्व आहे, त्यात जल अर्थात पाणीही आहे. पाणी हे जितके पारदर्शक आहे तितकेच ते निर्मळ आणि शुद्ध आहे. पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून असते तसेच हेच पाणी वर्षभर आपल्याला नळाद्वारे पुरवले जाते. ही नैसर्गिक संपत्ती जपण्याचे आवाहन केले जाते.पण बऱ्याच ठिकाणी आपल्याला दिसून येते, की नळ वाहत असते, किंवा उगाच पाणी वाया घालवले जाते. पुढील काळासाठी पाणी जपून वापरणं किती गरजेचे आहे हे माहीत असूनही तशा उपाययोजना होताना दिसत नाहीत किंवा नागरिकांमध्ये त्याबाबत जनजागृती दिसून येत नाही. पाण्याचे सजीवांच्या जीवनातील महत्त्व तसेच पाणी ह्या संपत्तीचे जतन कसे करावे, याविषयी माहिती देणारे पुस्तक म्हणजे कवी, सामाजिक कार्यकर्ते श्रीधर खंडापूरकर लिखित 'जल्पशिल्प' काव्यसंग्रह होय. संपूर्णतः पाणी या विषयाला समर्पित केलेला हा काव्यसंग्रह जीवनातील महत्वाचा मुद्दा अधोरेखित करत आहे. स्वतःच्या बालपणी पाण्याच्या दुर्भिक्षतेमुळे होणारी वणवण अनुभवल्यामुळे पाण्याचे महत्त्व आणि पाण्यावाचून होणारे हाल याची जाणीव त्यांना आहे. या नैसर्गिक देणगीच्या योग्य वापर व्हावा तसेच पुढील पिढीला सुद्धा याचे महत्त्व समजावे यासाठी कवीने केलेला हा लेखन प्रपंच स्तुत्य आहे. याआधी कवी खंडापूरकर यांचे जलाशय, जलधारा, गंगोत्री, सोनियाचा दिस, जलपुष्प , जलसागर या साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत. समाजाप्रति आपलं काही दायित्व आहे, या भावनेने कवी आपल्या लेखणीतून जनजागृती तसेच प्रबोधनाचे कार्य करत आहेत. 'जलसाक्षरता हाच सजीवांच्या उज्ज्वल भविष्याचा एकमेव आधार आहे' या कवीच्या रचनेतून जलसाक्षर होणे गरजेचे आहे हा विचार कविने मुख्यत्वे पुढे आणला आहे. या काव्यसंग्रहातील रचना ह्या काव्याच्या कोणत्याही छंदात बसवलेल्या नाहीत. या मुक्त रचना आहेत. तसेच यातील कवीचे विचार हे सुविचारांच्या रुपात अवतरले आहेत. त्यांची लेखनशैली ओघवती आहे. त्यामुळे पाणी या विषयावर त्यांनी वैविध्यपूर्ण लेखन केलेले आहे. कमीत कमी शब्दातून पाण्याचे सामर्थ्य त्यांनी मांडले आहे. खरोखरीच या काव्याद्वारे पाण्याच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचा आढावा घेतला आहे. शहरी भागात घरात पाणी उपलब्ध असल्यामुळे पाण्यासाठी पायपीट करावी लागत नाही. पण आजही खेड्या- पाड्यात पाण्यासाठी डोक्यावर हंडे घेऊन पायपीट करावी लागते. घरोघरी पाण्याची सुविधा नाही. नैसर्गिक स्रोत आटल्यामुळे तोही आधार राहत नाही. औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक स्रोत बुजवले जातात. आपल्याला फक्त आपला नाही तर येणाऱ्या पिढीचाही विचार करायचा आहे. त्यासाठी पाणी बचतीचा मंत्र घरोघरी पोहचणे आवश्यक आहे. हाच मंत्र 'जलशिल्प' मधून विशद केलेला आहे. सामाजिक भान ठेवून कवी खंडापूरकर यांनी पाण्याचे महत्त्व जनमानसात पोहचावे यासाठी लेखणीचे माध्यम हाती घेतले. हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून स्वतःपासून सुरुवात करण्याची प्रेरणा ह्या पुस्तकातून मिळते. आपल्या आजुबाजुच्या निसर्गाला तसेच जीवसृष्टीला जपण्यासाठी पाणी बचत करायला हवे, पाणी जपुन वापरले पाहिजे, हा मौलिक संदेश देणारा हा काव्यसंग्रह आवर्जून वाचावा असा आहे.




**( जलशिल्प -काव्यसंग्रह / कवी श्रीधर खंडापूरकर / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य : १५० रुपये )**

# 'कुमारांशी संवाद' काळाची गरज

आधुनिक केसरी



जयेश अर्जुन माधव

**छडी लागे छम् छम्.. विद्या येई घम् घम्.. आपल्या काळातील शिक्षणाची ही पद्धत कधीच मागे पडली आहे. तंत्रज्ञानाच्या युगात मुले अपडेटेड आहेत. टीव्ही, मोबाईलच्या माध्यमातून मुलांची शिक्षणाची आणि अभ्यासाची व्याख्याच बदललेली आहे. पालक, मुले आणि शिक्षक यांच्यात वैचारिक संघर्ष वाढला आहे किंवा पालक मुले आणि शिक्षक यांच्या विचारात खूप मोठा गॅप पडत आहे किंवा आपण असेही म्हणू शकतो की जनरेशन गॅप खूप झपाट्याने वाढत आहे अशा परिस्थितीमध्ये कुमार वयातील मुलांना आजच्या परिस्थितीत समजून घेऊन कोणीतरी विचार करणे गरजेचे होते, यासाठीच सिंधुदुर्ग जिल्हा आणि गोव्यातील प्रतितयश आणि समाजभिमुख मानसोपचार तज्ञ डॉक्टर रुपेश पाटकर यांचे 'कुमारांशी संवाद' हे पुस्तक प्रकाशित होत आहे.**

मुले अभ्यास करत नाहीत मोबाईल आणि टीव्ही मध्येच अडकत चालली आहेत ही पालक आणि शिक्षकांची तक्रार आता नेहमीच झाली आहे पण मुलांच्या बाजूने विचार करता शिक्षण हे फक्त पुस्तकात न राहता ते इतर माध्यमातूनही मुलांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे हे पालक आणि शिक्षक या दोघांनाही योग्य वेळी कळायला हवे हे लेखकाने अनेक उदाहरणांमधून दाखवून दिले आहे. अनेक ठिकाणी मानसशास्त्रामधले दाखले देऊन स्पष्ट केले आहे. फक्त घोकणे आणि परीक्षेत ओकणे म्हणजे शिक्षण नव्हे. कृतीतून, प्रयोगातून, अनुभवातून शिक्षण देण्याचे प्रयत्न करायला हवेत असे लेखकाला वाटते.

शिक्षण घेताना मुलांना आनंद वाटला पाहिजे साचेबद्ध शिक्षणातून बाहेर पडून चाकोरी बाहेरचे शिक्षण मुलांना कसे देता येईल याचा विचार शिक्षकांनी करायला हवा. खरं तर हे पुस्तक मुलांपेक्षा शिक्षकांना जास्त उपयुक्त आहे. क्रमिक पुस्तकांच्या अभ्यासातून फक्त घोकमपट्टी वाढते पण कार्यशाळा,उपक्रम,शिबिरातील अनुभव यामुळे मुलांना सहजपणे अनेक गोष्टी शिकता येतात. लेखक स्वतः मूल्यनिष्ठ जीवन जगत आहे त्यामुळे त्यांनी मांडलेले विचार हे जास्त तत्त्वनिष्ठ आहेत.


बहुतेक वेळा मुले बोलायला संकोचतात. अशावेळी वेगवेगळ्या प्रकारे मुलांमधील भीती घालवून मुलांना बोलतं करता येतं. प्रत्येक वेळी मुलांना दोष देत बसण्यापेक्षा त्यांच्यातील त्रुटी दूर करता येऊ शकतात हे लेखकाने उदाहरणासहित स्पष्ट केले आहे.

चांगल्या गोष्टींसाठी मुलांचं कौतुक करणे हे खरंतर मुलांचे टॉनिक आहे पण मुले शेफारून जातील म्हणून आपण ते त्यांना देत नाही.चांगल्या बदलासाठी कौतुक हे टॉनिक मुलांना द्यायला हवे असे लेखक आवर्जून सांगतो.

पाठ्यपुस्तकातलं घोकण आणि परीक्षेत पुरेपूर ओकणं म्हणजे चांगला अभ्यास हा आपला समज आहे. रट्टा मारून चांगले मार्क मिळवण्याला आपण प्राधान्य देतो याचा अर्थ मुलांना ते विषय समजले असे होत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष जीवनात याचा काही उपयोग होत नाही. मुलं विचार करू लागली, तर्क वापरू लागली, एखाद्या गोष्टीचा जीवनाला काय उपयोग हे तपासू लागली तर असा रट्टा मारण्याची फारशी गरज उरणार नाही. यासाठी पालकांसोबत शिक्षकांनीही मेहनत घेण्याची गरज आहे.

काही विद्यार्थी वर्गात मागून खट्याळ पणा करतात. कमेंट करतात आणि इतर मुलांचे लक्ष विचलित करतात. अशा मुलांना वाह्यात मुले म्हणून बाजूला केले जाते पण या मुलांमध्ये सुद्धा सृजनशीलता,उस्फूर्तता असते हे जाणून घेऊन शिक्षकांनी आपले कौशल्य पणाला लावून अशा मुलांना यथोचित मार्गावर आणायला हवे असे लेखकाला वाटते.

शिक्षक म्हणजे पोलीस नव्हे आणि धर्मगुरू ही नव्हे तर शिक्षक हा सामाजिक अभियंता असायला हवा, अध्यापन आणि अध्ययन या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रतिसादा नुसार अध्यापन बदलायला हवे, ते लवचिक असायला हवे हे शिक्षकाचे कौशल्य आहे असे लेखकाला वाटते. कुमारवयीन वय हे मुला-मुलींचे बदलाचे वय आहे. या वयात मुलांची वाढ ही उस्फूर्तपणे व्हायला हवी. आई-वडिलांकडून केले जाणारे संगोपन आणि शिक्षकांकडून होणारे मार्गदर्शन या वयात खूप परिणामकारक असते.त्याचबरोबर आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी नकळतपणे मुलांवर परिणाम करत असतात हे पालक आणि शिक्षकांनी वेळीच ओळखायला हवे.




"कुमारांशी संवाद" हे पुस्तक म्हणजे खरंतर पालक आणि शिक्षक यांच्याशी साधलेला संवाद आहे असे मला वाटते. मानसशास्त्रीय परिभाषा वापरून कुमारवयीन मुलांवर कुमारवयीन संस्कार केले जाऊ शकतात पण पालक आणि शिक्षक यांनी ते समजून घेतले पाहिजे. आपली मुले हट्टी, अडेलतट्टू, खट्याळ आहेत ही सुधारणारच नाहीत अशा समजुतीमुळे ती अधिक चुकीच्या मार्गावर जातील पण लेखकांनी सांगितलेल्या गोष्टी वापरून जर मुलांवर संस्कार केले तर आपली मुले ही जगातील सगळ्यात संस्कारी आणि चांगली मुले वाटू लागतील. अतिशय छान पद्धतीने विषयाची मांडणी करून लेखक डॉक्टर रुपेश पाटकर यांनी पालक आणि शिक्षक यांच्यासाठी हा अनमोल नजराणा दिला आहे. हे पुस्तक म्हणजे खऱ्या अर्थाने काळाची गरज आहे.

**पुस्तक परिचयः जयेश अ.माधव**
**पुस्तकाचे नावः कुमारांशी संवाद**
**लेखकः डॉ.रुपेश पाटकर**

# अनिवासी भारतीयांना जोडून ठेवण्याचा विचार!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**प्रवासी भारतीय दिवसाचे आयोजन भारत सरकारचे अनिवासी भारतीय कार्य मंत्रालय- मिनीस्ट्री ऑफ ओव्हरशीज इंडियन अफ्फेअर्स व उत्तर पूर्वी क्षेत्र विकास मंत्रालय- मिनीस्ट्री फॉर डेव्हलपमेंट ऑफ नॉर्थ इस्टर्न रेजियन, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री यांच्या मार्फत केले जाते. ७ ते ९ जानेवारी दरम्यान भारतामधील एखाद्या शहरात प्रवासी भारतीय दिवसानिमित्त अनेक सोहळे व कार्यक्रम आयोजित केले जातात. सन २०१४ सालच्या बाराव्या प्रवासी भारतीय दिवसाला ५१ देशांमधील सुमारे १,५०० प्रतिनिधींनी हजेरी लावली. तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते प्रवासी भारतीय सन्मान पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.**

भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी यांना ८ जानेवारी २००२ रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे एका सार्वजनिक कार्यक्रमात समितीचा अहवाल प्राप्त झाला आणि दि.९ जानेवारी २००२ रोजी या प्रवासी भारतीय दिवस- पीबीडीची घोषणा केली. भारतामध्ये मोठ्यासंख्येने लोक शिक्षणासाठी तसेच नोकरी व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी जगातील विविध देशांमध्ये गेलेले आहेत. त्यातील बरेच भारतीय तिथेच स्थायिक झालेले आहेत. या भारतीयांनी या देशांमध्ये राहताना आपली प्रगती करून घेतलीच, पण त्याचसोबत ते राहत असलेल्या देशांच्या विकासामध्ये मौलिक योगदान दिले आहे. अशा जगभरात पसरलेल्या अनिवासी भारतीयांना आपला मूळ देश असलेल्या भारताशी जोडून घेण्यासाठी एक नवा विचार पुढे आला. त्यातूनच प्रवासी भारतीय दिन या संकल्पनेचा जन्म झाला. भारत सरकारकडून दरवर्षी ९ जानेवारी हा दिवस प्रवासी भारतीय दिन म्हणून साजरा केला जातो. पहिला प्रवासी भारतीय दिवस ९ ते ११ जानेवारी या कालावधीत २००३ साली साजरा करण्यात आला होता. भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कल्पनेतून या दिवसाची सुरूवात करण्यात आली. आपल्या देशातून अन्य देशात गेलेल्या भारतीय लोकांनी आपल्या मूळ भूमीशी आणि संस्कृतीशी जोडले जावे, त्यांच्याशी असलेले संबंध अधिक दृढ व्हावेत, हा या मागील हेतू होता. प्रवासी भारतीय दिनी विदेशात राहून विविध क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या भारतीयांना प्रवासी भारतीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. विदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांच्या मनात भारताविषयी काय भावना आहे? जगातील अन्य देशांच्या तुलनेत भारताने आणखी काय करायला हवे? भारत आणि इतर देश यांच्यामध्ये काय समान धागे आहेत? अशा अनेक गोष्टींचे वैचारिक आदान प्रदान व्हावे, त्यासाठी हे प्रवासी दिन हे व्यासपीठ आहे. यामध्ये विशेषतः तरुण वर्गाला अनिवासी भारतीयांकडून मार्गदर्शन केले जाते. विदेशातील नव्या संधींबद्दल यांना माहिती मिळते. अनिवासी भारतायींच्या माध्यमातून भारतात नवी व्यावसायिक गुंतवणूक आकर्षित करण्याचाही प्रयत्न केला जातो. प्रवासी भारतीय दिवसाचे आयोजन भारत सरकारचे अनिवासी भारतीय कार्य मंत्रालय- मिनीस्ट्री ऑफ ओव्हरशीज इंडियन अफ्फेअर्स व उत्तर पूर्वी क्षेत्र विकास मंत्रालय- मिनीस्ट्री फॉर डेव्हलपमेंट ऑफ नॉर्थ इस्टर्न रेजियन, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज आणि कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री यांच्या मार्फत केले जाते. ७ ते ९ जानेवारी दरम्यान भारतामधील एखाद्या शहरात प्रवासी भारतीय दिवसानिमित्त अनेक सोहळे व कार्यक्रम आयोजित केले जातात. सन



२०१४ सालच्या बाराव्या प्रवासी भारतीय दिवसाला ५१ देशांमधील सुमारे १,५०० प्रतिनिधींनी हजेरी लावली. तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते प्रवासी भारतीय सन्मान पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. प्रवासी भारतीय दिन सुरू करण्याचे श्रेय लक्ष्मीमल सिंघवी समितीला जाते. भारत सरकारकडून प्रवासी भारतीय पुरस्कार दिला जातो. विदेशात उत्तम कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते दिला जातो. भारतीय लोक विदेशात मोठ्या संख्येने स्थायिक होत आहेत. आता जग हे आधुनिक वाहतूक आणि दूरसंपर्क यंत्रणांनी जोडले गेले आहे. असे असतानाच भारतात अजून बऱ्याच पायाभूत सुविधांची गरज आहे. भारत खेड्यांचा देश आहे. मोठ्या प्रमाणात लोकसंख्या ही खेडोपाडी वसलेली आहे. त्या सगळ्यांपर्यंत अजून बऱ्याच पायाभूत सुविधा पोहोचण्याची गरज आहे. प्रवासी भारतीय दिवस साजरा करण्याचा उद्देश- परदेशी भारतीयांना देशवासीयांशी संवाद साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, जेणेकरून परदेशातील भारतीयांचे नेटवर्क तयार होईल, भारतीय तरुणांना परदेशी भारतीयांशी जोडणे, परदेशातील भारतीय समुदाय फायदेशीर उपक्रमांसाठी देशातील सरकार आणि नागरिकांशी सहज संपर्क साधणे, गुंतवणुकीच्या संधी वाढवणे, हे देखील मुख्य उद्दिष्टांपैकी एक आहे. प्रवासी भारतीय दिवसातील काही प्रमुख तथ्ये- अनिवासी भारतीयांना भारताविषयी त्यांच्या भावना, दृष्टिकोन आणि धारणा व्यक्त करण्यासाठी खुले व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. जगातील सर्व देशांमध्ये अनिवासी भारतीयांचे नेटवर्क तयार करणे आणि तरुण पिढीला स्थलांतरितांशी जोडणे. या दिवशी सरकार डायस्पोरांना त्यांच्या मुळाशी जोडण्यावर लक्ष केंद्रित करते जेणेकरून ते देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतील. प्रवासी भारतीय दिवस परिषद नवी दिल्लीत पार पडली. प्रादेशिक प्रवासी भारतीय दिवस भारताबाहेर सुद्धा आयोजित केला जातो. पीबीडीच्या अधिवेशनात पात्र व्यक्तींना बक्षिसे दिली जातात. पीबीडीचा मुख्य उद्देश भारतीय डायस्पोरा जोडणे आहे.

भारताचे विद्यमान पंतप्रधान जेव्हा विदेशी दौऱ्यावर जातात, तेव्हा तेथील भारतीयांना भेटत असतात. मा.नरेंद्र मोदी जेव्हा भारताचे पंतप्रधान झाले, तेव्हा अनिवासी भारतीय आणि भारत यांच्यामध्ये जास्तीत जास्त संबंध येण्यासाठी तसेच विदेशातील भारतीयांना भारताशी जोडण्यासाठी मोठा प्रयत्न करण्यात आला. त्यातून हाऊडी मोदी यासारख्या मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यातून मा.मोदींनी अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांना प्रभावीत केले होते. त्यांनी पंतप्रधान झाल्यानंतर जगातील अनेक देशांचे दौरे केले. त्यांनी तिथे राहणाऱ्या भारतीयांचे मोठे मेळावे घेतले. त्यात त्यांना मोठा प्रतिसाद मिळतो. या दिवसाचे महत्त्व असे- अनिवासी भारतीयांनी राष्ट्राच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी केलेले उपकार आणि योगदान लक्षात ठेवणे, सन १९१५मध्ये या दिवशी गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले होते, त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले आणि भारतीयांचे जीवन कायमचे बदलले होते, म्हणूनच आपला देश हा दिवस साजरा करत आहे.

# वृत्तपत्र लेखक श्याम ठाणेदार राज्यस्तरीय पत्रभूषण पुरस्काराने सन्मानित!

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** मराठी वृत्तपत्र लेखक संघ, महाराष्ट्र राज्य या राज्यस्तरीय संस्थेच्या वतीने वृत्तपत्र लेखक श्याम ठाणेदार यांना राज्यस्तरीय पत्रभूषण पुरस्कार २०२३ हा मानाच्या पुरस्कार देऊन सन्मानित केले आले. मराठी वृत्तपत्र लेखक संघ महाराष्ट्र राज्य या संस्थेचा २२ वा वर्धापन दिन तसेच पत्रकार दिनाचे औचित्य साधून ६ जानेवारी रोजी मुंबईतील मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात राज्यातील वृत्तपत्र लेखकांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनात श्याम ठाणेदार यांना संजय केळकर (आमदार, ठाणे) सुकृत खांडेकर (मुख्य संपादक दैनिक प्रहार) तसेच संस्थेचे, संस्थापक अध्यक्ष एकनाथ बिरवटकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी जगन्नाथ हेगडे (माजी नगरपाल मुंबई हेमराज बागुल (संचालक, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनाय महाराष्ट्र राज्य) सुहास बिऱ्हाडे (ब्युरो चीफ दैनिक लोकसत्ता) आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी राज्यभरातील पत्रकार, संपादक, वृत्तपत्र लेखक तसेच सामाजिक क्षेत्रांत काम करणारे मान्यवर मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. श्याम ठाणेदार हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध वृत्तपत्र लेखक असून ते महाराष्ट्रातील विविध वर्तमानपत्रात लेखन करतात. विविध विषयांवरील



त्यांचे हजारो लेख विविध वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले असून महाराष्ट्रभर त्यांचा वाचकवर्ग आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन मराठी वृत्तपत्र लेखक संघ महाराष्ट्र राज्य या संस्थेने पत्रभूषण २०२३ हा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे. श्याम ठाणेदार यांना याआधीही विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे त्यात मुंबईतील अभिजित राणे फाउंडेशनने त्यांना राज्यस्तरीय पत्रभूषण पुरस्कार तसेच सूनिर्मल फाउंडेशनने राज्यस्तरीय आदर्श स्तंभ लेखक पुरस्काराने गौरविले आहे. पुण्यातील ज्ञानसंकल्प समाजीक संस्थेतर्फे त्यांना राज्यस्तरीय आदर्श साहित्य सेवा पुरस्काराने गौरविले आहे. साप्ताहिक भगवे वादळने त्यांना प्रबोधनकार ठाकरे पुरस्काराने गौरविले आहे. छत्रपती संभाजी महाराज नगर (औरंगाबाद) येथील एआयएफएस वैद्यकीय समितीने त्यांना राज्यस्तरीय आदर्श लेखक पुरस्काराने गौरविले आहे. याशिवाय पंढरपूर वृत्तपत्र लेखक संघ, सोलापूर वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई वृत्तपत्र लेखक संघांनी त्यांना राज्यस्तरीय आदर्श वृत्तपत्र लेखक म्हणून गौरविले आहे. धाराशिव येथे झालेल्या जिल्हा स्तरीय साहित्य संमेलनात ते प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी झाले होते.

## खंडाळा येथे साई पारायण व रामायण कथा आरंभ

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** तालुक्यातील खंडाळा येथे साई क्रांती रत्न, युवा शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळ यांच्या वतीने गुरुवार(ता,०५) रोजी सकाळी शिर्डी चे साईबाबा यांचे साई सच्चरीत पारायण आरंभ झाले,व सायंकाळी संगीतमय तुलसी रामायण कथा रामायणाचार्य हभप विकास महाराज गायकवाड यांच्या अमृत वाणीतून आरंभ झाले, साई सच्चरीत पारायण साठी २०५ साई भक्त बसलेले आहेत, वाचक ज्ञानेश्वर माऊली गायकवाड आहेत,सायंकाळी रामायणाचार्य विकास महाराज गायकवाड यांचे खंडाळा गावात आगमन होताच लेझीम पथक व शोभेची दारू सोडून त्यांचे जोरदार स्वागत झाले,व्यासपीठावर प्रभू रामचंद्र यांची भव्य दिव्य मूर्ती आहे, साईबाबा यांचीही मूर्ती आहे,या समयी वैजापूरचे सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत व महाराष्ट्र नारायणी सेनेचे अध्यक्ष अशोक आप्पा पवार यांनी विकास महाराज यांचे पूजन केले उपसरपंच यांनी सपत्नीक पूजन केले या समयी उत्तम पवार यांची उपस्थिती होती,मंडळाच्या कार्यकर्त्यांनी छान नियोजन कलले आहे,बुधवार ता,११रोजी गावातून साई पालखी मिरवणूक निघणार व शिर्डीला व शुक्रवार ता१३रोजी पायी पालखी मिरवणूक शिर्डीला जाणार आहे.

## लोकलमधून पडून पोलिसाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** पवई पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षकाचा मध्य रेल्वेवरील कळवा रेल्वे स्थानकादरम्यान धावत्या लोकलमधून पडून शुक्रवारी मृत्यू झाला. ठाणे रेल्वे पोलिसांनी याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. मनोज भोसले (५७) असे मृत पोलिसाचे नाव आहे. कळवा रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर शुक्रवारी रात्री ९.२० च्या सुमारास लोकलमधून पडून एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याची माहिती स्थानकातील कर्मचाऱ्यांना मिळाली. तात्काळ त्यांनी या घटनेची माहिती ठाणे रेल्वे पोलिसांना दिली. पोलिसांनी केलेल्या तपासात मृत्यू झालेल्या प्रवाशाच्या पाकिटात मनोज भोसले नाव असलेले ओळखपत्र सापडले. या ओळखपत्रावरून सदर प्रवासी पवई पोलीस ठाण्यात कार्यरत असल्याचे पोलिसांना समजले.

## बहुभाषिक पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धर्माबाद :** मराठी पत्रकारितेचा पाया रोवणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीननिमीत्य शहरातील शासकीय विश्रामगृह धर्माबाद येथे दि:६ जानेवारी रोजी सकाळी ११:३० वाजता आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवर व पत्रकार यांनी केले. यावेळी या कार्यक्रमांचे अध्यक्ष वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मीनारायण केशटवार तर प्रमुख पाहुणे पोलिस निरीक्षक संजय हिबारे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख गणेश गिरी, सेवा सहकारी सोसायटी रत्नाळी संचालक,शंकर पाटील होटे , प्रतिष्ठित जेष्ठ व्यापारी मन्मत आप्पा, प्रकाश सेठ गुजराती उपस्थित होते. यावेळी दर्पण दिनानिमित्त लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकार बांधवांचा व मान्यवरांचा डायरी,पेन, नविन



वर्षाचे कॅलेंडर,शाल,पुष्पहार देऊन बहुभाषिक पत्रकार संघाचे अध्यक्ष गंगाधर धडेकर यांच्या वतीने सन्मान करण्यात आला.
यावेळी बहुभाषिक पत्रकार संघाचे सचिव अशोक पडोळे, उपाध्यक्ष पंडित पाटील जाधव, मार्गदर्शन कृष्णा तिम्मापुरे,कालीदास अंतोजी,पोतन्ना लखमावाड, रमेश कतुरवार, सुरेश घाळे, गणेश पाटील राजापूरकर,महेश जोशी, बालाजी बकावाड, व्यंकट डोईवाड, बाबुराव गोणारकर, नारायण सोनटक्के, नारायण ईबितवार, धनंजय गायकवाड, अब्दुल खदीर उपस्थित होते.

# युवकांमध्ये देशभक्ती निर्माण करण्यात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्य अतुलनीय

## प्राचार्य डॉ. सतीश दांडगे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संचलित मॉडेल कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा विशेष श्रमसंस्कार शिबिर मौजे देवडी हदगाव येथे दिनांक 6 जानेवारी ते 12 जानेवारी दरम्यान संपन्न होत आहे. आज सहा जानेवारी रोजी उद्घाटनिय सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सतीश दांडगे हे होते तर विशेष उपस्थिती म्हणून सरपंच श्री अंकुश देवडे,श्री अण्णासाहेब देवडे, श्री.नानासाहेब देवडे, श्री गाडेकर, यावेळी अध्यक्षीय समापनामध्ये प्राचार्य डॉ. सतीश दांडगे यांनी विद्यार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना सांगितले की" राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्थापना,तिचा उद्देश खऱ्या अर्थाने युवकांमध्ये



देशभक्तीची भावना निर्माण होण्याबरोबरच विवेकशील पिढी तसेच सर्वगुणसंपन्न देशाचा युवक घडावा यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिलेली आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आणि देशाच्या विकासात या युवाशक्तीची भूमिका अत्यंत मोलाची आहे. खऱ्या अर्थाने राष्ट्रभक्ती,देशभक्ती ची भावना युवकांच्या मनामध्ये रुजविण्यास रासेयो शिबिरे महत्त्वाची भूमिका बजावतात." यावेळी उद्घाटनिय भाषणामध्ये डॉ. बद्रीनाथ घोंगे यांनी सांगितले की "राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून युवकांमध्ये सामाजिक भान आणि सेवाभाव वाढीस लागतो."प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. बाळासाहेब वरखडे यांनी करताना राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध जनजागृती पर आणि प्रबोधन परक उपक्रमाची माहिती दिली तसेच श्रमसंस्कार शिबिरामध्ये घेण्यात येणाऱ्या विविध सांस्कृतिक,बौद्धिक कार्यक्रमाची माहिती दिली. यावेळी सरपंच अंकुश देवडे यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी प्रतिनिधी वैभव कराळे ,स्नेहल बर्डे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कन्नुलाल विटोरे यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. संतोष गायकवाड यांनी मानले. यावेळी जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी डॉ बाळासाहेब सोनवणे, डॉ. भीमराव पूंडगे,प्रा.उदय पवार,डॉ ऋषीबाबा शिंदे,डॉ वाल्मिक मेश्राम,डॉ.संभाजीराव मराठे प्रा. भागवत गोरे,डॉ विठ्ठल लोंढे, डॉ. अनिल तुपकर, प्रा. सुधीर कुमार राठोड, प्रा. शरद बागडे, प्रा. दीपक कांबळे ,श्री गणेश सूरासे, नेमिणाठ मुळे,आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अशोक राठोड यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**तेलगाव :** राजे यशवंतराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रत्येकी



वर्षा प्रमाणे जय मल्हार सामाजिक प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने समाज उपयोगी कार्याद्वारे ही जयंती साजरा करण्यात येते यानिमित्ताने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन 2022 याची घोषणा करण्यात आलेली आहे. लवकरच मान्यवरांच्या हस्ते हा वितरण सोहळा संपन्न होईल. समाजाच्या विविध घटकांना सामाजिक प्रवाहामध्ये आणण्याच्या साठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. याची माहिती जय मल्हार सामाजिक प्रतिष्ठान बीड चे अध्यक्ष मा. प्रा. राजेंद्र गाडेकर सर मा. भगवान मानेसर प्रा.नामदेव चांगन सर, प्रा. चंद्रकांत चाळक सर व त्यांच्या सर्व सहकार्यानी दिली आहे त्याबद्दल माजी मंत्री लोकनेते जयदत्त आण्णा क्षीरसागर साहेब आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव.तसेच बीड चे नगराध्यक्ष मा.डॉ.भारतभूषणजी क्षीरसागर साहेब व उपाध्यक्षा मा.प्राचार्या दीपाताई क्षीरसागर, युवा नेते डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर साहेब डॉ मचाले सर,डॉ.देशमाने सर, राऊत सर, .सरस्वती मा.व उच्च माध्यमिक विद्यालयचे प्राचार्य व्हि. आर. शिंदे, पर्यवेक्षक बी.एस.चवार, कनिष्ठ प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व त्यांचा मोठ्या संख्येने असलेल्या मित्र परिवाराने त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिलेल्या आहेत.

# तंत्रज्ञानच्या मदतीने नव्या संधीचा शोध घ्या : प्रा.डॉ. वायकर



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ग्रामीण भागातील समस्यांच्या निराकरणासाठी तंत्रज्ञान हे एक वरदान ठरत आहे ,विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समस्येचे रुपांतर संधीत करायला हवे व त्यातून विकास करावा, असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ.भालचंद्र वायकर यांनी केले. विद्यापीठातील गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभाच्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. नवीन शैक्षणिक धोरण हे रोजगारभिमुख असल्यामुळे मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर वाढणार आहे. त्यासाठी तांत्रिक कौशल्य प्रत्येकाने आत्मसात करावी. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांने अक्याडमिक बँक क्रेडीटमध्ये नोंदणी करण्याचे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक प्रा.डॉ. भगवान साखळे यांनी संस्थेअंतर्गत चालणाऱ्या विविध उपक्रमांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. ग्रामीण विकास या क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होणार असल्यामुळे या क्षेत्राला महत्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण विकासात संस्थेचे मोलाचे योगदान आहे आणि आगामी काळात हि संस्था ग्रामीण विकासासाठी दिशादर्शक ठरणार आहे, असे मत कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ.साखळे यांनी व्यक्त केले.

# ट्रॅक्टर ट्रॉली, जुगाडमधून होतेय धोकादायक ऊस वाहतूक

आधुनिक केसरी न्यूज

**अतुल वेताळ**

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील साखर कारखाण्याचा गळीत हंगाम सुरु झाला असुन त्या साठी ऊस वाहतूक देखील मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. ही ऊस वाहतूक करताना धोकादायक पध्दतीने ट्रॅक्टर ट्रॉंली, जुगाड मधून बेकायदेशीर पध्दतीने ऊस वाहतूक केली जात असून या वाहतुकीने वाहनधारकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, परंतु या संबंधीत कारखाने, पोलीस प्रशासन, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी अशा धोकादायक पध्दतीने वाहतूक करणाऱ्या वाहतुकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसून येते. सध्या कारखान्याचा गळीत हंगाम चालू झाला आहे. खुलताबाद तालुक्यातील घृष्णेश्वर शुगर प्रा. लि. चालू झाला आहे गळीतासाठी लागणारा ऊस तालुक्यातील परिसरातुन आणला जात आहे त्याच्या वाहतूकी साठी ट्रॅक्टर ट्रॉंली,जुगाड, याचा वापर करतात.यामुळे वाहतुकीस अडथळा, नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.



वाहतुकीचे कोणतेही नियम न पाळता धोकादायक पद्धतीने ऊस वाहतूक होत आहे. अरुंद रस्त्यावर तर या ट्रॅक्टर ट्रॉल्यांपासून अपघाताची शक्यता जास्त प्रमाणात निर्माण झाली आहे. एका ट्रॅक्टरला दोन दोन ट्रॉल्या जोडून आणि ट्रॅक्टर ट्रॉल्यांची लांबच लांब रांग करून रस्त्यावर अडथळे निर्माण केले जात आहेत. तसेच या ट्रॅक्टर ट्रॉल्यांना कुठल्याही प्रकारे वाहतूक नियमाप्रमाणे बनवलेले नाही. त्यामुळे अपघाताच्या शक्यता निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा ट्रॉल्या वापरण्यास परवानगी आहे की नाही, त्या कायदेशीर आहे की नाही, याची संबंधितानी चौकशी करायला हवी. त्याचप्रमाणे ट्रॅक्टरमधून ऊस वाहतूक करणारे चालक ट्रॅक्टरमध्ये मोठे मोठे लाऊड स्पीकर्स लावून, डेसिबलचे नियम मोडत, मोठ्या आवाजात गाणे आणि संगीत लावत ऊस वाहतूक करताना जागोजागी दिसून येत आहेत. ट्रॅक्टरच्या इंजिनचा आवाज त्यात या लाऊड स्पीकरचा कर्ण कर्कश्य आवाज यामुळे या चालकाला आजूबाजूंनी येणारे आवाज, तसेच पाठीमागून येणाऱ्या वाहनांचा आवाज ऐकण्यास मिळत नाही. त्यामुळे सुद्धा अपघाताचा धोका होऊ शकतो. मात्र याकडे सर्वच विभागांचे दुर्लक्ष झालेले दिसून येत आहे. या लाऊड स्पीकरच्या आवाजांचा त्रास रात्रीच्या वेळी आणि पहाटेच्या वेळी अधिक होत असतो.

चालक मद्यप्राशन करून साउंड सिस्टीमचा आवाज वाढवून ट्रॅक्टर दामटतात. अशी नागरिकात चर्चा होते, त्यामुळे हे ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर इतर वाहनचालकांच्या जिवावर उठल्याची स्थिती आहे. ट्रॅक्टरला दोन ट्रॉली जोडून क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात उसाची वाहतूक होते. रस्ता नागमोडी, उताराचा व चढावाचा असल्यास अपघाताचा धोका वाढतो.वेळीच यावर संबंधीतानी निर्बंध घालावे ,व होणाऱ्या दुर्घटना टाळाव्यात अशी मागणी वाहन धारकां कडून होत आहे.

# आमदार सतीश चव्हाण यांच्या वतीने पत्रकारांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असुन पत्रकारांनी समाजाच्या विकासासाठी केलेले कार्य अतुलनीय असल्याचे मत आमदार सतीश चव्हाण यांनी केले आहे. याचबरोबर ग्रामपंचायत नवनिर्वाचित सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्या वतीने पत्रकारांचे स्वागत करण्यात आले यावेळी सरपंच शबाना रहीम शेख, माजी उपसरपंच मुन्नी बाजी,ग्रामपंचायत सदस्य सैय्यद मतीन, अश्विनी पेहरकर, किशोर जाधव, कांताबाई देशमुख, पत्रकार शेख अमीर, किशोर पाटील, शिवाजी गायकवाड, अभय विखनकर, बी के पठाण, शिवाजी अस्वार, प्रकाश लकडे व तसेच रहीम शेख, शेख बाबा सैय्यद राजीक, गफ्फार शेख, शेख लाला, किरण साळवे ,महेश उबाळे माजी उपसभापती इतरांची उपस्थिती होती.



# अपूर्ण कर्मचाऱ्यांमुळे पीरबावडा येथील उपकेंद्र बंद

## परिसरातील रुग्णांचे हाल; तीन पदे रिक्त

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पीरबावडा :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार प्राथमिक आरोग्य केंद्रातंर्गत पिरबावडा येथील उपकेंद्रात अपूर्ण कर्मचाऱ्यामुळे सदर उपकेंद्र वारंवार बंद राहत असल्याने रुग्णांचे हाल होत आहे. याबाबत या उपकेंद्रात कर्मचाऱ्यांची भरती करून नागरिकांची गैर सोय टाळावी अशी मागणी नागरिक करीत आहे.

पीरबावडा तालुका फुलंब्री हया प्राथमिक आरोग्य केंद्र वडोद बाजार अंतर्गत असलेल्या उपकेंद्राला कर्मचाऱ्यांची संख्या अपूर्ण असल्याने उपकेंद्र वारंवार बंद असल्याने रुग्णांचे हाल होत आहे . या उपकेंद्रांतर्गत सात गावे असून यात पीरबावडा, शेलगाव, रांजणगाव, आडगाव, धानोरा, रिधोरा व कोलते टाकळी, अशी गावेत असून जवळपास १२ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ही गावे या उपकेंद्रात आहे. या ठिकाणी एक एच.ओ., 3 एन. एम. चार आरोग्य सेवक अशी पदे असून एकूण आठ पद असताना या ठिकाणी एन.एम. चे तीन पदे रिक्त आहेत. तर आरोग्य सेवकाचे दोन पदे रिक्त आहेत. या ठिकाणी चार कर्मचारी असून एक कर्मचारी विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद येथे नोकरी करत असून पगार मात्र या उपकेंद्रातून घेत असल्याने या उपकेंद्रात फक्त तीन कर्मचारी असतात तर त्यातील एक कर्मचारी हा वारंवार आजारी असल्याने जास्त काळ आरोग्य राजांवर असतो. त्यामुळे या बारा हजार लोकसंख्येच्या नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविणे या पिरबावाडा उपकेंद्राला अशक्य होत आहे. यातच अंगणवाडी धडक मोहीम, माता आरोग्य तपासणी, अति जोखीम माता तपासणी, लसीकरण, अधि कामे असल्याने येथील कर्मचारी सात गावात वारंवार तारखेला जात असल्याने हे उपकेंद्र नेहमीच बंद राहत असते . तर अनेक औषधी येथे उपलब्ध होत नाही . त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय होत असून सदरील उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावे व विभागीय कार्यालयात असलेला कर्मचारी तालुका परत यावा अशी मागणी नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.




**असून अडचण नसुन खोळंबा**

पिरबावडा येथील उपकेंद्रांत अर्पूण कर्मचारी व एकही आरोग्य सेविका नसल्याने अडचण होत असतांना येथील मंजुर पदापैकी एक कर्मचारी विभागीय कार्यालयात काम करत असल्याने हा कर्मचारी असून अडचण नसून खोळंबा ठरत आहे . तेव्हा हा कर्मचारी तात्काळ परत मिळणार का ? अन्यथा दुसरा कर्मचारी पदे भरण्यात येणार का ? असा प्रश्न सर्व सामान्याना पडला आहे .

# कामकाजाच्या वेळेतच शासकीय कार्यालय सुनसान

## पाच दिवसांचा आठवडा करूनही सरकारी कर्मचाऱ्यांची ऑफिसला दांडी

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** राज्य सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा आठवडा करूनही अनेक सरकारी अधिकारी कर्मचारी ऑफिस वेळेतच ऑफिसला दांडी मारत आहेत. त्यामुळे त्या त्या शासकीय कार्यालयातील सामान्य जनतेची कामे खोळंबून राहत आहेत. जिल्ह्यातील मध्यवर्ती कार्यालयातील आज शासकीय आठवड्यातील शेवटचा दिवस असल्याने अनेक अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी दुपारनंतरच दांडी मारलेली दिसून आले. काही ठिकाणी अधिकारी दौऱ्यावर गेले असल्याचे सांगण्यात आले. सरकार कोणाचेही येऊ द्या, पालकमंत्री कोणीही असो, जिल्हाधिकारी बदलले तरीही एक काम चुकार अधिकाऱ्यांच्या सवय मात्र बदलायला तयार नाहीत. लोकप्रतिनिधींनी जनता दरबार भरवरलेल्या पुरताच हे अधिकारी हजर राहतात. नंतर मात्र ह्या अधिकाऱ्यांचे परिस्थिती जैसे तेच










दिसून येत आहे.
आज आठवड्याच्या शेवट दिवशी दुपारीच गायब झालेले अधिकारी कर्मचारी सोमवारी दुपारनंतर कार्यालयामध्ये आल्याचे दिसणार, असेच चित्र राहिले तर सर्व सामान्य जनतेची कामे कशी होणार? शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कार्यालय सोडायचे असेल तर त्यांना हालचाल रजिस्टर मध्ये नोंद करावी लागते. मात्र मध्यवर्ती कार्यालयात या हालचाल रजिस्टर चा विसर पडल्याचा दिसून येत आहे. शासकीय कार्यालयात दारूच्या रिकाम्या बाटल्यांचा खचही दिसून आला, प्रत्येक कानाकोपऱ्यात बे जबाबदार अधिकाऱ्यांकडून धुम्रपान करून थुकलेल्या पिचकारी, यामुळे त्या परिसरात पसरलेली दुर्गंधी याकडेही लोकप्रतिनिधीनी लक्ष देण्याची मागणी होत आहे. "धडाकेबाज पालकमंत्री म्हणून नावाजलेले सावंत साहेब त्यांच्याकडून अशा काम चुकार अधिकाऱ्यांसाठी एखादा "कामचुकार अधिकारीदरबार"भरवणे अपेक्षित आहे.
अशी ही जनतेतून कुजबुज होत आहे."
तर जिल्हा परिषदेचे सीईओ यांच्या कार्यालयाशेजारील कार्यालयात सुद्धा अनेक ठिकाणी अधिकारी कर्मचारी वेळ आधीच गायब असल्याचे दिसून येत होते. नवनिर्वाचित जिल्हाधिकारी साहेब हे जिल्ह्यासाठी तत्परतेने कार्यरत म्हणून लाभलेले जिल्हाधिकारी प्रवीण गेडाम यांच्यासारखा पवित्रा कधी घेतील? याचीच सामान्य जनता वाट पाहत आहे.




# प्लास्टिक जगातली सर्वात आश्चर्यकारक वस्तू, भारताला उद्योगाची मोठी संधी

## प्लास्टीक उद्योगाची शीर्ष संघटना प्लेक्स कौन्सिलच्या परिसंवादात सूर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्लास्टीकबाबत जगभरात चूकीच्या धारणा आहेत. ते पर्यावरणाला घातक आहे, त्याचे लवकर विघटन होत नाही अशा अनेक समस्या प्लास्टिकशी निगडीत आहेत. मात्र, प्रत्यक्षात प्लास्टिक जगातील एक सर्वांगसुंदर आणि आश्चर्यकारक वस्तू असून त्याच्या शिवाय दैनंदिन जीवनाची कल्पनाही करता येत नाही. फक्त याच्या पुर्नवापराबाबतचे कायदे कडक करून त्यांची कठोर अंमलबजावणी करण्याची गरज असल्याचे मत प्लास्टिक उद्योगातील मान्यवरांनी व्यक्त केले.
महाराष्ट्रातील सर्वात मोठे औद्योगिक प्रदर्शन 'अॅडव्हान्टेज महाराष्ट्र एक्स्पो २०२३' च्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी हॉल क्र.२ मध्ये दुपारी २ ते ४ दरम्यान "प्लास्टिक उद्योगातील निर्यात व व्यवसायाच्या संधी' या विषयावर परिसंवाद रंगला. सुरूवातीला प्लास्टिक उद्योगाची शिर्ष संघटना प्लेक्सकॉन्सीलच्यावतीने तज्ज्ञ श्रीकृष्ण आमलेकर आणि मृणाली इल्ले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. १९५५ मध्ये स्थापित प्लेक्सकॉन्सीलचे २७०० सदस्य आहेत. परिसंवादात श्रिसुंदू मुखर्जी, प्रथितयश उद्योजक सुनील रायथठ्ठा तसेच बीपीसीएल, एचपीसीएल, इंडीयन ऑईल, गेल आणि माझगाव डॉक्सचे प्रतिनिधी सहभागी झाले. त्यांच्याशी मसिआचे किशोर राठी आणि मनिष अग्रवाल यांनी संवाद साधला.
श्रीकृष्ण आमलेकर म्हणाले, प्लास्टीकच्या उत्पादनाला १८५७ मध्ये सुरूवात झाली. मात्र, गेल्या ६० वर्षात याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. भारतात १९५० मध्ये वर्षाकाठी १.५ दशलक्ष टन प्लास्टिकचा वापर व्हायचा. २०२० मध्ये तो ३६७ दशलक्ष टनावर पोहचला आहे. या व्यवसायात वार्षिक ८.२ टक्के वाढ होत आहे. भारताच्या प्लास्टिक व्यवसायाची वार्षिक उलाढाल ३ लाख कोटी रुपये एवढी आहे. भारतात प्रती व्यक्ती प्रती वर्ष १८ ते १९ किलो प्लास्टिकचा वापर होतो. एवढे करूनही भारताचा निर्यातीतील वाटा अवघा १.१ टक्का आहे. यात दरसाल ११ टक्के वाढ होत आहे. या क्षेत्रात देशांतर्गतसह निर्यातीमध्ये भारतीय उद्योगांना मोठी संधी आहे. भारताची प्लास्टिकची निर्यात २०२५ पर्यंत २५ अब्ज अमेरिकी डॉलर्सवर नेण्याचे उद्धिष्ट आहे. सद्या २२ टक्के निर्यातीसह चीन जगातील सर्वात मोठे प्लास्टिक उत्पादक राष्ट्र असल्याची माहिती आमलेकर यांनी दिली. प्लेक्सकॉन्सीलच्या मृणाली इल्ले म्हणाल्या, प्लास्टिकच्या अत्यंत मर्यादीत वापराबाबत आपण जाणून आहोत. पण याचा शेती, वैद्यकीय, टेक्सटाईल, ऑप्टीक, हॉर्टीकल्चर, इलेक्ट्रीकल, पॅकेजींग आणि दैनंदिन वापराच्या वस्तू तयार करण्यासाठी उपयोग होतो.

# आठ जानेवारीला वाशीम येथे राज्यस्तरीय शाळा बचाव परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सर्वांना मोफत, सक्तीचे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे आणि राज्यातील एकही शाळा पटसंख्येअभावी बंद करण्यात येऊ नये यासाठी राज्यभरातील विविध शिक्षक संघटनांच्या माध्यमातून वाशिम जिल्ह्यात येत्या ८ जानेवारी २०२३ रोजी राज्यस्तरीय शाळा बचाव परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय , एस एम सी परिसर येथे ही परिषद होत असल्याची माहीती राज्यस्तरीय शाळा बचाव समितीचे प्रभाकर गायकवाड यांनी कळविले आहे. भारतातील प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ डॉ. अनिल सद्गोपाल (भोपाळ ) हे या परिषदेचे उद्घाटन करणार आहेत. परिषदेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक समितीचे प्रभाकर आरडे (कोल्हापूर) यांची उपस्थिती लाभणार आहे. मध्यप्रदेश येथील जागृत आदिवासी महिला संघटन च्या माधुरी कृष्णास्वामी आणि सत्यशोधक शिक्षक सभेचे माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्र शिक्षण बचाव समन्वय समितीचे निमंत्रक रमेश बिजेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. वाशिम येथील एस एम सी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. हरिभाऊ क्षीरसागर हे या परिषदेचे स्वागताध्यक्ष आहेत.
उद्घाटन सत्रामध्ये ज्येष्ठ विचारवंत डॉ. रवी जाधव, रामप्रभू सोनोने, महाराष्ट्र राज्य केन्द्रप्रमुख संघाचे प्रदेशाध्यक्ष अशोकराव महाले, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय इढोळे, सत्यशोधक साहित्य परिषदेचे अध्यक्ष सतीश जामोदकर, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नारायणराव काळबांडे, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष माधवराव अंभोरे, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ. रामकृष्ण कालापाड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.
यावेळी साने गुरुजी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर महाले, महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिसोद्दिन जहिरोद्दिन आणि महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष नागेश कव्हर यांची उपस्थिती लाभणार आहे.
परिषदेच्या दुसऱ्या सत्रामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण : एक चिकित्सा या विषयावर परिसंवाद होणार आहे. यामध्ये पुणे येथील अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेचे शरद जावडेकर आणि गडचिरोली येथील सत्यशोधक शिक्षक सभेचे प्रा. संतोष सुरडकर हे आपले विचार मांडणार आहेत. या सत्रामध्ये आदर्श बहुजन शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष दीपक जावळे, अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष विजय मनवर, सरपंच संघटनेचे अध्यक्ष दिपक खडसे, परिवर्तन शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन राऊत, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद राजगुरू यांची यावेळी उपस्थिती राहणार आहे.
या परिषदेच्या समारोपीय सत्रामध्ये भारतीय शिक्षण व्यवस्थेबाबत विविध ठराव पारित करण्यात येणार आहेत.




# वैजापूर येथे भक्ती की लहेर अंतर्गत नववर्ष स्पेशल हॅपिनेस शिबिर

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापुर :** येथिल आर्ट ऑफ लिव्हिंग केंद्रा तर्फे "भक्ति की लहेर " या उपक्रमांतर्गत "नव वर्ष स्पेशल हॅपिनेस कोर्स " आयोजित केला होता. दिनांक 1ते 6 जानेवारीत 2023या दरम्यान येथिल संत गंगागिरी महाराज धर्मशाळाच्या सभागृहात आर्ट ऑफ लिव्हिंग ची शिक्षिका वर्षा दिदी याच्या मार्गदर्शनाखाली हा कोर्स संपन्न झाला. या शिबीरात नितीन राजपुत,मुकेश राजपुत, गोकुळ भुजबळ,विक्रम राजपुत,विशाल राजपुत, निलेश डोडे, राहुल दाभाडे, अमृत बोथरा,शैलेश संचेती, सुनंदिलाल बोथरा, विशाल दाभाडे,गौरव दाभाडे ,साक्षी साखरे, ज्योती कौसाडीकर,निर्मला दाभाडे इत्यादीने सहभाग घेतला तर हा कोर्स यशस्वी करण्यासाठी, विशाल दाभाडे,गोकुळ भुजबळ सुनिल गायकवाड, व साक्षी टेके यांनी सहकार्य केले.




# वृत्तपत्र टिकण्यासाठी वर्तमानपत्राची विक्री किंमत वाढवावीच लागेल : वसंत मुंडे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** वर्तमानपत्राची संख्या वाढत असली तरी देखील बीडच्या वृत्तपत्रांनी आपल्या परखड लेखनीतून दर्जा टिकवला आहे. लोकशाही जिवंत राहण्यासाठी वास्तव पत्रकारीतेची गरज कायम असणार आहे. असे मत पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांनी व्यक्त केले. तर काम करणाऱ्यांच्या पाठीशी उभी राहणारी बीडची पत्रकारीता कौतुकास्पद असल्याचे मत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांनी व्यक्त केले. वृत्तपत्र टिकण्यासाठी वर्तमानपत्राची किंमत वाढवण्याचा निर्णय घ्यावाच लागेल तरच वृत्तपत्र क्षेत्र टिकेल असे परखड मत पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुबईच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने शुक्रवार दि. 6 जानेवारी रोजी सकाळी 11.30 वाजता बीड येथील स.मा.गर्गे भवन येथे दर्पणदिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. दर्पणदिन पुरस्कार वितरण सोहळ्यास अध्यक्ष म्हणुन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे लाभले. तर प्रमुख अतिथी म्हणून बीडचे पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुरेश साबळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी किरण वाघ, भंडाऱ्याचे माहिती अधिकारी बीडचे भूमीपुत्र फहाद काझी यांच्यासह सत्कार मूर्ती दर्पणकार संपादक नरेंद्र कांकरीया, खालेक पेंटर, एबीपी माझाचे गोविंद शेळके, वैचारीक दूतचे मानकरी वृत्तपत्र विक्रेते सुदाम चव्हाण, साप्ताहिक संपादिका प्रतिभाताई गणोरकर त्याचबरोबर पत्रकार संघाचे मार्गदर्शक संतोष मानूरकर, ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख, ज्येष्ठ संपादक राजेंद्र आगवान, दिलीप खिस्ती, मकदूम काझी, डॉ.गणेश ढवळे, सर्वोत्तम गावरस्कर, विश्वनाथ माणूसमारे, राजेंद्र होळकर, शेखर कुमार, बालाजी तोंडे, सुरेश जाधव, नारायण नागरे, कमलताई डोंगरे, प्रतापराव सासवडे, भास्कर इप्पर, रमाकांत गायकवाड, शेरजमा पठाण, शेख आयेशा, सुमूर्ती वाघीरे, दिपक काळकुटे, प्रमोद ठोसर, सदाशिव नाईक, गव्हाणे, शेख वसीम, रईस खान, शेख आय्युब, शेख जबेर, शेख ताहेर, इरफान शेख, शैलेश गोलांडे, शिवप्रसाद सिरसाट, विशाल गणोरकर, पारस पोरवाल, भागवत वैद्य, नितेश उपाध्ये आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अध्यक्षीय समारोपात वसंत मुंडे म्हणाले, पत्रकार हा लोकांचे प्रश्न सोडवतो पण आता पत्रकारांना आपल्या स्वतःचे प्रश्न सोडवण्यासाठी संघटित पुढाकार घ्यावा लागेल. वर्तमानपत्राची किंमत वाढत्या महागाईसोबत वाढवणे काळाची गरज आहे. वर्तमानपत्राची किंमत आपण वाढवली नाही तर वृत्तपत्र टिकणे अवघड होईल.

बाजारात दोन आणि पाच रुपयांचे नाणे आता शिल्लक नसताना नाण्यांच्या किंमतीत वर्तमानपत्र का? यावर गांभीर्याने विचार करुन वर्तमानपत्राची विक्री किंमत वाढवण्यासाठी सर्वांनीच सकारात्मक भूमिका घेणे गरजेचे आहे. पत्रकारांनी कोणाचेच न होता फक्त बातमीचेच व्हावे तरच पत्रकारीता टिकेल असे परखड मत व्यक्त केले.

**विशेष पुरस्कारार्थींचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार**

वृत्तपत्र क्षेत्रातील पडद्यामागील कर्तृत्ववान व्यक्तीचा देखील मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये उत्कृष्ट व्यवस्थापक म्हणून दैनिक पुण्यनगरीचे महादेव पवार, आदर्श रुग्णसेवक म्हणून दैनिक अभिमानचे अमजद पठाण, उत्कृष्ट संगणक ऑपरेटर म्हणून दैनिक पार्श्वभूमीचे विजय राऊत, उत्कृष्ट जाहिरात वसुली प्रतिनिधी म्हणून दैनिक लोकप्रश्नचे अण्णासाहेब घोडके आणि दैनिक चंपावतीपत्रचे भीमा आखाडे, उत्कृष्ट वितरण प्रतिनिधी म्हणून दैनिक रिपोर्टचे राजेंद्र काशीद, उत्कृष्ट छायाचित्रकार म्हणून कृष्णा शिंदे, उत्कृष्ट पार्सल सेवक म्हणून डी.एस. कुलकर्णी, उत्कृष्ट छपाई मशीन ऑपरेटर म्हणून दैनिक झुंजारनेताचे बबन पंडित, उत्कृष्ट पेपर लाईन सेवक म्हणून संतोष न्युज पेपर एजंसीचे बंडू बेदरे आणि श्रीराम जाधव, उत्कृष्ट पार्सल वाहतूक सेवक म्हणून जयलाल अण्णा चव्हाण, उत्कृष्ट कार्यालयीन प्रतिनिधी म्हणून दैनिक दिव्यमराठीचे राम मांगलकर या सर्व मान्यवरांचा पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुरेश साबळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी किरण वाघ, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, मार्गदर्शक संतोष मानूरकर, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यासह व्यासपीठावरील मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ आणि पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

# पाचवे जेष्ठ महिला राज्यस्तरीय अधिवेशनसाठी औरंगाबाद येथे बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉम मराठवाडा प्रादेशिक विभाग द्वारे पाचवे जेष्ठ नागरिक राज्यस्तरीय महिला अधिवेशन १९व२०मार्च,२०२३ रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आले आहे. याची पूर्व तयारी म्हणून औरंगाबाद येथे गीता भवन मध्ये शुक्रवार( ता,०६ )रोजी औरंगाबाद, जालना,नांदेड हिंगोली येथील जेष्ठ नागरिक महिला व पुरुषांची नियोजन बैठक प्रगतिशील जेष्ठ नागरीक सेवा भावी संस्थेचे अध्यक्ष भरत कुमार कुलकर्णी यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. याप्रसंगी मराठवाडा संघाचे नांदेड चे अध्यक्ष अशोक तेरकर, सचिव जयवंत सोमवाड, महिला आघाडी प्रमुख डॉ,निर्मला कोरे, व औरंगाबाद जेष्ठ नागरिक संघ सचिव श्रीकांत पत्की ,सेवा निवृत्त आयुक्त कल्याण गवळी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती, प्रास्ताविक महिला अधिवेशन आयोजिका डॉ,सौ,निर्मला कोरे यांनी केले,व महिला अधिवेशनात घेण्यात येणाऱ्या महिलांच्या सक्षमीकरणसाठी विविध स्पर्धा, कला, कौशल्य याबाबत माहिती दिली,अशोक तेरकर यांनी जेष्ठ नागरीक संघ जास्तीत जास्त उघडून जेष्ठांच्या मागण्या शासनाकडून मान्य करून घ्याव्या यावर भर दिला. याप्रसंगी वैजापूर वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघाचे सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांनी मनोगत व्यक्त करून महिला अधिवेशनात यशस्वी करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याचे आवाहन केले. आचार्यजी, कंकाल जालना, हरिभाऊ मुळे, यांनी मनोगत व्यक्त केले,वैजापूर चे अशोक धसे,उत्तमराव साळुंके,साहेबराव साळुंके,अशोक आप्पा पवार, यांनी सहभाग नोंदविला. चित्रा पिलखाने, सूर्यकांत कुलकर्णी विभा श्रीवास्तव, रेणू मूळे, प्रेमचंद तुल्ले यांनी सहकार्य केले,सूत्र संचलन श्रीकांत पत्की यांनी केले.



# समृद्धी महामार्गावर वाहने 'सुसाट'; वेग मर्यादेचे उल्लंघन केल्याबद्दल ६१३ प्रकरणांची नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वाहतुकीसाठी खुल्या झालेल्या समृद्धी महामार्गावर वाहनचालक वेग मर्यादेच्या नियमांचे सर्रास उल्लंघन करीत भरधाव वेगात वाहने चालवत आहेत. या महामार्गावर वेग मर्यादेचे नियम पायदळी तुडविल्याप्रकरणी ११ डिसेंबर ते २ जानेवारीदरम्यान ६१३ प्रकरणांची नोंद झाली आहे. या प्रकरणांमध्ये महामार्गावरून प्रतितास १६० किलोमीटर वेगाने वाहने चालविण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. परिणामी, वेग मर्यादेचे उल्लंघन रोखण्याचे मोठे आव्हान महामार्ग वाहतूक पोलिसांसमोर आहे. दरम्यान, समृद्धी महामार्गावर अपघातांची संख्या पन्नाशीपार गेली आहे. नागपूर – शिर्डी समृद्धी महामार्ग ११ डिसेंबरपासून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

या महामार्गामुळे नागपूर – शिर्डी अंतरही पाच तासांत पार करता येणार आहे. प्रशस्त अशा या समृद्धी महामार्गावर अवजड वाहनांसाठी प्रतितास ८० किलोमीटर आणि हलक्या वाहनांसाठी प्रतितास १२० किलोमीटर वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. मात्र या वेगमर्यादेचे अनेक वाहनचालक पालन करीत नाहीत. या महामार्गावर वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलीस कारवाईचा बडगा उगारत आहेत. वाहनचालक प्रतितास १६० किलोमीटर वेगाने वाहन चालवित असल्याचे वाहतूक पोलिसांच्याया कारवाईदरम्यान निदर्शनास आले आहे. तसेच प्रतितास १५५ किलोमीटर आणि प्रतितास १५१ किलोमीटर वेगानेही वाहने चालवण्यात येत आहेत.




# वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त ब्लँकेट वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :**बाबळी बंधारा येथे वडीलाच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी अन्नदान केले जाते. कोरोनाचे दोन वर्ष सोडल्यास गेल्या दोन वर्षापासून थंडीमध्ये उबदार ब्लॅकेट चे वाटप करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाभळी बंधारा कृती समितीचे अध्यक्ष मा. नागोराव पाटील रोशनगावकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून धर्माबाद चे मुख्याधिकारी नीलम कांबळे व बापूराव पाटील कदम बाभळीकर हे होते. गेल्या वेळी प्रत्येकाच्या घरी एक चादर वाटप करण्यात आली होती यावर्षी प्रत्येकाच्या घरी उबदार ब्लॅंकेट वाटप करण्यात आले. यावेळी संघर्ष दिनदर्शिकाचे संपादक सुदर्शन वाघमारे यांनी प्रत्येकी एक कॅलेंडर मोफत वाटप केले आहे. धर्माबाद ता. मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा बाभळी बंधारा कृती समितीचे सहसचिव जी. पी. मिसाळे हे गेल्या 17 वर्षापासून त्यांचे वडील कालवश परशुराम मिसाळे यांच्या पुण्यतिथी निमित्त अन्नदान करीत होते पण गेल्या दोन वर्षापासून उबदार ब्लॅकेट वाटप केल्याने 50 कुटुंबामध्ये भर थंडीच्या दिवसात पुण्यस्मरण दिनानिमित्त उबदार ब्लॅकेट वाटप केल्यामुळे थंडी ऐवजी प्रत्येक घरी उबदार वातावरण झाले आहे. या कार्यक्रमास हु. पानसरे हायस्कूलचे सेवानिवृत्त उप मु. अ. टी. जी. तुरे, भुजंगराव पाटील कदम,पत्रकार सुदर्शन वाघमारे, लक्ष्मण तुरेराव,गणेश वाघमारे समता सैनिक दलाचे ता. प्रमुख कॅप्टन, पत्रकार लक्ष्मण येताळे, न. पा. कर्मचारी संघटनेचे ता. अध्यक्ष भीमराव सूर्यवंशी बाळापुरकर, साहेबराव पंदिरवार,गणपतराव मिसाळे, उत्तमराव मिसाळे, सुधाकर मिसाळे, देविदास धोत्रे, शंकर नोमुलवर, यांची प्रमुख उपस्थिती होती. पूजा पाठ व सूत्रसंचालन गौतम मिसाळे तर आभार धमानंद मिसाळे यांनी मानले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# धुळ्यात पत्रकारांना पुष्प पेन देऊन सत्कार

## माजी महापौर कल्याणी अंपळकर यांच्या संयोजनाने पत्रकार दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** खासदार, महापौर आणि उपमहापौर व सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पत्रकार सत्कार समारंभाचा कार्यक्रम संपन्न झाला. लोकप्रतिनिधींनी चांगले काम केल्यास त्या कामाचे कौतुक पत्रकार करतात. लोकप्रतिनिधी चुकले तर ते सांगण्याचेही धाडसही पत्रकार करतात. पत्रकारांमुळे आमच्यासारख्या लोकप्रतिनिधींना काम करण्याचा उत्साह मिळतो, असे प्रतिपादन खासदार डॉ . सुभाष भामरे यांनी येथे केले . पत्रकार दिनाचे औचित्य साधून येथील हर हर महादेव विजय व्यायामशाळेच्या वतीने पत्रकारांचा सत्कार खा. डॉ. सुभाष भामरे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, महापौर प्रदीप कर्पे, उपमहापौर नागसेन बोरसे, गजेंद्र अंपळकर, महिला जिल्हाध्यक्ष मायादेवी परदेशी, माजी महापौर तथा नगरसेविका कल्याणीताई अंपळकर, चंद्रशेखर पाटील, निलेश कचवे, हरिकाका अजलकर, पै . संजय वाडेकर , प्रवीण लाडे, महादेव परदेशी , सतिष अंपळकर , पंकज अग्रवाल व पदाधिकारी कार्यकर्ते व पत्रकार बांधव उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पत्रकारांना गुलाबपुष्प देवून त्यांना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. खा. डॉ. भामरे पुढे म्हणाले की धुळ्यातील पत्रकार बांधवांचा मला अभिमान आहे. पत्रकार हे चांगल्या गोष्टींचे कौतुक करतात, आम्ही चुकलो तर ते सांगण्याचे धाडसही पत्रकार ठेवतात. त्यामुळे राजकीय नेते कुठलेही निर्णय घेताना विचार करतात की पत्रकार बांधव काय म्हणतील जनता काय म्हणेल आणि लोकशाहीत हे अभिप्रेत असणे आवश्यकच आहे. म्हणून सर्व पत्रकार बांधवांचा आम्हाला गर्व आहे . आजकाल इलेक्ट्रॉनिक मिडीया , सोशल मिडीयाचा दबदबा आहे. परंतु , प्रिंट मिडीयावर लोकांचा जो विश्वास आहे, तो सोशल मिडीयावर आजीबात नाही म्हणून प्रिंट मिडीयाचे महत्व आजही तसूभर कमी झालेले नाही . सन १ ९ ८० मध्ये जेव्हा आम्ही विद्यार्थी दशेत होतो तेव्हा केवळ प्रिंट मिडीया अस्तित्वात होता. तेव्हाच्या तुलनेत आज प्रिंट मिडीयाचा दबदबा प्रचंड वाढला आहे. कल्याणताईंनी पत्रकार दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करुन पत्रकारांचा सत्कार केला, ही कौतुकाची बाब आहे . पत्रकारांमुळे लोकप्रतिनिधींना काम करण्याचा उत्साह मिळतो. किंबहूना पत्रकार हे लोकप्रतिनिधींना काम करायला भाग पाडतात लोकशाहीत सर्वसामान्यांचा विकास हाच महत्वाचा आहे. लोकशाही निरोगी ठेवणे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. माध्यमं ही जनतेच्या समस्या सोडविण्याचे व्यासपिठ झाली पाहीजेत.

## डॉ. विश्वासराव आरोटे यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान



**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गावकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांना यावर्षीचा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार मुख्यमंत्री आमदार एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रदान करण्यात आला.**

## धुळ्यात मराठा समाजाचा वधूवर मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळ्यात मराठा समाजाचा रविवारी वधु - वर मेळावा धुळे येथील मिरच्या मारुती मराठा पंच मंडळ संचलित समस्त मराठा वधु वर पालक परिचय मेळावा २०२३ शहरातील पारोळा रोड वरील राम पॅलेस या ठिकाणी रविवारी दि . ०८ रोजी मराठा वधुवर पालक परिचय मेळावा होणार आहे.

ह्या मेळाव्यासाठी सकल बारा वर्षापासून उपक्रम राबवत आहेत. वर्षभरात १०० ते १५० लग्न जमतात व चांगल्या प्रकारे त्यांचा संसार चालू आहे. यावर्षी 1800 च्या आसपास नोंदणी झाल्या आहेत. विवाह नोंदणी पुस्तकाचा खूप मोठ्या प्रमाणात गैरवापर होत असल्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्रुप तयार करून याचा लाभ होऊ शकतो असे या पत्रकार परिषदेत आव्हान करण्यात आले. या मेळावासाठी आजुबाजुचे शेजारील राज्य व जिल्हातुन समाज बांधव येणार आहेत . मराठा समाजातील बंधु - भगिनीना आंमत्रित करतांना आनंद होत आहे . समाजातील सर्व घटकांसाठी वधु - वर पालक मेळावा हि संकल्पना आज काळाची गरज झाली आहे . यधु - वरांचा माता पित्यांना सुयोग्य स्थळासाठी किती पायपिट करावी लागते याचा येणारा अनुभव व त्यातुन परिणामकारक मार्ग शोधण्याचा उपाय म्हणजे परिचय मेळावा होय . तरी मेळाव्याची उद्दीष्टे पुर्ण करण्यासाठी उपवर वधुवरांना सोबत घेवुन यावे आणि त्यांनी मंचावर आपला परिचय सादर करावा . जेणेकरून मेळाव्यावे आयोजन करण्याचे उद्देश सफल होईल , तरी सदर मेळाव्यास समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती मराठा पंच मंडळ अध्यक्ष राजेंद्र इंगळे , प्रा . भगत काळे , विजय देवकर , राजेंद्र जाधव ,



योगिराज मराठे , प्रकाश चव्हाण , मेळावा समितीचे अध्यक्ष अँड . दिनेश काळे , समिती प्रमुख नैनेश सांळुखे , उपाध्यक्ष बाजीराव खैरनार , तुळशीराम म्हस्के , कार्याध्यक्ष संदिप सुर्यवंशी , सचिव शंकर मराठे , सर्जेराव इथापे , तुळशीराम बागुल , रमेश कदम , कैलास मराठे , मनोज मराठे , सुनिल वर्पे , प्रकाश पवार , शाम शयगुडे , संजय मराठे , भगत याघारे , दिपक थोरात , विकास अमर फरताडे , किरण मराठे , शशीकांत मराठे , विवेक बागुल , चंद्रकांत थोरात , रविंद्र नागणे , प्रफुल माणे , पवन शिंदे , संतोष मनगटे , सतिष गिरमकर इ यांनी केले आहे . संपादकीय कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.राजवर्धनजी दमडेहि मा . आमदार दैनिक कार्यक्रम्पले उद्घाटक मा . सुभाषजी भामरे सदेव रवासदार ) आपल्या दैनिकात सदर बातमी प्रसिध्दीस दयावे यांचे इसे डोणार आई श्री दादाजी भुसे साडे ( फैलिट मत ) आपला विश्वासु श्री बबनराव थोरात उपस्थित असणार आहेत

## सौ. प्रतिमा अरुण काळे यांची अ.भा.म.सा.संमेलन कविकट्टासाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** येथे होणाऱ्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील कविकट्टा या व्यासपीठावर ५/२/२०२३रोजी कविता सादरीकरणासाठी सौ.प्रतिमा अरुण काळे यांची निवड झाली आहे.



सौ. प्रतिमा अरुण काळे या श्री सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आकुर्डी पुणे ३५ येथे अध्यपनाचे काम करतात. तसेच पर्यावरण,कोरोना जनजागृती व विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करत साहित्यिक कला जोपासली आहेत. त्यांचे रंग प्रितीचे, प्रेमात रंगले मी, आणि भावनांचा कल्लोळ, मायाचे एकाकी जीवन हे प्रकाशित असून स्वतःचे मी प्रतिमा माझी प्रतिमा हे पुस्तक प्रकाशित आहे तसेच त्यांचे अनेक साहित्य विविध मासिक,दैनिक,दिवाळी अंकातून प्रसिध्द आहे.त्यांच्या निवडीने साहित्यिक क्षेत्रात त्यांचे कौतुक होत आहे.

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**मुक्रमाबाद :** आज दि. ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनाचे औचित्य साधुन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई शाखा मुक्रमाबाद संपर्क कार्यालयाचे उद्घाटन मुक्रमाबाद पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक संग्राम जाधव साहेब व दिनेशअप्पा आवडके यांच्याहस्ते व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुभाषअप्पा बोधने यांच्या उपस्थितीत पार पडला.प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करुन जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे प्रतिष्ठित व्यापारी दिलीप सावकार वट्टमवार, इसा चौधरी, बिट जमादार शिवाजी आडेकर, गोपनीय शाखेचे यादव इबितवार, शिवसेना मुखेड तालुका उपप्रमुख मन्मथ खंकरे, युवासेना नांदेड जिल्हाउपप्रमुख अतुल सुनेवाड, लक्ष्मण एन्मुलवाड, मनोज बनबरे, युवक कॉंग्रेस चे तालुका कार्याध्यक्ष मोहसीन कोतवाल, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस चे मुखेड



तालुका उपाध्यक्ष मगदुम पठाण, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल पटेल, रमेश राठोड, व्यंकट गायकवाड, साजिद शेख, सुनील बेल्लेवार, वामन बोयवार, आदिंची उपस्थिती होती. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या संपर्क कार्यालयात प्रतिष्ठित व्यापारी रवी सावकार पंदीलवार, ग्रा.प.सदस्य, बालाजी पसरगे, मनसे देगलूर तालुका अध्यक्ष श्रीकांत काळे, आदिंनी भेट देऊन पत्रकार दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक लोणीकर, कार्याध्यक्ष दबंग पत्रकार दत्ता पाटील माळेगावे, संजय राचलवार, रज्जाक कुरेशी, बस्वराज वंटगीरे, ज्ञानेश्वर राजूरे, आदि पत्रकार बांधव उपस्थित होते